

# सीतेचे आत्मनिवेदन

लेखिका : प्रा. विद्या कावडकर

# सीतेचे आत्मनिवेदन

लेखिका: प्रा. सौ. विद्या कावडकर



सर्व जन हिताय सर्व जन सुखाय




**प्रकाशक :-**

रमेश पुरुषोत्तम झुनझुनुवाला
,'लुम्बिनी'
माधव नगर, तेल्हारा ४४४ १०८
फोन :७२५८ २३१६०८
Email: rameshjjwala@rediffmail.com



प्रथम संस्करण: १७ फेब्रुवारी २०१५


विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपण हे  ई-पुस्तक फ़ॉरवर्ड करू शकता.


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क प्रकाशककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी प्रकाशकांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

हे ई-पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी प्रकाशकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.


**--------------**

# सीतेचे आत्मनिवेदन

## विषयानुक्रमाणिका


१. लेखिका परिचय -------------------------------------------- ५

२. मनोगत ----------------------------------------------------- ६

३. सासर माहेर ------------------------------------------------ ९

४. झुनझुनवाला घराणे------------------------------------------- २०

५. पती परमेश्वर ----------------------------------------------- २९

६. सच्चे कार्यकर्ते पती ------------------------------------------ ३९

७. स्वातंत्र्य लढा आणि मी -------------------------------------- ५१

८. स्वातंत्र्य दिन ------------------------------------------------ ६०

९. आईची भूमिका ---------------------------------------------- ६३

१०. शिक्षण विचार आणि मी ---------------------------------------७७

११. स्त्रीयांच्या संदर्भात -------------------------------------------८२

१२. आम्हा दोघांची खंत ------------------------------------------ ९०

१३. माझ्या आयुष्यातले आनंदाचे क्षण ---------------------------- ९३

१४. परिशिष्ट ................................................... १०३


--------------------

## लेखिका परिचय

प्रा.सौ. विद्या कावडकर, एम्.ए., बी.एड्.,

गेली ४० वर्षे मराठीच्या वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापिका.

१९७० चा महाराष्ट्र शासनाचा हस्तकला पुरस्कार प्राप्त.

तरूण भारत नागपूरचा लेखन पुरस्कार.

'ललित' मॅजेस्टीकचा लेखन पुरस्कार.

महाराष्ट्र, मध्यप्रदेशात १०० च्या वर विविध विषयांवर व्याख्याने.

पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय संशोधन (मराठी क्षेत्रात) अधिवेशनात निमंत्रीत, परिसंवादात सहभाग.

हनुमान व्यायाम शाळा अमरावती, यांच्या शताब्दी महोत्सवात निमंत्रीत. त्यात "लेक वाचवू चला" अभियानांतर्गत एक सांस्कृतिक कार्यक्रम सादर. त्याचे लेखन, दिग्दर्शन.

"सृष्टी वाचवू चला" पर्यावरण रक्षणासाठी कार्यक्रम सादर.

राज्यस्तरीय लेखिका संमेलनात ३-४ वेळा परिसंवादात निमंत्रीत.

अखिल भारतीय साहित्य संमेलन अकोला, रायपुर, जळगांव येथे परिसंवादात निमंत्रीत.

विदर्भ साहित्य संमेलनातही सहभाग.

विविध वृत्तपत्रातून लेखन.

प्रकाशित पुस्तके - दत्त जाणावे मला, धरा मनी गंध, म, म, मराठीचा.

प्रकाशनाच्या प्रकियेत - स्पर्श मोहिनी, आल्या संध्या छाया, मावळतीचे रंग.

Email address: suvarna.kawadkar@gmail.com

---

# मनोगत

आमचे खामगांव मला अनेक कारणांनी आवडते. ललित कला, साहित्य, संगीत नृत्याची चांगली परंपरा या गावाला आहे . कापसाची बाजारपेठ, चांदीचा आंतरराष्ट्रीय व्यापार, एक ना दोन अनेक कारणे सांगता येतील . पण मला त्यापेक्षा आणखी एका वेगळ्या कारणाने गांव आवडते. बुलढाणा जिल्हा म्हणताच मातोश्री जिजाऊंची मूर्ती समोर येते तर स्त्री मुक्तीचा पहिला हुंकार म्हणजे ताराबाई शिंदे बुलढाण्याला स्मृतिकोषात बांधून ठेवतात. खामगांव आणखी अशाच एका स्त्रीसाठी कायम लक्षात राहील. भारतीय स्वातंत्र्य लढ्यांत स्त्रियांचा सहभाग तसा कमीच . त्या कमीतील एक आमच्या खामगांवी राहतात. हे किती वर्षे ठाऊक देखील नव्हतं. त्याला आमची इतिहासाबद्दल असणारी अनास्था जेवढी कारणीभूत आहे तेवढीच प्रसिद्धीपासून दूर राहण्याची त्या स्त्रीची वृत्तीही कारणीभूत आहेच. त्या स्त्रीचं नाव आहे 'श्रीमती सीतादेवी झुनझुनवाला'. मला नेहमीच वाटत आलंय कि स्त्रीच्या नावाला देवी लावून फक्त मोठेपणा साधतो. देवीत अंगीभूत, अनुस्यूत असणारी शक्ती ह्या जोडाने कमी होते पण 'सीतादेवी' याला अपवाद आहेत. सीता म्हणताच सहनशीलता, पतिव्रत्य, मनमिळावूपणा, विवेक अनेक गोष्टी आठवतात. लोकांना राम झाला की नाही याची शंका आहे. मला मात्र खात्री आहे की राम झालाच, अन् सीतेच्या निमित्ताने त्याच्या कर्तृत्वाची, कर्तबगारीची गुढीच उभारली गेली. रावणाचा नाश म्हणजे राक्षसी महत्वाकांक्षेचा नाश - त्यासाठी सीतेचे अपहरण आवश्यक. त्या दृष्टीने रूपकात्मक बोलवयाचे झाले तर असे म्हणता येईल की, इंग्रजी सत्तेच्या रावणाला नामोहरण करणाऱ्या "पुरुषोत्तमाची" अर्धांगिनी "सीता" खामगावी आली होती व आहे.

छोटे गांव खामगांव. त्याच्या काही मर्यादा आहेत. खामगांवी राहताना हळूहळू त्या मर्यादांची ओळख, जाणीव होऊ लागली. खामगांवचे दोन भाग. एक जुने खामगांव- फरशीपलीकडचे. नवे खामगांव फरशीच्या अलीकडचे. '"फरशी"' म्हणजे छोट्या बोर्डी नदीवरचा गळवट पूल ज्याने गावाचे विभाजन झाले आहे.

अलीकडच्या म्हणजे नव्या गावात तथाकथित सुशिक्षित राहतात. ‘गावाची’ नाळ तुटलेली मंडळी, आपल्या घरापुढचा कचरा कुणी बघत नाही असे पाहून शेजाऱ्याच्या दाराशी लोटणारी ही मंडळी. नाल्या म्हणजे कचरा साठवण्याच्या जागा असे इथे समजले जाते. हसून एकमेकांकडे पाहण्याचा दंडक येथे. पण त्यासाठी घरांची लांबी, रुंदी, उंची सांपत्तिक स्थिती समान असेल तरच. अन्यथा मख्ख चेहऱ्याने लोक वावरतात. धनाढ्य आढ्यतेने वावरतात इथे. सरकारी अधिकारी याच भागांत बंगल्यातून राहतात. त्यांची मिजास, दिमाख, ऐटही इथे पाहायला मिळते. दोन टोकांच्या ह्या लोकांत मध्यमवर्गीयही राहतात. ‘धोबीका कुत्ता, घरका ना घाटका’ सारखी त्यांची परिस्थिती. अशा भागात लहानांची मोठी झाली. कासवासारखे पाय पोटात घेवून जीवन जगण्याची शैली अंगवळणी पडली होती. या जगात क्लब, महिलामंडळे, वाचनालये यांचे सभासद होणे-‘फॅशन’. त्या सर्वात सहभागी होत, नव्हे त्या कोंडवाड्यात वावरतांना एक दिवस अचानक ह्या वेगळया जीवन जगणाऱ्या स्त्रीचा परिचय झाला.

अहिल्याबाई होळकरांची पुण्यतिथी जवळ आली होती. टिळक स्मारक महिला मंडळांत ती साजरी केली जाते. त्यादिवशी त्यांचे पुण्यस्मरण आणि गावांतील कर्तबगार, सामाजिक कार्यकर्त्या, नवीन काहीतरी करणाऱ्या स्त्रियांचा सत्कार केला जातो. मंडळाचा अमृतमहोत्सव होता. कुणीतरी सीताबाई झुनझुनवालांचे नाव सुचविले. एक मुखाने ते मान्य झाले. त्यांचा परिचय देणे ही जवाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली. कांही गोष्टी यंत्रवत् करण्याची आपल्याला सवय असते त्याप्रमाणे सगळे सोपस्कार व्यवस्थित पारही पडले. इ.स १९९५ ची गोष्ट आहे ही. कार्यक्रमानंतर आलेला अनुभव, त्यांचा साधेपणा, त्यांचे विचार यामुळे मी त्यांच्याकडे आकर्षित झाले. खरे तर मी त्याआधी त्यांच्या घरी गेले नव्हतेच. त्यांचा मुलगा अशोक आणि सूनबाई आशा यांच्याशी मैत्रीचे संबंध महाविद्यालयांत एकत्र शिकतांना झाले होते. त्यांचा मुलगा डॉ. आनंद माझा विद्यार्थी. पण सीतादेवींशी संबंध आला नव्हता. एका स्वातंत्र्यसंग्राम सैनिकाची पत्नी एवढीच ओळख होती. आदर मनी होता. पण व्यक्ति एवढी मोठी असल्याची जाणीव नंतर झाली. नव्याने त्यांची ओळख व्हावी असे वाटू लागले. अधूनमधून त्यांना भेटायला जाऊ लागले.

‘खादी’ व्रत म्हणून स्वीकारल्याने सितादेवींचा सत्कार करतांना त्यांना खादीची साडीचोळी द्यायची होती. चटकन कुठेही उत्तम दर्जाची खादी मिळत नाही. शेवटी त्यांनाच म्हटले ‘आम्हाला साडी कुठे मिळेल ते सांगा’. त्या म्हणाल्या ‘माझ्याजवळ घडी न मोडलेली साडी आहे. ती घेऊन जा’. साडी मिळाली. त्याची किंमत त्या नको म्हणाल्या कारण साडीला महत्त्व नाही. महत्त्व सत्काराला म्हणजे कार्याला आहे. पण शेवटी त्या तयार झाल्या. उत्सव व्यवस्थित झाला. आणि एक दिवस मला बोलावणे त्यांचे आले. साडीची किंमत कमी होती, पैसे जास्त घेतले ते परत करायचे होते हे कारण होते. साड्यांचे बिल सापडले होते. त्यात साड्यांवर ‘सूट’ मिळाली होती. साडीवरील किमतीपेक्षा किंमत कमी पडली होती. संस्थेचा पैसा विनाकारण का वापरायचा ही त्यामागची भावना होती. वाढीव बिले देणाऱ्या काळांतील हा वेगळा अनुभव. मी त्यांच्याकडे ओढली गेले. सीतादेवींची मावशी कधी झाली कळलेच नाही.

एक सुसंस्कृत, सुशिक्षित, कुटुंबवत्सल, स्वातंत्र्यलढ्यात स्वतः ही सक्रीय असणारी ही साधी स्त्री. तिच्या विचारांचा प्रभाव वाढत गेला. असं वाटू लागले, हे जीवन सर्वांना कळलं पाहिजे. एक आदर्श आगळवेगळं जीवन. त्यांचे पैलू मांडण्याची परवानगी मी मागितली. त्यांच्याशी चर्चा होऊ लागल्या. चरित्रवजा लेखन जवळ जवळ पूर्णही झाले होते. पण मनाचे समाधान मात्र होत नव्हते. मग ‘आत्मनिवेदन’ हे माध्यम स्वीकारायचे ठरविले. विचार, भावना सारे काही त्यांचे. ‘शब्दांकन’ माझे. आपल्याला हे आवडेल अशी आशा आहे.

यासाठी मदत करणाऱ्या त्या स्वतः, त्यांची मुले, सुना, नातवंडे, नातसुनांची मी आभारी आहे.



छपाई, मुखपृष्ठ, प्रकाशनासाठी, मदतीला कृतज्ञता व्यक्त करते.

एक अतिशय संपन्न व्यक्तिमत्व, देशाचे नेतृत्व करणारे गांधी, त्यांचा सहवास लाभला, त्यांच्या विचारांचा परिणाम झाला. तो परिणाम एका अभिनव पद्धतीने बाहेर पडला. त्याचेच हे दर्शन

- सौ. विद्या कावडकर

# सासर माहेर

सगळे आयुष्य विदर्भातच गेले आहे. इथली माती माझ्या खूप ओळखीची आहे. रूढी परंपरा खूप जवळून पाहिल्या आहेत. त्यात रंगून त्यातील मौजही मी लुटली आहे. भुलाबाईची गाणी तर फार आवडायची. बालविवाह, त्या विवाहांचे दुष्परिणाम प्रत्यक्ष पाहिले आहेत. सासुरवास, बालविधवा, सती जाणे मारवाडातही आहेच. मला तेव्हाही नको वाटे अन् आजही तोच प्रश्न सतावतो की, प्रांत बदलला, भाषा बदलली तरी वर सांगितले, ते कसे बदलले नाही. भुलाबाईच्या एका गाण्यात सासुरवास करणाऱ्या सासरचे वर्णन आहे. त्यात माहेरचे सारे चांगले, सासरचे सारे वाईट असे म्हटले आहे. मला ते वर्णन अतिशयोक्तीपूर्ण आहे असे वाटे. साहित्यात थोडी अतिशयोक्ती असतेच. वाचकाला रस येण्यासाठी तिची गरज असल्याने ती बरीही वाटते. पण, प्रत्यक्षात तसेच असेल असे मात्र वाटत नव्हते. मला वाटे आपण चांगले वागलो तर समोरचा वाईट वागणार नाही. माझे माहेर म्हणजे बजाज, हे कुटुंब अतिशय सुसंस्कृत, सुधारणावादी होते. देशावर त्यांचे प्रेम होते. देशाचे पारतंत्र्य त्यांना बोचत होते. त्याची सुटका करणे आपले कर्तव्य आहे अशी त्यांची धारणा होती. उद्यमशील होते सारे. स्त्रीवर आघात करायचा, अत्याचार करायचे असा स्वभाव कुणाचा नव्हता किंवा तसा विचारही त्यांच्या मनाला शिवत नव्हता. स्त्रीला स्वातंत्र्य होते, मोकळीक होती. माहेर या शब्दाला राजस पार्श्वभूमी आहे. मुग्ध बाळ, अबोध बाल्य, निरागस बाल्य मला जगायला मिळाले. माझ्या जीवनातील कितीतरी रम्य क्षण ह्या बाल्याने भारलेले आहेत. त्या मंतरलेल्या क्षणांनी माझे आयुष्य घडविले आहे.

जमनालालजी बजाज माझे काका. तसे कुटुंब एकत्रच. पण आई वडील जिनिंग फॅक्टरीमध्ये राहत. व्यवसायात लक्ष घालीत. स्त्रियांना शिक्षण मिळालेच पाहिजे असे काकांचे मत होते. घरात त्यांचाच वरचष्मा होता. ते जो कांही निर्णय घेतील तो सर्वांच्या हिताचा, कल्याणाचा असेल यावर सगळयांचा विश्वास होता. माझ्याबरोबरच त्यांची मुलगी, माझी चुलत बहीणही शिकायला होती. परंतु तिला शिक्षणात फारसा रस नव्हता. त्यामुळे गतीही

नव्हती. मला मात्र शिकण्यांत रस वाटू लागला होता. ओढ वाढायला लागली होती. सुरवातीची कांही वर्षे वर्ध्यातच आम्ही शिकलो. नंतर मात्र मला अमरावतीला शिकण्यासाठी पाठविण्यांत आले. तिथे वसतिगृहात राहावे लागले. त्याकाळी कां? कशासाठी? कधी? कुठे? कुणी? असे प्रश्न पुरुषांनी देखील वडिलधाऱ्यांना विचारण्याची पद्धत नव्हती. मग स्त्रिया आणि मुलींनी तर विचारण्याचा प्रश्नच येत नव्हता. शाळेत पाठविले जाऊ लागले. वसतिगृहात पाठविले, राहू लागले. नोंद घेऊन त्याप्रमाणे वागायचे एवढेच ठाऊक होते. त्या सगळ्यांत आनंद एवढाच की शाळेत जाता येते, शिकता येते आहे. वसतिगृहात राहण्याच्या संधीने अनेक गोष्टी शिकता आल्या. अनुभव संपन्न झाले मी! अनुभवविश्वात खूप नानाप्रकारची भर पडली. जगाची कल्पना आली. समोरच्याशी कसे वागायचे यांची जाणीव झाली. अंदाज घेता आला. तर्क करता येऊ लागला. स्वदेशी, स्वधर्म याचा खूप पगडा होता मनावर. वसतिगृहात एकटे राहतांना भय मात्र कधीच वाटले नाही. आपल्याला काय हवे, काय आवडते, कशाला होकार द्यायचा, नकार कशाला या साऱ्या गोष्टी ह्या एकटे राहण्याने मला शिकविल्या असे मला वाटते. ठामपणे आपले मत मांडण्याइतकी प्रगल्भ मी झाले होते.

माहेरच्या आठवणी जेंव्हा जेंव्हा जागतात, तेंव्हा तेंव्हा एक गोष्ट पुन्हा पुन्हा समोर येतेच. खूप चांगली आहे ती. त्याकाळी कापसाचा उद्योग विदर्भात, त्यावेळी वऱ्हाड म्हणायचे, खूपच चांगला होता. शेतातल्या कापसासाठी जिनिंग-प्रेसिंगची व्यवस्था असे. गांवोगांवी जीन असत. प्रत्येक जीनात पाण्याचा साठवणीसाठी मोठीमोठी टाकी असत. वडिलांनी त्या टाक्यांचा आधारे आम्हा भावंडांना पोहायला शिकविले. पोटाला पक्का हवाबंद डबा बांधून पोहायला सुरुवात होई. नंतर डबा काढून पोहता यायला लागले की, विहिरीत वरून उडी मारून पोहायला शिकविले. खूप चांगले पोहता येते. त्याचे श्रेय वडिलांनाच द्यायला हवे. लहानपणापासूनच पाण्याची भीती त्यामुळे कधीच वाटली नाही. पुढे नातवंडानाही पोहण्याचे धडे त्यांनीच दिले.

पोहायला बाऽआदब बाऽ मुलाहिजा असे खुलेआम शिकायला मिळाले. पण सायकल चालवायला आम्ही चोरून शिकलो. आज त्या आठवणींनी खूप हसू येते. त्याकाळी घरोघरी सायकली नसायच्या. पण बजाजांकडे खूप लोक कामाला येत. त्यांच्यापैकी काहींच्या सायकली असत. वडिलांकडे, काकांकडे कामाला येणारी मंडळी कामांत गुंग झाली की, आम्ही त्या

सायकली कुणाचेही लक्ष नाही असे पाहून पळवायचो. पडत असू, खरचटे पण कुणाच्याही मदतीवाचून आम्ही सायकल चालवायला शिकलो.

शाळेची आवड होतीच. त्याचबरोबर वाचनाचीही गोडी लागली. त्याचे श्रेय काकांना द्यायला हवे. नवनवीन पुस्तके विकत आणायची त्यांना खूप आवड होती. त्यामुळे नवे वाचायला मिळे, विचार करायला लागले मी. काकांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पुस्तक वाचायला आणून तर द्यायचेच पण वाचले की नाही अशी चौकशीही करायचे. त्यानंतर काय वाचले, त्यातले काय आवडले? अशी परीक्षाही ते घ्यायचे. त्यामुळे सकस वाचायची सवय लागली.

वेचक लक्षांत ठेवायची सवय लागली. रसग्रहण करायची सवय लागली. आज तर वाचन माझा छंद झाला आहे. हिंदी, इंग्रजी, मराठी सर्वच वाचते. तरी मराठी वाचायला जास्त आवडते. कथा कादंबऱ्या खूप वाचल्यात, आजही वाचते आहेच. पण ना. सी. फडक्यांसारखी भाषा असलेले लेखन आज होत नाही ही खंत वाटते. फडके, खांडेकर, अनंत काणेकर वाचलेत. ऐतिहासीक कादंबऱ्या खूप वाचल्यात. हडप, नाथमाधव, हरी नारायण आपटे, ना. ह. आपटे यांचा खूप प्रभाव पडलाय. लेखनाने माणूस खूप बहुश्रुत असला तरच परिणामकारकता साधता येते असे माझे मत आहे. वाचनाने व्यक्तिमत्वाला वेगळा आयाम मिळतो यात शंका नाही. वाचनाने मनन, चिंतनाची सवय लागली. कधी कंटाळा आला, करमत नाही असे वाटलेच नाही. ग्रंथ खरोखरच माझे मित्र बनले होते व आहेत. स्त्रियांनी स्वतःला किमान वाचनाची तरी सवय लावून घ्यावी असे आवर्जून सांगावेसे वाटते.

रामायण, महाभारत, पुराणेही खूप वाचली. त्यातून माझ्या ज्ञानात भरच पडत आलीय. संस्कार करण्यांचे त्यांचे कार्य अतर्क्य आहे. हा भारताचा प्राचीन इतिहास आहे. पण त्याकाळी रोचक, नवलपूर्ण कथा म्हणूनच त्याकडे मी बघितले होते.

मी मोठी होत होते. घरात सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे मुलींचा विवाह असतो. अनादी काळापासून ‘लेक परक्यांचे धन, करून जतन, करू अर्पण‘ ही भावना चालत आली आहे. आमच्या घरीही विवाहाचे वारे वाहू लागले. कन्यादानाची कल्पना कशातून जन्माला


आली ह्याचे उत्तर वरची विचारसरणी आहे. आम्ही मारवाडी, आमचा समाज तर मुलीला लक्ष्मी मानतो. तिने वरिष्ठ, जेष्ठ मंडळीना नमस्कार करायचा नसतो. माझे नाव सीता. सीतेच्या विवाहासाठी वर संशोधनाला सुरुवात झाली. वर तिला साजेसाच हवा होता.

सीतेला वर हवा रामासारखा व्रतस्थ, आदर्श, सगळयांना धरून चालणारा तो असावा. तरीही तो चार चौघांपेक्षा वेगळा निराळा असावा, त्याचे व्यक्तिमत्व प्रभावी असावे, तो विचार करणारा, विचार जपणारा, विचार समोर मांडणारा असावा अशी अपेक्षा होती. बुलढाणा जिल्हातील खामगांवच्या झुनझुनवालांच्या कुटुंबातील मुलाचे स्थळ कुणीतरी सुचविले . सारे मना जोगते होते. लेकीला विचारायला हवे.तिचे मत लक्षांत घ्यायला हवे ही घरातल्यांची विचारसरणी होती . मला तसे विचारलेही. 'तुला आयुष्याचा जोडीदार योग्य वाटतो ना?' कारण मुलीलाही आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. सगळे आयुष्य ज्याच्या संगतीने जगायचे तो पसंतीचा हवाच सर्वांना असे वाटत होते. जवळपास पंच्याहत्तर वर्षापूर्वी अशी विचारसरणी अशक्यच होती. मी खूप भाग्यवान. मला असे उदारमतवादी माहेर मिळाले. मुलीच्या मनाचा विचार ते किती करत होते ह्याचे उदाहरणच सांगते मी .

मला, म्हणजे सीतेला, स्वतःचे मत होते. ते जपण्याचा प्रयत्नही मी त्या काळी केला होता. झुनझुनवालांच्या स्थळाआधी एक स्थळ मी नाकारले होते. त्याचे कारण पैसा नव्हता, रुपाचाही प्रश्न नव्हता. सगळे काही चांगले होते पण लग्नाचा नियोजित वर व्यसनी होता. व्यसने आयुष्याचे मातेरे करतात ही जाणीव आजूबाजूच्या वातावरणाने करून दिली होती. घरांत माझा नकार मी सांगितला. घरच्या लोकांनीही पाठींबा देत ते लग्न ठरलेले मोडले. एक आदर्श माझ्या मनी होता. एक पुरुषोत्तम मला हवा होता. नशिब असे बलवत्तर की खरोखरच मला माझ्या स्वप्नातला 'पुरुषोत्तम' झुनझुनवालांच्या घरात सापडला. पण लग्न मोडणारी मारवाडी मुलगी म्हणून माझ्यावर शिक्का बसलाच. त्याकाळी तर हा सगळा प्रकार भयंकर वाटण्यासारखाच होता.

दोन्हींकडून पसंतीचा हिरवा कंदील दाखविला गेला. विवाह ठरला. साखरपुड्याची तिथी निश्चित झाली. अत्यंत अभिमानाची गोष्ट म्हणजे साखरपुड्याला महात्मा गांधीजी उपस्थित होते.

कार्यक्रम अत्यंत साध्या रीतीने पार पडला. बापूंच्या हातूनच मला रुपया नारळ दिला गेला. माझ्या भविष्यातील जीवनाची दिशाच जणू त्या दिवशी ठरली होती. मग लगेच विवाह ही झाला. वर्ष होते १९३६. तारीख होती मे १७. नववधू सीता सासरी खामगांवी पोहोचली.



मन अजूनही माहेरी ओढ घेत होत. वर्धा डोळ्यासमोर येत होत. बजाज कुटुंबासारखे माहेर. एक राष्ट्रीय, औद्योगिक समृद्ध परंपरा आहे त्या घराण्याला. स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास लिहिणाऱ्याला हे घराणे वगळून चालणारच नाही. स्वातंत्र्यपूर्व काळांत आणि नंतरही सेवाव्रत स्वीकारलेले आहे घराणे. टिळकपर्व संपून गांधीपर्वाची वाटचाल सुरु झाली होती. उदारमतवादी, सुधारणावादी विचारांचा वारसा घेऊन मी सासरी आले होते. महात्मा गांधीशी माहेरी चांगला घरोबा होता. त्यांचे विचार कानावर पडून पडून मी मनांत ते कायम घर करून राहतील असा प्रयत्न केला होता. गांधीजी म्हणायचे एखाद्या कुटुंबाला सुशिक्षित करण्यापेक्षा एखाद्या स्त्रीला सुशिक्षित करणे अधिक श्रेयस्कर आहे. फक्त तोंडाने बोलायचे अन् वागायचे दुसरेच असा काळ नव्हता तो. 'बोले तैसा चाले त्यांची वंदावी पाऊले' अशी पूर्ण पिढीच होती

ती. कर्त्या, (बोलक्या नव्हे) जावयाची गरज होती त्यांना. म्हणून चळवळीतला, शिकलेला मुलगा म्हणून मा. पुरुषोत्तमजी झुनझुनवालांची निवड केली होती काकांनी. धाडसीपणाने प्रत्येक संकटाला सामोरे गेले पाहिजे हे बाळकडू मिळालं होत. 'वाघिणीचे दूध' म्हटले जाणारे इंग्रजी भाषेचे अध्ययन करायला मिळाले होते. त्यामुळे मनाला आजपर्यंत कायम बजावत आले आहे की माघार घ्यायची नाही, कच खायची नाही, घाबरायचं तर मुळीच नाही. ह्या विचाराने मला सासरी जगतांना त्रास झाला नाही.

लग्न झाले तेंव्हा मी सोळा वर्षांची होते. आपला देश पारतंत्र्यात आहे ही गोष्ट माझ्या पतीदेवांच्या मनाला खूप जाचत असे. त्यांचे जीवन म्हणजे एक स्वतंत्र विषय आहे. तो तसा स्वतंत्रच नंतर सांगेन

माहेरी असतांना जशी वाचनाची गोडी व सवय लागली तशीच आणखी एक गोष्ट नोंदवायला हवी जी माहेरीच मला प्राप्त झाली. खूप पाठांतर त्या वयात केले होते. भगवद्गीता, विनोबांची गीताई, रामरक्षा, अनेक श्लोक पाठ केले होते. ह्या पाठांतराची विद्यार्थी दशेत खूप गरज आहे, असे काकांचे मत होते. पाठांतराने लक्षात ठेवायची सवय तर लागतेच शिवाय वाणीही स्वच्छ होते असे ते म्हणत असत. आम्ही वाचलेलं कितपत लक्षात ठेवतो याकडे जसे त्यांचे लक्ष असे तसेच नवीन काय पाठ केले आहे ह्याची न विसरता चौकशी ते करायचे. आजही मला पाठांतराचे महत्व वाटते. पूर्वी शाळांतून पाढे पाठ करून घेत असत, वर्गातून कविताही सामूहिक रीतीने म्हटल्या जात. त्याचा फायदा असा झाला की गणित खूप पक्के झाले. कवितेमुळे भाषा सुधारली. बहुश्रुतता आली. आजही काही गोष्टी स्पष्ट करण्यासाठी काव्य पठणाचा उपयोग होतो. दुर्दैवाची गोष्ट आहे की आज घरांघरांतून अन् शाळाशाळातून अशा पाठांतराची हकालपट्टी झाली असून नको असलेली 'घोकंपट्टी' मूलांकडून करून घेतली जाते आहे. ज्यामुळे स्वतंत्र विचार करण्यांची, समजून वापर करण्याची सवय नव्या पिढीला लागलेली नाही. मातृभाषेचे महत्व, तिच्याबद्दलची आत्मीयता तर चक्क हरवली आहे. इंग्रजांचे राज्य गेले पण त्यांचे मागे राहिलेलं इंग्रजी पिढ्यांना खाऊन टाकते आहे. इंग्रजी भाषा चांगली आहे. तिला विरोध असण्याचे कारणही नाही. पण माणूस आपल्या मातृभाषेतून विचार करतो. नंतर दुसऱ्या भाषेत त्याचे भाषांतर करून व्यवहार पूर्ण करतो. ह्याबरोबरच मातृभाषेचे आणखीही महत्व आहे. कितीही इंग्रजी शिकलो तरी प्रत्यक्ष व्यवहारात स्थानिक भाषाच

वापरावी लागते. शिक्षणाचे माध्यम इंग्रजी केल्याने मातृभाषाही नीट येत नाही व इंग्रजी तर बोलून चालून परकीच. त्यामुळे तिचे अन् विद्यार्थ्यांचे हालच हाल होतात. माझी मातृभाषा मराठी नाही. त्याकाळी इंग्रजी माध्यमातून शिकावे लागले. तरीही मराठीच मला अधिक सोपी वाटायची. माहेरी  मारवाडी बोलले जाई. घरी येणारे जाणारे हिंदी किंवा मराठी बोलत असत. त्यावेळी मध्यप्रांत आणि वऱ्हाड प्रांत होता. हिंदीच अधिक चालायची पण व्यवहारात मराठीचा वापर जास्त होता. कारण वऱ्हाडांत मराठी लोक संख्येने जास्त होते. आम्हाला सर्वांनाच मराठी चांगले येई. वाचनात मराठीच अधिक असे कारण मराठीइतके विविध साहित्य उपलब्ध नसे. मराठीला विरोध का हे मला कोडेच आहे. आजही आम्ही घरी मारवाडी बोलतो, सुनांना मारवाडी येत नाही, त्या हिन्दी बोलतात. आता महाराष्ट्र प्रांत आहे. सगळयांनाच चांगले मराठी येते.

माहेरी असतांनाच आजीवन खादी वापरायचे व्रत मी घेतले होते. आजही ते पाळते आहे. माझी मुले खादी वापरतात पण कुणालाही तशी जबरदस्ती केलेली नाही. ह्या सगळया संस्कारांनी मला घडवलं आहे. जीवनाची दिशा दाखविली आहे. त्या संस्कारांना मी अभिवादन करते. नकळत झालेले हे संस्कार म्हणजे मनाच्या कोऱ्या पाटीवर काढलेला श्रीगणेशच आहे. वयाच्या पांचव्या वर्षापर्यंत मुलांचा भाषाकोष जवळजवळ पूर्ण झालेला असतो  असे मानसशास्त्र सांगते. ह्याचाच अर्थ असा की, तुमच्या भावी आयुष्यातील भाषीय व्यक्तिमत्वाची जडणघडण तेंव्हाच निश्चित होते. योग्य-अयोग्य, चांगले-वाईट, विवेक, तारतम्य कशाचीही गंधवार्ता नसलेले ते वय जो संस्कार मिळेल तो ग्रहण करते. ह्या दृष्टीने माझे माहेर खूपच सम्पन्न होते यांत शंकाच नाही.

हवा तसा पती आणि सासर मिळाले होते. पण वैचारिक तफावत दोन्ही घरांण्यात खूप होती. घराणे सुशिक्षित होते म्हणण्यापेक्षा पुरुष शिक्षित होते असे म्हणायला हवे. पुराणमतवादी, सनातन विचारांचे घरांत वातावरण होते. रूढीपरंपरांचा खूप पगडा होता सर्वांवर. एका मारवाडी कुटुंबांत सुनेकडून अपेक्षा असतात. त्या तर सर्व होत्याच. डोक्यावरचा पदर नव्हे घूंघट-म्हणजे मानमर्यादेचा परमबिंदू समजला जाई. इथूनच सुरुवात झाली. ह्या सगळयांशी जुळवून घ्यायचे, तसा प्रयत्न करायचा की यात आपल्याला अजिबात स्वारस्य नाही असे सरळ न दाखविता त्याकडे कानाडोळा करायचा, की आपल्याला वाटेल तसे वागायचे हा निर्णय एका नव्याने घरात आलेल्या पंधरासोळा वर्षाच्या   मुलीने घेणे सोपे नव्हते. खरे

सांगायचे तर असा निर्णय घेणे खूप धारिष्ट्याचे होते. पण ठरविले की, निर्णय घ्यायचाच, न पटणाऱ्या रूढीपरंपरातील फोलपणा समजून त्यात बदल करायला हवाच. कुणीतरी कधीतरी तसे पाऊल टाकायला हवे आहे. तशी मानसिकता सहजासहजी तयार  होणार नव्हती. मग काय हरकत आहे आपण सुरुवात करायला?

'मौनम् सर्वार्थ साधनम' असे मनाशी निश्चित केले अन् वागायला सुरुवात केली. परिसरांतून, घरांतून माझ्या घूंघट न घेण्याच्या निर्णयावर ज्या प्रतिक्रिया आल्या त्याने सुरुवातीला मला बुजल्याबुजल्यासारखे वाटायचे. कधीकधी वाटे की आपले कांही चुकत तर नाहीना!  अनेक अनपेक्षित प्रश्न उभे राहिले. माझ्यावर बहिष्काराचे शस्त्र उगारले गेले. त्याला तोंड देतांना एक फायदा झाला की, स्त्रीसमूहात राहूनही एकटी राहणारी स्त्री, तिची विचारसरणी मला जाणवली. इतर स्त्रियांच्या वर्तनामागची कारणे कोणती असावीत असा विचार मी करू लागले. भारतीय स्वातंत्रलढ्यात भाग घेणारी स्त्री आणि चार भिंतीत आपल्या व्यक्तीमत्वाला, आत्मभानाला विसरलेली स्त्री यांची तुलना मी करू लागले. खरे तर त्यावेळी मी सक्रीय राजकारण या संदर्भात करू लागले नव्हते. तरी कस्तुरबा गांधी सारख्या स्त्रीचे रूप मी पाहिले होते. नकळत स्त्रीजीवनाचा विचार मनांत घर करू लागला. स्त्रीचा होणारा कोंडमारा लक्षात यायला लागला. या संदर्भात आपणच पावले उचलायला हवीत असे वाटायला लागले. विधवा, परित्यक्ता, दुसरपणावर दिलेल्या, सवती असणऱ्या स्त्रिया यांचा विचार मी करू लागले. माझ्यावर बहिष्कार टाकणाऱ्या स्त्रियांचा मला राग न येता त्यांची कीव येऊ लागली. या जगण्यांवर उपाय आपणच शोधायला हवा असे ठरवून तसा प्रयत्न करू लागले. एक गोष्ट नोंदवायला हवी. माझ्या मौनाने, विनम्रपणाने वागण्याने त्यांच्या विरोधाची धार थोडी कमी होऊ लागली होती.

माहेरी असतांना मुलींना शिकवायला हवे ह्या विचाराला  प्राधान्य होते. त्यामुळे वर्ध्याला महिलाश्रमांत जात होते. नंतर अमरावतीलाही राहिले होते. त्या मोकळया वातावरणाचा, स्वच्छ विचारसरणीचा परिणाम होऊन माझे विचार पक्के झाले होते. घरांतल्या स्त्रियांच्या वागण्याचा मी स्वतः त्रास होऊ दिला नाही. आपण त्यांना त्रास द्यायचा नाही असे पक्के ठरविले होते पण अंधश्रद्धांच्या, अर्थशुन्य भाबडया रूढीपरंपरांच्या पाशांत त्या इतक्या जखडलेल्या होत्या की माझ्या पध्दतीने   त्यांनी कधी विचार करणे शक्यच नव्हते. पिढ्यान्

पिढ्या बंधनात अडकलेली त्यांची मने सहजासहजी मुक्त होणार नाहीत हे त्यावेळी अशाच रीतीने मला कळले होते असे म्हणता यायचे नाही. मला त्यांची कीव, कणव वाटायची असे मात्र म्हणणार नाही. ह्यांच्यासाठी कांहीतरी करायला हवे असे मात्र वाटत होते. घरातली जवळजवळ सगळी कामे मी करीत असे. सेवा करणे आपले कर्तव्य आहे हे मला पटलेले होते. माझ्या न बोलता वागण्याने त्यांना त्रास जरी होत होता तरी कुठे तरी माझा सच्चेपणा त्यांना पटतही असावा असे वाटते. विरोध मात्र खूपच सहन करावा लागला. पतीराजांकडे हे सगळे सांगावे असे वाटले नाही. असे सांगणे म्हणजे तक्रार करणे, त्यांची गाऱ्हाणी करणे होईल एवढे मला कळत होते. आपली कटकट त्यांच्यामागे नको असे मला वाटे.

त्यांच्या पुरातन विचारांना मी घरात आल्यापासून धक्के तर देऊ लागले होतेच. पण प्रत्यक्ष त्यावर कात्री चालवायची वेळ नाईलाजाने लौकरच आली. माझा मोठा मुलगा जगदीश ह्याचे जावळ पहिल्या वर्षात काढता आले नाही कारण देशांत म्हणजे राजस्थानांत जाऊन देवस्थानात केस उतरवायची रीत होती. पतीदेव तुरुंगात गेले होते. घरांत कुणालाही ह्या साध्या कामाला वेळ नव्हता. त्यामुळे तिसऱ्या वर्षापर्यंत त्याचे केस चांगलेच वाढले होते. त्याची काळजी जरी मी घेत होते तरी ते चांगले दिसत नव्हते. मी सासूबाईंना सांगून टाकले. एका आठवड्यात मुलाला घेऊन जावळं काढायची व्यवस्था करा. त्याप्रमाणे मुदत संपल्यावर मी कात्री घेऊन मुलाचे केस माझ्या खोलीत कापून टाकले. मला त्यात कांही चुकले असे तेंव्हाही वाटले नाही. आता तर जग बदलले आहे त्यामुळे तो प्रश्नच उद्भवत नाही. असे अनेक प्रसंग घरात घडत होते. माझ्या कृतीने घरात, आजूबाजूला, मारवाडी समाजात हलकल्लोळ माजत होता. मी माझ्या जावेची खूप आजारपण काढली, सेवा केली. इथेच एक गोष्ट सांगायला हवी की माझे आई वडील आजारी आहेत असे कळले तर मला त्यांची सेवा करायला जायला बंदी कधीही कुणी केली नाही. मी १५-१५ दिवस माहेरी जाऊन राहायची त्यावेळी माझ्या मुलांचे घरातल्या बायकांनीच हवे नको पाहिले होते. त्यांची काळजी घेतली होती. एकत्र कुटुंबात वाढल्यामुळे घरातल्या मंडळीवर विश्वास ठेवायची मला सवय होती. पतीच्या तुरुंगवासाच्या काळात मला खूप कष्ट करावे लागले तरी घरांत त्यांच्या असलेल्या अस्तित्वाचाही आधार वाटे. मला जे योग्य वाटे ते मी करीत होते. आज इतक्या वर्षानंतरही त्यात कांही चुकत होते असे वाटत नाही.

सासर आणि माहेर या संकल्पना तशा तौलनिक आहेत. लहान वयापासूनच नाही नकळत्या  वयापासूनच सासर म्हणजे त्रास देणारे लोक. तिथे छळ होतो, जाच केला जातो. आपल्या आईवडिलांना लुटणारे, त्रास देणारे असा संस्कार परिसरातूनही सहज केला जातो. मनात एक ग्रज, किन्तु, त्यातून निर्माण होतो. संशयग्रस्त मन मग प्रत्येकच गोष्टीचा विपर्यास करू लागते. गैरसमज होतात, ते वाढतात. माझ्या माहेरी असा कुठलाही विचार माझ्यापर्यंत पोहोचला नव्हता. कुणीही तसे कधी बोलले नव्हते. वाचन गाणी यातून कांहीतरी असे घडते हे ठाऊक झाले होते. मला ते सर्व खोटे वाटायचे. पण प्रत्यक्ष त्याचा अनुभव घेण्याची वेळ माझ्यावर आली. त्यावेळी मात्र त्या वागण्याचा त्रास करून न घेता त्या वागण्याची कारणमीमांसा करू शकले कारण माहेरचे विचारधन. आधी असा विचार केला नव्हता पण लग्न झाले तेंव्हा विचार करण्याचे वयही होते आणि परिस्थितीही तशीच होती.

खरं तर खूप खूप मनाला वेदना करणाऱ्या गोष्टी त्या माझ्या आयुष्यात घडून गेल्यात. त्यांना विसरणेच योग्य असे ठरवून बुद्धिपुरस्सर त्याकडे मी दुर्लक्ष करीत गेले. पण कांही मुक्यावेदना अजूनही ठसठसतात. मी दिसायला फारशी चांगली नाही. काळ्या-सावळ्या रंगाची. खरं म्हणजे चार-चौघीसारखी होते. पण माझ्या आईला मी आवडायची नाही. तिच्या वागण्यातून ते तेंव्हा तर जाणवले होतेच पण नंतरही विवाहानंतरही त्यात बदल झाला नाही.

रूढी परंपरातील आंधळ्या अनुकरणाला सुशिक्षितही अपवाद नाही. जवळपास पंच्याहत्तर वर्षानंतरचे हे चित्र मी पाहते आहे. त्यामानाने माझ्या काळातली परिस्थिती चांगली होती असे वाटते.

सासर आणि माहेर दोन घरांतील वातावरण एकदम भिन्न होते. दोन धृव जर म्हटले तर चुकीचे होणार नाही. अशी तुलना करायची नाही असे मनाला बजावत होते. मन समाधानी नव्हते. दर क्षणाला नकळत मन तुलना करायचे. तरी 'आलीया भोगासी असावे सादर' म्हणत ठरवून घरांतल्यांची मने जिंकण्याचा प्रयत्न मी केला.

आज आमच्या घरात मोकळे वातावरण आहे. माझ्या सुनामुलांनी माझ्या प्रपंचातल्या कार्याची, तडजोडीची दखल घेतली आहे. सगळेच माझे मन राखायला झटतात. नातू, त्यांच्या बायकांही माझी सेवा करतात. त्यांना माझा अभिमान वाटतो. मला वाटतं 'सुख सुख' ज्याला

म्हणतात ते हेच असावे. 'सब्र का फल मीठा होता है' ह्या विचाराने देशाला स्वातंत्र्य मिळवायला मदत झाली. मला वाटते माझ्या जीवनाचे सारही हेच आहे.

---



# झुनझुनवाला घराणे व त्याचा इतिहास

माझे पती पुरुषोत्तमजी ह्यांना दैनंदिनी लिहिण्याची सवय होती असे काही म्हणता येणार नाही. तरी महत्वाच्या नोंदी ते करीत असत. त्याचाच आधारे ही माहिती देते आहे.

खामगांव विदर्भातील एक जुने शहर. प्रसिध्द नगर. कापसाची बाजारपेठ, धान्याचा व्यापार, मोठी बाजारपेठ त्यामुळे महत्वाचे. तिथे झुनझुनवालांची प्रसिध्द फर्म होती. बक्तावरमलजी ह्यांनी ही निर्माण केली होती. आपल्या ८-१० वर्षाच्या मुलाला जयनारायणला सोबत घेवून ते इकडे आले होते.  साधारणपणे एकोणविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात म्हणजे इ.स.१८२० च्या सुमाराची वेळ असावी. राजस्थानांतील झुंझुनु हे त्यांचे जहागिरीचे गाव. ते सोडून खामगांवला नशिब उजळवायला ते आले. इथेच स्थायिक झाले. खरेतर मुळात तुलस्यानचे अग्रवालच हे. पण झुंझुनुवरून येवून खामगांवी राहिल्याने त्यांना झुनझुनवाला म्हणून लोक ओळखू लागले. त्यावेळी मोगलाई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जालना, औरंगाबाद, हिंगोली या भागात त्यांचा व्यापार होता. आज ह्या भागाला मराठवाडा म्हणतात. खूप सुधारला तो भाग. पण तेव्हा मात्र फिरता व्यापार चाले. धान्याचा व्यापार करण्यासाठी उंट,  बैल,  बैलगाड्यावर धान्य लादून आणायचे. आणि इकडे आणून विकायचे असे चालायचे. नंतर कापूस, धान्य यांचा ठोक व्यापार ते करू लागले. विदर्भात त्यांनी शेतीही घेतली होती. अकोला जिल्हांतील आकोट तालुक्यातील तेल्हारा, दानापूर, सायखेडा इथे आणि हिंगोली जवळील मौजा इत्यादी गांवात त्यांची खूप शेती तर होतीच शिवाय फर्मच्या व्यापारी शाखाही होत्या. थोडक्यात विदर्भात त्यांनी चांगलेच बस्तान बसविले.

कालांतराने पुत्र जयनारायण मोठा झाल्यावर त्यांचे राजस्थानांत लग्न केले. त्यांना पुरणमलजी, लक्ष्मीचंदजी, प्रेमराजजी, मोतीलालजी, पिरामलजी असे पांच पुत्र झाले होते. मुले तरुण झाल्यावर मोठे तीन मजली, तीन चौक असलेले घर त्यांनी बांधले. त्या घराला आता झुनझुनवालांची हवेली म्हणून ओळखतात.



झुनझुनवाला हवेली, खामगांव

त्यांच्या मुलांत पुरणमल जेष्ठ असून कर्तबगार होते. त्यांच्या काळातच कुटुंबाचा कापूस आणि धान्याचा व्यापार खूप वाढला. गावांत त्यांना मान होता. लोकांवर त्यांचा प्रभाव होता. गावांतील सगळयाच सार्वजनिक, सामाजिक, धार्मिक संस्थात ते प्रमुख होते. पुढाकार घेऊन ते कार्य करीत होते. गावातील कोणत्याही महत्वाच्या कामात त्यांचा सल्ला महत्वाचा असे. सार्वजनिक कामाला पैशाची सतत गरज असते. त्यासाठी कायम देणगी ते देत असत. त्यांचे चारही भाऊ व्यापारांत मदत करीत असत. तसेच इतरही ठिकाणी त्यांचा सहभाग असे. पुरणमलजी अत्यंत करारी स्वभावाचे म्हणून प्रसिध्द होते. स्वाभिमानी, दयाळू, सहिष्णू, मिळूनमिसळून वागणारे होते. सर्वांना बरोबर घेऊन कार्य ते करीत.

खामगांवच्या नगरपालिकेच्या स्थापनेपासूनच म्हणजे इ.स. १८७६ पासूनच ते नगरपालिका सदस्य होते. इ.स. १८७६ ला ते सदस्य होते. नंतर त्यांचे बंधू लक्ष्मीचंदजी इ.स. १९०३ मध्ये नगरपालिका सदस्य झाले. त्यानंतर त्याचे पुत्र हरिप्रसादजी लक्ष्मीचंदजी इ.स. १९१९ ते १९२३ पर्यंत सभासद झाले. त्यानंतर इ.स. १९३१ते १९३४ मध्ये नंदुलाल तोडरमल सभासद होते. नंतरही १९३७ पर्यंत त्यांचे सदस्यत्व होतेच. नंतर मी स्वतः इ.स. १९६४ ते १९६७ पर्यंत सदस्य होते. पण मी निवडून आले होते.

आपला देश तेव्हा पारतंत्र्यात होता. त्यामुळे येणारे सरकारी अधिकारी एकतर इंग्रज असत किंवा पारशी. नवीन बदलून येणारा अधिकारी किंवा कार्यालयीन दौरा करणारा अधिकारी खामगांवी आला तर झुनझुनवालांची भेट घेतल्याशिवाय राहत नसत. त्यांच्या कामकाजाबद्दल सल्ला, मतही विचारले जाई. गावाची एक पंचायतही होती. त्यातील प्रमुख सदस्यही ह्यांच्यातील एखादा असेच. खामगांवी एखादे नवे काम किंवा योजना कार्यान्वित करायची असेल, तर ह्यांचे मत विचारात घेतले जाई. प्रत्येकच सभा, कार्याला यांची उपस्थिती आवश्यक समजली जाई. चांगल्या कोणत्याही कामाला योग्य तो सल्ला व आर्थिक मदत ह्यांच्याकडून मिळे.

गांव मोठे होते. विविध कार्यक्रम, उपक्रम राबविले जात. तसेच लोकांची वैयक्तिक मोठी कामेही असत. परंतु अशा सार्वजनिक कार्यक्रमासाठी मोठी प्रशस्त जागा उपलब्ध नव्हती. म्हणून झुनझुनवाला परिवाराने स्वखर्चाने एक धर्मशाळा बांधून दिली. ‘पुरणमल धर्मशाळा’ म्हणून लोक तिला ओळखत असत. गावांतील कोणत्याही सामाजिक, धार्मिक, राजकीय कामासाठी, कुणाच्याही वैयक्तिक कामासाठी, जातपातधर्मपंथ असा भेद न करतां कोणताही मोबदला न घेता वापरायला दिली जाई. कितीतरी यज्ञयाग होमहवन, धार्मिक कार्यक्रम, सामाजिक, सार्वजनिक कार्यक्रम, विवाहादी मंगलकार्ये या धर्मशाळेत संपन्न झाले आहेत. गावातील सुरवातीची सार्वजनिक कार्यांची सुरुवात इथेच झाली आहे.

भारतीय स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या काँग्रेस कमिटीच्या इ.स. १९२१, १९३०, १९३२, १९४२ मध्ये सभा इथेच झाल्यात. शहरी आणि उपविभागीय काँग्रेस कमेटीचे कार्यालय,



पुरणमल धर्मशाळा, खामगांव

काँग्रेसचे लवाद कोर्ट, काँग्रेसचे स्वयंसैनिकाचे कार्यालय इथेच होते. तसेच काँग्रेसच्या स्वयंसेवक शिबिरासाठी ही धर्मशाळा खुले आम वापरली जात असे.

काँग्रेसच्या ह्या कार्यक्रमांना जागा देण्याबाबत सरकारी प्रतिबंध असूनही धर्मशाळेच्या संचालकांनी त्या आदेशाकडे दुर्लक्ष केले व कार्य सुरूच राहिले. एक प्रकारे सरकार विरोधात उघडउघड कार्याची सुरुवातच म्हणायला हवी ही. खामगांवातील कोणत्याही नव्या संस्थेच्या सार्वजनिक कार्याला इथूनच सुरुवात होई. त्या संस्थांची कार्यालये ३-३ वर्षे इथेच राहिली. जोपर्यंत त्यांची स्वतंत्र व्यवस्था होत नाही तो पर्यंत 'पुरणमल धर्मशाळा' आधार देत असे.

या संस्थेत उदयाला आलेल्या ८-९ संस्था तर मला माहित आहेतच. प्रताप वाचनालय, मारवाडी वाचनालय, टिळक राष्ट्रीय विद्यालय, नगरपालिका, ए.व्ही. स्कूल, नॅशनल हायस्कूल ज्याला आज अरजण खिमजी नॅशनल हायस्कूल म्हणून ओळखतात, नाथीबाई छात्रालय, शिशू मंदिर खामगांव. तसेच देशाला स्वातंत्र्य मिळाले. फाळणी झाल्यावर भारतात परतलेल्या सिंधी निर्वासितांनाही इथेच ४-५ वर्षे आधार दिला होता. थोडक्यात असे म्हणता येईल की, खऱ्या अर्थाने ज्याला सामाजिक कार्य म्हणता येईल, ते इथे चालत होते.

सरकार विरोधात कार्य करतांनाच शिक्षण क्षेत्रांतही कार्य करणे सोपे नव्हते. पण देणाऱ्याचे हात बळकट असले तर कार्य यशस्वी होते यांत शंका नाही. 'निश्चयाचे बळ, तुका म्हणे तेची फळ' याचे उदाहरण म्हणजे ही धर्मशाळा होय. याच काळात खामगावांत झुनझुनवाला कुटुंबाने धार्मिक प्रवृत्तीच्या लोकांना पूजापाठ करता यावेत म्हणून बोर्डी नदीच्या काठावर, ज्याला आज फरशीवरील हनुमान मंदिर म्हणून ओळखतात त्याची निर्मिती केली. 'वीर हनुमान मंदिर' म्हणजे धार्मिक प्रवृत्तीचे असूनही आधुनिक विचारसरणी स्वीकारणाऱ्या ह्या परिवाराचे उत्तम चित्र होय.



वीर हनुमान मंदिर, खामगांव

'राखावी बहुतांची अंतरे, भाग्य येते तदनंतरे' सामाजिक कार्य करू इच्छिनाऱ्या, सार्वजनिक कार्यात रस असणाऱ्या लोकांनी हा आदर्श समोर ठेवला पाहिजे. लोकांनी वीर हनुमानाला जागृत, मनोकामना पूर्ण करणारे ठरवले. गर्दी वाढू लागली. विद्वान पंडितांची, अभ्यासपूर्ण कीर्तने, प्रवचने, व्याख्यानेही इथे होऊ लागली. पूर्वी फक्त हनुमानाची मूर्ती इथे होती. आता राममंदिर, शिव मंदिर, विठ्ठल मंदिर, राणी सती मंदिरही झाले आहे. गावांत

मध्यवर्ती असणारे हे मंदिर आजही गजबजलेले असते.  ह्या मंदिरांत सर्वांनाच मुक्त प्रवेश आहे. ही सगळी प्रगती पूर्णपणे जरी नाही तरी मंदिर संदर्भातील नंतरची मंदिरे सोडल्यास पुरणमलजींच्या कारकीर्दीतच झाली. त्यानंतर लक्ष्मीचंदजींनीही तो परिपाठ सुरु ठेवला. एक कर्तबगार नेता म्हणून त्यांनी नांव कमविले.

यानंतरची पिढीही कार्यरत झाली. पुरणमलजी व त्यांची पत्नी त्यांना प्यारीबाई नावाची मुलगी होती पण मुलगा नव्हता. म्हणून त्यांनी आपला धाकटा भाऊ पिरामल यांचा तोडरमल नावाचा मुलगा दत्तक घेतला. लक्ष्मीचंदजी ह्यांना दगडचंद नावाचा मुलगा झाला होता. पण तो अल्पायुषी ठरला. त्यांनीही पिरामलजींचा हरिप्रसाद नावाचा मुलगा दत्तक घेतला.

त्याकाळी खामगांवात इंग्रजी चौथी म्हणजे आजच्या आठवीपर्यंत शिक्षणाची सोय होती. हरिप्रसाद यांनी ८ वीपर्यंत इथेच शिक्षण घेवून मॅट्रिकची परीक्षा खाजगीरित्या उत्तीर्ण करून नागपूरला मॅारिस कॅालेजात  प्रवेश घेतला. बी.ए. प्रथम वर्षाचे शिक्षण पूर्ण झाल्यावर तेथील इंग्रज प्राचार्यांशी खटके उडू लागल्याने शिक्षण संपविले. ते खामगावी परतले.घराण्यांतील सामाजिक कार्यात ते रस घेऊ लागले. कांही वर्षे खामगांव नगरपालिकेत सदस्य होते. नंतर मानद कार्यवाह झाले. नंतर त्यांनी उपाध्यक्ष पदही भूषविले. ह्याच काळखंडात गांधीजींचे कार्य देशभर जोरात सुरु होते. नागपूर काँग्रेस नंतर कापडी तंबूत होणारी अधिवेशने बंद करण्यांत आली. कारण लोकांचा सहभाग वाढू लागला. हजारोंच्या संख्येत लोक सहभागी झाल्याने खुले अधिवेशन सुरु झाले. हरिप्रसाद ह्यांचा सक्रीय सहभाग त्यात असे. नागपूर अधिवेशनाला लाला लजपतराय आणि विपिनचंद्र पाल आले होते. लोकमान्य टिळकांचा कांही महिन्यापूर्वीच मृत्यू झाला होता. देशबंधू चित्तरंजनदास, मोतीलाल नेहरू आदी लोक आपल्या सहकाऱ्यासमेत आले होते. त्यांचा गांधींच्या बहिष्कार किंवा असहकाराच्या ठरावाला विरोध होता. हे अधिवेशन खूप गाजले. लोकांत देशप्रेमाची लाट निर्माण झाल्याचे दिसत होते. ह्या काळात ते नागपूरला महाविद्यालयात शिकत होते. मारवाडी वसतिगृहात राहत होते. ह्या सगळ्या वातावरणाने ते भारावले होते. हेच कारण त्यांचे शिक्षण थांबवायला कारणीभूत ठरले.

याच कालखंडात माझे काका जमनालालजी बजाज ह्याच्यांशी त्यांचा उत्तम परिचय झाला. त्यामुळे गांधीशी संपर्कही साधला गेला. त्यांनी पूर्णपणे खादीचा स्वीकार केला. आयुष्यभर ते व्रत सोडले नाही. स्वदेशीचा वापर सुरु केला. त्यांनी ठरविले की बुलडाणा जिल्ह्यात गांधीजींच्या विचारांचा आणि कार्यक्रमांचा प्रचार प्रसार करावयाचा. त्याप्रमाणे बुलडाणा जिल्हा काँग्रेस कॉन्फरन्स घेण्याचे ठरविले. सर्वांच्या अनुमतीने श्रीमान जमनालालजी

बजाज ह्यांना मार्गदर्शनासाठी प्रमुख अतिथी म्हणून आणण्याचे ठरविले. तेही हरीप्रसादांच्या म्हणण्याला होकार देऊन आले. त्यांचे शानदार स्वागत तर झालेच. शिवाय यशस्वी अधिवेशनही पार पडले. अधिवेशनांत गांधींच्या चतुःसुत्रीचा कार्यक्रम राबवून यशस्वी करण्याचे ठरले. ह्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष खामगांवचे डॉ. पारसनीस होते. जनरल सेक्रेटरी होते हरिप्रसादजी.


नागपूर अधिवेशन, बुलडाणा अधिवेशन यांत केलेल्या ठरावानुसार विचारांचा प्रचार व प्रसार करणे महत्वाचे होते. त्यासाठी प्रखर देशभक्ती असणारे फर्डे वक्ते वीर वामनराव जोशी, पं. पन्नालाल व्यास, अर्जुनलालजी शेट्टी यांची व्याख्याने जिल्ह्यात अनेक ठिकाणी करण्यात आली. बुलडाणा जिल्हाही देशप्रेमाच्या लाटेत कार्यरत झाला. तरुणांनी शासकीय न्याय व्यवस्थेवर बहिष्कार टाकायला सुरुवात केली. परदेशी कापडांच्या होळया पेटू लागल्या. सरकारी शाळांतून तरुण बाहेर पडू लागला. या तरुण मुलांसाठी शाळांची गरज भासू लागली. त्यातून खामगांव येथे टिळक राष्ट्रीय विद्यालयाची स्थापना झाली. कोर्टांवर म्हणजे न्यायालयांवर बहिष्कार टाकल्यामुळे आपआपसातील झगडे भांडणे मिटविण्यासाठी काँग्रेसप्रणीत लवादकोर्ट खामगांवी निर्माण करण्यात आले. सूत निर्माण करण्यासाठी, खादीचे कापड विणण्यासाठी ‘चरखा, करघा’ भवनांची निर्मिती झाली. या सर्व संस्थासाठी ‘पुरणमल धर्मशाळा’ वापरली जाऊ लागली. तसेच त्याच्या बाजूला असणारी मोकळी जागाही मोबदला न घेता वापरण्यास दिली. आर्थिक मदतीचा हातही पुढे होताच. हरीप्रसादांच्या सक्रियतेने कार्याला गती मिळाली.

नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनांत असेही ठरले होते की, सरकारी पदांचा त्याग करावयाचा. खामगांवात त्यावेळी डॉ. पारसनीस आणि गुलाम यासीन खान ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. हरीप्रसादांच्या प्रेरणेने व प्रयत्नांनी त्या दोघांनी आपल्या पदांचा त्याग केला. तसेच ह्याच अधिवेशनात हिंदू मुस्लीम ऐक्याची घोषणा करून तसा ठराव पास केला होता. त्या विचारांचा मागोवा घेत प्रसार व प्रचार करण्यांसाठी अलीबंधू पैकी मौलाना शौकत अली यांना जिल्हा काँग्रेस कमेटीच्यावतीने बोलावण्यात आले होते. खामगांवांत त्यांची सभा टिळक मैदानात घेण्यात आली. सभेला खूप लोक आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी हरिप्रसाद होते. इ.स.१९२७ मध्ये गांधीजी खादी प्रसाराच्या दौऱ्यासाठी जिल्ह्यात येऊन गेले. तसेच इ.स.१९३३ मध्ये १५ ते २२ नोव्हेंबर पर्यंत विदर्भ मध्यप्रदेश दौऱ्यावर आले होते. दोन्ही वेळी ते खामगांवला येऊन

गेले होते. त्यावेळी हरिप्रसादजी यांनी हरिजनांसाठी मंदिरे, पाण्यासाठी विहिरी देण्यासंदर्भात भरघोस मदत केली होती. त्याचवेळी परिवारच्या मालकीची जलालपुऱ्यातील विहीर आणि फरशीवरचे वीर हनुमान मंदिर हरिजनांसाठी त्यांनी खुले केले होते.

पुढे कांही वर्षांनी हरिप्रसाद काँग्रेस मधून बाहेर पडले. तरी सामाजिक, धार्मिक, सार्वजनिक कार्यात ते भाग घेत राहिले. अखिल भारतीय अग्रवाल समाजाच्या अनेक अधिवेशनांना ते उपस्थित होते. सामाजिक सुधारणांत त्यांना रस होता. तोडरमल, हरिप्रसाद, किसनलाल ही मंडळी सख्खी भावंडे. परंतु तोडरमल, हरिप्रसाद दत्तक गेले. किसनलाल मागे राहून शांतपणाने कुटुंबाची व इस्टेटीची देखभाल करत शांतपणाने जगत होते. त्या तिघांचे चौथे बंधू होते सुखलाल, पाचवे बंधू होते पुरुषोत्तमजी. हे दोघे राजकारणांत सहभागी झाले होते. त्यांना काँग्रेसच्या कामात रस होता. त्यात ते सक्रीय झाले होते. आयुष्यभर खादीचा प्रचारप्रसार त्यांनी केला. 'छोडो भारत' आंदोलनांत त्यांना अटक झाली होती. सुखलालजींना पुढे 'चले जाव'च्या  चळवळीत १३ ऑगस्ट १९४२ ला अटक झाली आणि ८ सप्टेंबर १९४३ पर्यंत, जवळजवळ तेरा महिने काँग्रेसच्या कार्यात साथ देतात ह्या आरोपाखाली जबलपूर येथे इंग्रज सरकारने त्यांना कारागृहात ठेवले होते.

अशा देशप्रेमाची पार्श्वभूमी असलेल्या घराण्यात आणखी अधिक कर्तृत्ववान, ध्येयनिष्ठ, स्वाभिमानी, दृढनिश्चयी, कुणाच्याही हुकूमतीची पर्वा न बाळगणारा निर्भीड पुत्र जन्माला आला. सुशिक्षित तर होताच. शिवाय अतिशय बुद्धिमान, निरालस सेवावृत्तीचा, धैर्यशील असाही होता. चार नोव्हेंबर १९०४ मध्ये धनत्रयोदशीच्या दिवशी त्यांचा जन्म झाला होता. विक्रमसंवत १९६१ हिंदू वर्ष होते. त्यांच्याशी माझा विवाह झाला. आमचे सहजीवन त्रेपन्न वर्षांचे होते. पतीचे नाव पुरुषोत्तमजी होते. नावाला शोभेल असे व्यक्तिमत्व होते.


वंशावळ
जीतमलजी
रामरायजी
शालीग्रामजी
बक्तावरजी
जयनारायणजी
पुनमलजी
तोडरमलजी
प्यारीबाई
लक्ष्मीचंदजी
दगडचंदजी
हरिप्रसादजी
प्रेमराजजी
दत्तराजजी
डोंगरसीदासजी
पीरामलजी
किसनलालजी
सुखलालजी
मोतीलालजी
मुलीबाई
रामीबाई
शामीबाई
पुरुषोत्तमजी
डॉ. जगदीश
मनीष
सचिन
Holden
Tierney
Kieran
Declan
डॉ. सुधा
डॉ. सुबोध
राजीव
सिद्धांत
ध्रुव
अनन्या
रमेश
रितु
समीर
शिवालिक
विशाखा
अशोक
डॉ. आनंद
भरत
ख़ुशी
हर्ष

## पती परमेश्वर

पती संदर्भात विचार करतांना आर्थिक निकष तसा दुय्यमच होता. माझे काका जमनालालजी बजाज ह्यांच्या पाहण्यातील एक सच्चा सामाजिक कार्यकर्ता, देशभक्त ह्या दृष्टीनेच त्यांनी निवड केली होती. स्वातंत्र्यलढयाशी त्यांची जुळलेली नाळच खूप महत्त्वाची ठरली होती. ह्या सगळयाचा अर्थ असा होता की, स्वातंत्र्य मिळेपर्यंत, कदाचित् त्यानंतरही त्यांच्या आयुष्यात प्रपंच दुय्यमच राहणार होता. तेवढा विचार मला करता येत होता. मनाची तशी तयारी करूनच विवाहाला संमती होती माझी.

प्रत्यक्ष प्रपंचाला सुरूवात झाल्यानंतर लक्षात आले की घराला स्वातंत्र्यलढ्याची, सामाजिक जाणीवेची पार्श्वभूमी असली तरी माजघराच्या आतील वातावरण अत्यंत सनातनी होते. पतीचे घराकडे कमी, लढ्याकडे अधिक लक्ष होते. पण त्याचे मी वाईट कधीच वाटून घेतले नाही उलट असा देशभक्त पती मिळाला म्हणून अभिमान वाटायचा. स्वतःला मी भाग्यवान समजायचे.

त्यांचा विवाह ते शाळकरी असतांनाच व्हायचा होता. घरात तशी तयारीही होती. ते टिळक राष्ट्रीय विद्यालयात मॅट्रीकच्या वर्गात शिकत होते. त्यांना नागपूर येथील झेंडा सत्याग्रहात भाग घ्यायचा होता. परंतु आई, भाऊ वगैरे जाऊ देणार नाहीत असे वाटत होते. त्याच सुमारास यवतमाळ येथील मूलचंदजी चोखाणींचे लोक विवाह मुद्याचा नारळ व रूपया घेवून आले. त्यांना विवाह करावयाचा नव्हता. तसे घरातल्यांना त्यांनी सांगितलेही होते. परंतु घरातल्यांचा विचार विवाह करण्याचाच होता. यातून सुटण्यासाठी घरून पळून जाण्याचा विचार त्यांनी केला. नागपूरला जावे म्हणजे एका दगडात दोन पक्षी मारता येतील. विवाहातून सुटका आणि झेंडा सत्याग्रहांत सहभाग साधेल. म्हणून दुपारीच घरून पळाले. दिवसभर गावांत लपून राहिले. रात्रीच्या गाडीने नागपूरला पोहोचले.

इकडे घरी सगळेच हट्टी स्वभाव जाणून होते. सगळेच काळजीत पडले. सगळीकडे शोध घेतला. नंतर नागपूर तार केली. त्यामुळे सत्याग्रहात भाग न घेता परत यावे लागले. परंतु दर्शक म्हणून सत्याग्रहाचे दर्शन झाल्याचाही त्यांना आनंद झाला होता. विवाह त्यावेळी राहून गेला होता.

माझ्याशी विवाह झाला. आमच्या दोघांच्या वयात जवळ जवळ १५-१६ वर्षांचे अंतर होते. स्वभावाने ते रागीट होते. त्यामुळे सुरूवातीला त्यांची भीती वाटायची. नंतर सहवासातून कमी होत गेली. आम्ही दोघेही चर्चा करून, निर्णय घेत असू. चर्चा करतांना न पटलेल्या मुद्यांवर वाद व्हायचे पण असे प्रसंग कमीच होते. परस्परांवर पूर्ण विश्वास होता. त्यामुळेच ते कारावासात असतांनाही मी अनेक निर्णय घेऊ शकले. तो काळच असा होता की, पतीला परमेश्वरच मानले जात असे. पती परमेश्वर हीच सामान्य स्त्रीची धारणा होती. मीही त्याला अपवाद नव्हते. परमेश्वर म्हटल्यावर त्याचे देवत्व मान्य करणे ओघानेच आले. त्याच्या गुणदोषांची चर्चा बंदच. 'चरणोंकी दासी' की भक्त, की आणखी काही. असा विचार माझ्या मनात येतच होता. दासी वगैरे तर माझ्या मनात आलेच नाही, भक्त तर पत्नीला म्हणता येणार नाहीच कारण भक्तीबरोबरच वरदान जोडूनच येते. पतीने प्रसन्न होणे तर कठीणच होते. तरीही एक गोष्ट त्याहीवेळी मला जाणवायची. भक्त परमेश्वर यांचे परस्परसंबंध फार उच्च कोटीचे अभिप्रेत आहेत. पती पत्नी नात्यात ते अशक्यच आहेत. तरीही मी पती परमेश्वर म्हणते कारण माझी परमेश्वराची कल्पना फार वेगळी आहे. माझ्या मनातल्या चांगुलपणाच्या कल्पना देवत्वाशी जुळलेल्या आहेत. त्यात पती बसत होते.



त्यांना माझ्याबद्दल किती आत्मीयता वाटत होती ते त्यांनी कधीहीबोलून दाखविले नव्हते. पण त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची दैनंदिनी माझ्या हाती आली तेव्हा ते कळले. त्यांना दैनंदिनी लिहिण्याची, त्यांत महत्त्वाच्या नोंदी करण्याची सवय होती. त्यांच्या त्या लेखनातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू माझ्या लक्षात आला. अतिशय साधे, प्रामाणिक तर ते होतेच पण त्याशिवाय दुसऱ्यांचे मोठेपण ते सहज मान्य करत. स्वातंत्र्य लढ्यांच्या त्यांनी केलेल्या नोंदीत कुठेही

स्वतःवर अन्याय झाला,  आपण फार मोठे कार्य केले असा उल्लेख नाही. माझ्याबद्दल ते आदरपूर्वक लिहितात. त्यात कौतुक तर आहेच शिवाय सार्थ अभिमानही त्यात आहे. पत्नीला संधी मिळाली असती किंवा कुणी 'गॉड फादर'  पाठीशी असता तर ती आणखी पुढे गेली असती असे ते नुसते लिहितच नाहीत तर तशी खंतही व्यक्त करतात. ते अशा प्रकारे माझ्याबद्दल विचार करीत असतील असे मला कधीच वाटले नव्हते. पण ते एक सच्चे, प्रामाणिक 'कर्ते' कार्यकर्ते होते यात मला शंकाच नव्हती. त्यांनी आपल्या पत्नीवर खूप विश्वास ठेवला ही महत्त्वाची बाब माझ्यासाठी ठरली होती. एका सनातनी, परंपरावादी,  एकत्र हिंदू कुटुंबाची जबाबदारी त्यांनी माझ्यावर सोपविली होती तरीही माझ्या विचारसरणी प्रमाणे वागण्याची संधी, स्वातंत्र्य त्यांनी मला दिले. मी त्यांना घरातील कटकटी कधी सांगितल्या नाहीत ना त्यांनी कधी विचारणा केली. त्यांनी त्यात कधीही लक्ष घातले नाही की कधी कुणाची बाजू घेतली. त्याकाळी ही केवढी मोठी संधी मला त्यांनी दिली होती ते आज अधिक जाणवते. एका अतिशय रागीट, हट्टी माणसाकडून मला केवढी मोठी भेट मिळाली होती.

त्यांची स्वतःच्या विचारांवर निष्ठा होती. काय वाटेल ते झाले तरी चालेल पण माघार घेणार नाही हा स्वभाव होता. शिक्षणासाठी लागणारी लायकी होती. वैद्यकिय शिक्षणासाठी मुंबईला प्रवेशही घेतला होता, पण त्या शिक्षणसंस्थेने ब्रिटिश सरकारचे अनुदान घेतल्याचे कळताच महाविद्यालय सोडण्याचा निर्णय घेतला. तेथील प्राध्यापकांनी त्यांना खूप समजाऊन सांगितले पण त्यांनी ऐकले नाहीच. बी. ए. साठी अहमदाबादला प्रवेश घेतला. असे शिक्षणसाठी घरापासून दूर राहिल्याने प्रकृतीची हेळसांड झाली. त्यातून स्वातंत्र्यलढ्यांत सक्रीय सहभाग, प्रकृतीची अधिकच हयगय झाली. तुरूंगवासाच्या शिक्षेने त्यात भर पडतच गेली. सत्याग्रह करतांना कधी लाठीमार, लाथाबुक्यांचा मार सहन करावा लागला. तुरूंगात तर काय कदाना मिळे. तेथेही आपल्या रास्त मागण्यासाठी उपोषणाचा मार्ग त्यांनी अवलंबलाच.

धारासना मीठ सत्याग्रहात सहभागी झाले तेंव्हा भुसावळ स्टेशनवरच त्यांना अटक करून कारागृहात टाकण्यात आले. त्यावेळी नांव काय असे प्रत्येकाला विचारण्यात आले. त्यावेळी 'आझादीका दिवाना', 'आझाद'  राष्ट्रसेवक अशी उत्तरे अनेकांनी दिली. तसेच धंदा राष्ट्रसेवा,  राष्ट्रभक्ती अशी पुस्ती जोडली होती. असे उत्तर देणाऱ्यांत ते देखील होते. त्यांना धुळे

तुरूंगात पाठविण्यात आले. तेथे खडी फोडणे, तेलघाणी फिरवून तेल काढणे, अशा शिक्षा भोगाव्या लागल्या. तिथे आषाढी एकादशीची झालेली गोष्ट आहे. एकादशीचा उपवास म्हणून गूळशेंगदाणे कैद्यांना देण्याची व्यवस्था होती. कैद्यांचे म्हणणे होते शेंगदाणे भाजून द्यावेत. पण हटवादी तुरूंगाधिकारी कसले ऐकतात! कैद्यांनी 'भारत माता की जय' 'महात्मा गांधी की जय' असे नारे लावून आपला निषेध व्यक्त केला. शेंगदाणे खाल्ले नाहीत. शेवटी सायंकाळी मागण्या मान्य झाल्या. त्यात प्रामुख्याने आमचे पतीदेवच पुढे होते.

त्रिचनापल्ली येथेही कारागृहांत त्यांना ठेवले असतांनाची गोष्ट अशीच आहे. तिथे अधिकारी आयरीश होता. तो सज्जन, समंजस होता. तो व्यवस्थित वागत असे. तेथे राजकीय कैद्यांना त्यांचे जेवण तयार करावे लागे. सगळे धान्य मोजून दिले जाई. मदतीला मदतनीस म्हणून गुन्हेगार कैदी मिळत. ते मद्रासी होते. भाजीसाठी 'तेल' आणण्यास त्याला सांगीतले असता तो धावतच गेला आणि एक जाडजूड लाकूड घेवून आला. त्यांना वाटले हा मारणार आता. पण तो घाबरून गेला होता. थोड्यावेळाने कळले की मद्रासी भाषेत 'तेल म्हणजे विंचू' तो मारण्यासाठी आला होता. पण असे मजेचे क्षण तुरूंगात कमीच आले असे ते सांगत. तिथे असतांनाच आणखीन एक गोष्ट घडली. त्यावरून त्यांचा निडरपणा, धाडसीपणा दिसून येतो. त्या सर्व कैद्यांना त्रिचनापल्लीहून नागपूरला आणत होते. मद्रासला सगळे पोहोचले. गाडीला चांगलाच वेळ होता. स्टेशन सोडून कुणी कुठे जाऊ नये अशी आज्ञा असूनही ही मंडळी 'अड्यार' येथे जाऊन आली, तेथील आश्रमांत ॲनी बेझंट होत्या. महात्माजींशी त्यांचे मतभेद असूनही त्यांनी 'चळवळ यशस्वी होवो' असा आशिर्वाद दिला होता. अर्थात सर्व परत मद्रास स्टेशनवर पोलीसांच्या स्वाधीन झाले असा त्यांचा स्वभाव आणि असे स्पष्ट मोकळे वागणे असे.

खामगावला जंगल सत्याग्रहाच्या प्रसंगी त्यांना अटक झाली. तेथे पोलीस कोठडीत ठेवले गेले. अन्नपुरवठा करणारा मुसलमान होता. तो सामिष आणि निरामिष अन्न एकत्र चमच्याने वाढत असे. त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. त्याने ऐकण्याचा प्रश्नच नव्हता. शेवटी उपवासाचे हत्यार वापरुन त्याला धडा शिकविला त्यांनी.

अकोला तुरूंगात प्रकृती अधिक बिघडू लागली. गनीक्लोदस्, सॉलीटरी सेल, दंडाबेडी, नमक रोटी सारख्या शिक्षा त्यांना दिल्या जात. गनीक्लोदस् विरोधात 'नंगे' राहण्याचा

प्रयोगही त्यांनी केला होता. असे पतीराज माझ्या अभिमानाचा विषय झाले होते. हे सगळे जरी खरे असले तरी त्यामुळे त्यांना कायमस्वरूपी दम्याचा विकार झाला. त्यांच्या दुखण्यात मी खूप सेवा केली. 'सेवा करणे' हा तोपर्यंत माझा स्थायी भाव बनला होता. त्याची कारणे अनेक आहेत. मुख्य म्हणजे काका जमनालालजी बजांजांच्या सानिध्यात आणि महिला आश्रममध्ये राहिल्याने सेवा करणे ओघाने आलेच. स्त्री सेवाभावी असावी ही अपेक्षा आजही आहेच. त्यामुळेही नमते घेवून वागायची मी सवय करून घेतली होती. खरे तर स्त्री मुळातच नम्र, कामसू, सहकार्य करणारी, स्वतःकडे कमीपणा घेवून तडजोड करणारी असते. माझा स्वभावही तसाच होता. लहानपणापासून असे राहिल्याने सहज मिळू शकणाऱ्या अनेक गोष्टी मला मिळाल्या नव्हत्या. जाणीव झाली होती की, मन कितीही दुखावले तरी त्याला पर्याय नाहीच. साहजिकच सेवा करणे हाच उपाय असे. सासरी आल्यावर हेच बाळकडू मला संसारातून तरून जाण्यास उपयोगी पडले. घरांतील वडिलधाऱ्यांशी माझा वैचारिक मतभेद होता. ते काही माझे शत्रू नव्हते. त्यामूळे त्यांच्याशी मी उध्दटपणाने किंवा त्यांचा अपमान होईल असे कधीच वागले नाही. मनापासून त्यांची सेवा केली. त्याचा फायदा एवढाच झाला की, घरातला विरोध संपला नाही तरी त्याची धार बोथट व्हायला मदत झाली. पतीचीही सेवा त्यामुळे करतांना काही विशेष आपण करतोय असे वाटलेच नाही. त्यांचे पथ्यपाणी मी खूप व्यवस्थित पाळत असे. त्यांना नागपूर, मुंबई येथे औषधोपचारासाठी न्यावे लागे. मीच त्यांना नेत असे. त्यात कुठेही थोडीशी उणीव होणार नाही असा माझा प्रयत्न असे.

नागपूरला डॉ. बेरी यांचे उपचार सुरू असत. दम्याचा विकार असल्यामुळे वेळोवेळी नागपूरला आम्ही जात असू. पण मी कधीही माहेरी जाऊन राहिले नाही किंवा माझी मुलेही तिथे ठेवली नाहीत. पतीदेखिल माझ्या या विचारांशी सहमत असत. माझी व्यथा ते समजून असत. एकदा काहीतरी करतांना ते छतावरून खाली पडले तेव्हा ऑपरेशन करून घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. तेव्हा मुंबईला डॉ. बालीगा म्हणून एक सर्जन येत असत. ते मद्रासला असत. त्यांची मुलाखतीची वेळ घेवून त्यांच्याकडून पतीराजांचे ऑपरेशनही मी करून घेतले होते. त्यासाठी पत्रव्यवहार वगैरे मीच केला. इतर आर्थिक व्यवहार मीच बघितले. येथे एक नोंद करायला हवी की मी सर्व करतांना सासरच्या लोकांनी माझ्यावर खूप विश्वास तर ठेवलाच शिवाय अडथळेही आणले नाहीत.

दम्याचा विकार फारच धोकादायक, काळजी करण्यासारखाच. त्यांना मी खूप जपले. हवेतील  थोडाही बदल त्यांना सहन होत नसे. सेवावृत्तीचे महत्त्व मला कळले होतेच. माहेरी असतांनाच ते माझ्या लक्षात आले होते. बापूजींच्या प्रत्यक्ष सहवासांत खूप रहायला मला मिळाले नाही तरी त्यांचे सेवेचे व्रत, स्वच्छता संदर्भातील विचार अनुभवले होते. 'सेवेने माणूस झिजत नाही. सेवेने दुखणेकऱ्याला कुणीतरी आपल्याजवळ आहे ह्या जाणीवेने हायसे वाटते' असे ते म्हणत.

खरे म्हणजे एका स्त्रीने मोठ्या शहरी जाऊन असे काम करणे आजही सोपे नाही. त्यावेळी मी हे सर्व करू शकले, धाडसीपणाने निर्णय घेवू शकले. त्याचे कारण सर्वांचा विश्वास तर होताच पण प्रामुख्याने पतीचा विश्वास म्हणायला हवे. मी चुकीचे पाउल टाकणार नाही असे म्हणत ते. त्यातूनच मला आत्मबळ मिळत गेले. आत्मविश्वास वाढत गेला.   त्यांच्या तुरूंगवासाने तो विश्वास अनाठायी नव्हता हे सिध्द केले आहे. माझी त्यांच्यावर खूप निष्ठा होती.

माझी पतिनिष्ठा घरीदारी सगळीकडे सर्वच जाणून होते. कर्तव्यदक्षता हा गृहिणीचा मूलभूत गुणधर्म असायला हवा असे माझे मत आहे. कारण स्त्री हा घराचा कणा असते. तिचा ताठपणाच घराला आत्मसन्मान मिळवून देतो. मी पतीला अंधारात ठेवून कधीही निर्णय घेतले नाहीत. त्यांच्याशी चर्चा, विनिमय करूनच पुढे पाउल टाकत असे. माझ्या माहेरीही स्वातंत्र्य लढयाचे वातावरण होते. परंतु सासरचे माझ्या पतींचे स्वातंत्र्यलढयांचे संस्कार माझ्यावर जास्त झालेत. मला त्याचा अभिमानही वाटतो.

महात्माजींवर माझी खूप निष्ठा होती. पतींचेही ते आदर्श होते. तुरूंगातील त्यांनी केलेले 'सत्याचे प्रयोग' त्याची साक्ष होती. आपल्याला तसे सेवा कार्य करायला मिळावे असे वाटे पण माझ्या वाटयाला आलेले सेवाकार्यही माझा कस पहातच होते. लोक म्हणतात, 'करा सेवा, मिळेल मेवा'  मला मात्र तो मेवा कधीच मिळाला नाही. माझ्या मनाने या सर्व ठिकाणी मला खूप साथ दिली. म्हणूनच माझा तोल मला सांभाळून यश मिळविता आले. अर्थात वाचनाचा छंदही मदतीला होताच म्हणा.

पती कारागृहात जाण्याआधी आणि गेल्यानंतरही आमच्या घरी येणारे जाणारे भरपूर असत. प्रामुख्याने स्वातंत्र्यलढ्यात भाग असणारे क्रांतीकारक अधिक असत. वेळी अवेळी ते येत. त्यांचे राहणे, त्यांचे खाणेपिणे त्यांची सेवा सारेच मी मनापासून केले. आपले परम कर्तव्य ते आहे असे मला वाटायचे. ज्या स्वातंत्र्याची वाट आम्ही आतुरतेने बघत होतो ते मिळालेही. पण ज्या स्वातंत्र्यासाठी अनेक हुतात्मे झाले, गोळीबाराला लाठीमाराला सामोरे गेले त्या सगळयांच्या आशा अपेक्षा कितपत पूर्ण झाल्या हा प्रश्नच झाला. काळ कुणासाठीही थांबत नसतो हेच खरे आहे. आता आम्ही उरलेल्या प्रपंचाचा विचार करणार होतो. मुलं हुशार, समंजस, कष्टाळू होती. आपले आईवडिल कांही वेगळे, निराळे आहे इतपत समज त्यांना होती.

माहेरी वर्ध्याला असतांना गांधी दाम्पत्याला पाहण्याची संधी मिळाली होती. त्यामुळे आदर्श पतीपत्नी संदर्भात माझ्या कांही धारणा होत्या. त्या सर्वांच्या कसोटीला माझे पती पुरेपूर उतरले होते यात शंकाच नाही. त्यामुळे वर सांगितलेल्या माझ्या प्रपंचातही मी खूष राहू शकले. त्यांच्यावर माझे प्रेम होते, निष्ठा होती. त्यांनी स्वीकारलेल्या कार्याला, व्रताला माझा पाठिंबाही होता. सहकार्यही केलं. पण एका प्रसंगी मी त्यांच्याशी खोटे वागल्याचे मला वाईट वाटते. मुलीच्या वैद्यकीय शिक्षणासाठी आम्ही दोघी, मायलेकींनी नाटक केले होते. मुलीला तसे करण्यास प्रवृत्त केले होते. पण त्यात पतीची फसवणूक करण्याची, दिशाभूल करण्याचा हेतू नव्हता.

विवाह ही स्त्रीकरिता केवढी कठीण गोष्ट आहे! लग्न म्हणजे स्त्रीसाठी एकमार्गी तडजोड. पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्री कायमच दुय्यम स्थानी असते. १९३६ साली आमचा विवाह झाला. तो माझा कल, आवड पाहून ठरविला होता. पण झुनझुनवाल्यांचे घर, त्या घरातली माणसं, विशेषतः स्त्रिया ह्या संदर्भात थोडीही कल्पना नव्हती. साधारणपणे मारवाडी कुटुंबातील वातावरण असावे अशी अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात दोन टोकांवरचे जीवन वाट्याला आले. घराशी जुळवून घ्यावे लागणरच होते. वाचन भरपूर केले होते. तरीही आपले घर, प्रपंच या संदर्भात फारसा विचार कधी केलाच नव्हता. स्वप्न बघण्याचा प्रश्नच नव्हता. कारण तो काळच असा होता. स्त्रीचे काय पुरूषदेखील असा विचार करीत नव्हते. पण ती भिन्न वाटणारी विचारसरणी योग्यच होती असे आजचे जीवन पाहून मला वाटते. निर्व्यसनी, उद्यमशील,

शिकलेला, नीतीमान,  स्वतःच्या पायावर उभे राहण्याची हिम्मत असलेला वर असावा अशी अट असे. हया सगळयात नावाप्रमाणेच ‘पुरूषोत्तम’  माझे पती होते. त्यांचा जन्म १९०४ सालचा. विवाहोत्तर आमचे सहजीवन ५३ वर्षांचे होते. त्याला खूप सुखद जरी म्हणता आले नाही तर उत्तम, यशस्वी ते होतेच.

सतत स्वातंत्र्यलढा हाच विचार समोर ठेवल्याने प्रपंचातल्या जबाबदाऱ्या माझ्याकडेच होत्या. नंतर त्याच्याशी फारसे जुळवून न घेतल्यानेही ते क्षेत्र माझेच राहिले होते. पण आता आम्ही प्रवास करू लागलो होतो. मुलांबरोबर वेळ घालवू लागलो. वेळ मिळेल तेव्हा आम्ही सायकलीवर भटकायला जात असू. जेवणचा डबा तयार करून घ्यायचा,  तीन सायकली घ्यायच्या अन् आम्ही निघायचो. कुटुंबातील सहाजण, पती, मी, मोठी मुलगी सायकल चालवायचो. तो आनंद, ती मजा केवळ अवर्णनीय. पतींनी एकटयाने भारतभर खूप प्रवास केला होता. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या १०/१२  अधिवेशनांना ते उपस्थित राहिले होते. आम्ही दोघ त्या मानाने कमीच फिरलो. तरीही पुण्याला गेलो. सिंहगडावरही जाऊन आल्याचे चांगले आठवते. परळी वैजनाथला गेलो होतो. तिथे देवासमोर पैसेही ठेवले होते. माझ्या दृष्टीने हा मंदिराचा कार्यक्रम वेगळीच अनुभूती होती. काश्मीरला जाऊन आलो. पण विमान प्रवास करायची इच्छा राहिलीच. मुलाचा परदेशातील प्रपंच पाहायला जायची इच्छा होती पण प्रकृती अस्वास्थ प्रथम पतीचे,  नंतर माझे स्वतःचे,  त्यामुळे जमले नाही. बद्रीनाथ, केदारनाथ पाहण्याची इच्छा जरी अपुरी राहिली तरी खूप प्रवास झालाच. जमेल तेंव्हा मुलांनाही बरोबर नेत होतो.

आपल्या नातलगांशी भांडण करावे,  त्यांना विरोध करावा असे त्यांना कधीच वाटले नाही. परंतु जेव्हा आमच्या राहत्या जागेचा प्रश्न आला तेव्हा ते आपण सगळे सोडून देऊ म्हणाले होते. मी मात्र त्याला विरोध केला. जे आपल्या हक्काचे आहे. ते का सोडायचे? आपल्या मुलांचाही हक्क त्यावर आहे हे मी त्यांना पटवून दिले. तसेच त्यासाठी कोर्टकचेऱ्याही कराव्या लागल्या. त्यावेळी मी त्यांच्या सोबत राहिले. मला चांगलंच आठवते. एकदा कोर्टात त्यांना मारण्यासाठी ६० एक लोक काठ्या घेवून आले होते. दिल्लीपर्यंत कोर्टकचेऱ्या करून आमचे हक्क आम्ही मिळविले. कोर्टात निकाल आमच्या बाजूला लागल्यावरच आम्ही शांत झालो. त्यांच्या इतकीच हट्टी,  जिद्दी मी आहे. सत्यासाठी आग्रही मीही होतेच. त्यामुळेच हा प्रश्न मार्गी लागू शकला.

मृत्यूपत्र संदर्भातही असेच झाले. मृत्यूपत्र कशाला हवे?. त्याची गरज नसावी असे त्यांचे मत होते पण मला ते अमान्य होते. मी त्यांच्या खूप पाठीस लागले त्यांच्या मृत्यूपूर्वी पंधरावर्षे मृत्यूपत्र करवून घेतले होते. त्यांच्या विरोधातील दुसरी बाजू कशी चुकीची आहे हे त्यांना पटल्यावर ते निर्णय बदलवत असत. पण त्यासाठी माझी कसोटी लागत असे.

काही काही मजेदार प्रसंगही आमच्या आयुष्यात आले. पण आवड जपतांना केलेली कसरत काही औरच होती. करमणूकीची साधने त्याकाळी फारशी नव्हतीच. वाचन आमच्यासाठी सर्वात सोपे साधन होते. पण त्यावेळी खामगावला सहजासहजी पुस्तके विकत घेऊ म्हटले तरी शक्य नव्हते. अभ्यासाची पुस्तकेच जिथे जेमतेम उपलब्ध व्हायची, तिथे इतर पुस्तकांची काय कथा. खामगावात त्यावेळी २-३ वाचनालये होती. दस्तूररतनजी ग्रंथालयही होते. मी तिथूनही पुस्तके आणायची. पण तिथला जो ग्रंथपाल होता तो जरा उध्दट असाच होता. त्यामुळे सेवकजींनी राष्ट्रभाषा पुस्तकालय काढल्यावर तिथूनच पुस्तके आणू लागले. चित्रपट, नाटक हा आणखी एक करमणूकीचा पर्याय होता. पण फरशी पलीकडच्या जगाशी फारसा संबंध न आल्याने नाटकापासून आम्ही खूप दूरच राहिलो. कधी तरी कोल्हटकर वगैरे नाव कानावर पडायचे एवढेच. चित्रपट बघायला मात्र आम्ही जायचो. तो प्रकार गमतीचाच. एक दिवस अर्धा चित्रपट बघून यायचा. नंतर उरलेला दुसऱ्या दिवशी बघायचा प्रघात होता. आमचे घरातले कामकाज आटोपल्यावर सिनेमा बघायला जात असू. जेवढा वेळ तिथे पाहता येईल तेवढे बघायचे. गाण्यांच्या कार्यक्रमांलाही कधी गेलो नाहीत.

मुलं नावारूपाला आली. सर्व बस्तान नीट बसले होते. काळाच्या ओघात मरण येणारच असते. तसे पतीचेही निधन झाले. आयुष्याचा जोडीदार निघून गेल्यावर जीवनात निर्माण होणारी पोकळी फार मोठी असते. ते दुःख पचवायला फार जड गेले पण ते मी सहन केलं. माझी दोन्ही मुले त्यावेळी परदेशांत होती. अशोकच इथे होता. त्याच्या कडून सगळे व्यवस्थित करून घेतले. आयुष्यातले अखेरचे पर्व सुरू आहे. वाचन सुरू आहे. पण कधीतरी मनात उलट सुलट विचार येतातच.

पतीला नेमकी कोणती भावना बांधून ठेवत असावी? कोणते नाते त्याला आवडत असेल? त्याला परमेश्वर म्हणवून घेणं आवडत असेल का? प्रश्नांचे चक्रव्यूह मला अडकवत असे. बरं झालं कुणी जयद्रथ नव्हता अभिमन्यू प्रमाणे माझा वध करायला! पत्नी, मैत्रीण, सावली, सखी, अनुगामिनी कोण हवी आहे त्याला?

आमच्या नात्यातही हा विचार अधूनमधून मला सतावत होते. स्त्रीला अर्धांगिनी म्हटले जाते, त्यात कितपत तथ्य आहे? पूर्वी तरी ते होते कां? अर्धांगिनी म्हणतांना सर्वच संदर्भात तिला पतीच्या जीवनात, व्यक्तिमत्वात अर्धे स्थान, अर्धे अधिकार मिळतात कां? दिले जातात का? मला वाटते पुरूषांनी कधी ह्या संदर्भात विचारच केला नसेल. स्त्रियांना असा विचार करायचा असतो याचे भानही नाही 'शब्द फक्त अर्थशून्य बुडबुडा' . मी तरी विचाराशिवाय काय केले? खरोखर पतीच्या आयुष्यात महत्व कितपत मिळते? हक्क, अधिकार दूर, फक्त कर्तव्यांचा डंका वाजविला जातो. तिच्या व्यक्तिमत्व विकासाला स्थान आहे? 'चूल आणि मूल' सांभाळूनही पुढे येणारी पत्नी पतीला मनापासून आवडलेली नजरेस का पडत नसावी? काही अपवाद वगळल्यास असा विचार करणारी स्त्री असत नाही. सुशिक्षीत स्त्रियांची संख्या वाढली तरी 'शोभेची बाहुली' ही तिची प्रतिमा कां बदलत नाही? खरंतर माझ्या संदर्भात मला समजून घेणारा, अर्धांगिनी म्हणून मान देणारा, अधिकार देणारा, पती मिळाला होता. माझ्या स्वातंत्र्यलढ्याला स्त्रीची मुक्तता करण्याचे ध्येय होते व आहे. पण साधायचे कसे? घोडयाला पाण्यापर्यंत नेता येते पाणी पाजता येत नाही हेच खरे.

आणखी सतावणारा एक शब्द आहे सावली. पत्नी पतीची सावली आहे म्हणतात. सावली कधी पुढे तर कधी मागे असते. येणाऱ्या प्रकाश स्त्रोतानुसार तिचा आकार असतो. कधी कधी तर ती दिसेनाशीही होते. मध्यान्हकाळी तर पायाखालीही असते. म्हणजे तिला स्वतंत्र स्थान आहे की नाही असा प्रश्नच निर्माण होतो. सकाळी, संध्याकाळी, दुपारी, मध्यरात्री वेगवेगळी सावली. पतीशी असणारे अतूट नाते सावली शब्दांत अभिप्रेत आहे पण म्हणून तिने अगस्ती पाणी प्रमाणे 'लोपामुद्रा' व्हायचे का? मी भाग्यवान, असे कुठलेच अर्थहीन जीवन माझ्या वाट्याला आले नाही. मी कधी मैत्रीण, सखी झाले. तर कधी अग्रेसर, अनुगामिनी झाले. सावली सारखी तर मी राहिलेच, यात शंकाच नाही. एक सुरेख जीवन मला मिळाले. मी जिंकले असे म्हणते मी.

---

.

# सच्चे कार्यकर्ते पती

झुनझुनवाला परिवारात सामाजिक कार्याचा संदर्भ होता. नंतर सक्रीय राजकारणालाही सुरूवात झाली. पण त्या सर्वांत कर्तबगार, ध्येयनिष्ठ होते माझे पतिराज श्रीमान पुरूषोत्तमजी. राजकारण, सामाजिक सुधारणांत त्यांना खूप रस होता. मवाळ पक्षाचे काँग्रेसचे ते कार्यकर्ते होते. म. गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, श्रीमान जमनालालजी बजाज, आचार्य काका कालेलकर, आचार्य कृपलानी हयांच्यासारख्या अखिल भारतीय नेतृत्वाशी त्यांची छान ओळख व संबंध होते. त्याचप्रमाणे लोकनायक बापूजी अणे, वीर वामनराव जोशी, विदर्भकेसरी ब्रिजलालजी बियाणी हे वऱ्हाडातील नेतेही त्यांना जवळचे समजत असत. इमानदार, निष्ठावंत कार्यकर्ता असूनही ते खूप प्रकाशांत येऊ शकले नाहीत. कारण त्यांचा स्वभाव प्रसिध्दीपराङ्मुख असून कुठेही पुढेपुढे न करता शांतपणे कार्य करण्याचा होता. कधी कधी लोक त्यांना एखादे पद स्वीकारण्यासाठी खूप आग्रह करीत. जबरदस्तीने कुणी पद दिलेच तर ते नाईलाजाने ते स्वीकारत. पद स्वीकारल्यानंतर मात्र त्या पदाची जबाबदारी ओळखून आपले उत्तरदायित्व ते पूर्णपणे पार पाडत असत.

लहान वयापासूनच स्वातंत्र्य लढयात ते सहभागी झाले होते. विद्यार्थी दशेतच त्यांच्यावर गांधीच्या विचारांचा, तत्त्वज्ञानाचा पगडा होता. त्या प्रभावाने वागणे आपले कर्तव्य ते समजत असत. इ.स. १९२० मध्ये काँग्रेसचे नागपूर अधिवेशन होते. गांधीजींनी स्वदेशी, चरखा, खादी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, हिन्दू मुस्लीम ऐक्य या विषयांवर त्यावेळी मार्गदर्शन केले होते. आपल्या वडील बंधूबरोबर, हरिप्रसादजी यांच्याबरोबर, ते अधिवेशनाला गेले होते. त्यावेळी वय होते पंधरासोळा वर्षे. अधिवेशनानंतर खामगांवी आल्यानंतर आपल्या सर्व परदेशी कपडयांची त्यांनी होळी केली. यानंतर फक्त खादीच वापरायची असे व्रत घेतले.पुढे आमरण त्यांनी ते पाळले. मजेची गोष्ट अशी की पुढे त्यांनी काँग्रेसचा त्याग केला पण खादी वापरणे मात्र सोडले नाही. डॉ. पारसनीस यांनी या संदर्भात आपले मत मांडले आहे. त्यावेळी लहान, अरूंद पन्ह्याची, जाडी भरडी खादी मिळत असे. तिचा स्वीकार आपल्या सर्व वापरासाठी करायला त्यांनी सुरूवात केली.

ते अधिवेशनाला गेले तेव्हा आठव्या वर्गात त्यावेळच्या सरकारी हायस्कूलमध्ये शिकत होते. परंतु परतल्यावर त्यांनी पुरणमलजीच्या धर्मशाळेत नुकत्याच सुरू झालेल्या टिळक राष्ट्रीय शाळेत प्रवेश घेतला. त्यांचे मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण तिथेच झाले. त्यानंतर त्यांना वैद्यकिय शिक्षण घ्यायची इच्छा होती. त्यासाठी टिळक विद्यापीठ पुण्याची मॅट्रीक परीक्षा त्यांनी उत्तीर्ण केली. इ.स. १९२४ मध्ये जुलै महिन्यात मुंबईच्या नॅशनल मेडीकल कॉलेजात प्रवेश घेतला.त्याकाळात मुंबईचे सुप्रसिध्द डॉ. साठे, डॉ. वैद्य हया महाविद्यालयात अधिकारी होते. तसेच शिकवतही असत. पण पुढे चारसहा महिन्यातच कॉलेजने ब्रिटीश सरकारची ग्रॅंट (अनुदान) घेण्यास सुरूवात केली. तसेच मुंबई विद्यापीठाला म्हणजे सरकारी विद्यापीठाला ते जोडले. पुरूषोत्तमजींना ते काही आवडले नाही. इंग्रजांचा तो संबंध नकोच म्हणून कॉलेज सोडून देण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी तेथील प्राचार्य, प्राध्यापकांनी त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला. खूप पटवून देऊन, सोडून जाऊ नका म्हणून आग्रह केला. ह्यांनी कुणाचीही पर्वा न करता कॉलेज सोडून दिले. त्यानंतर दुसरे नॅशनल म्हणजे राष्ट्रीय पध्दतीने चालणारे महाविद्यालय शोधण्याचा प्रयत्न केला. पण ते न सापडल्याने वैद्यकीय शिक्षणाला रामराम ठोकला.

पुढे शिक्षण तर घ्यायचे होते पण ते स्वदेशी पध्दतीचे. म्हणून गुजराथमध्ये अहमदाबादला एका महाविद्यालयात प्रवेश घेतला. ज्याचे महात्मा गांधी कुलपती असून आचार्य काका कालेलकर प्राचार्य होते. त्या गुजराथ विद्यापीठाच्या महाविद्यालयातून चार वर्षात त्यांनी आर्टस् चा अभ्यासक्रम पूर्ण करून बी. ए. ची पदवी मिळविली. बी.ए. ऑनर्स इ.स. १९२७ ला ते झाले.

माणसाला एखाद्या गोष्टीची ओढ वाटू लागली की कितीही कामे मागे असली तरी तो त्यातून आपली आस पूर्ण करतोच. पुरूषोत्तमजीच्या बाबतीतही असेच घडले. त्यांना समाजसेवेचे महत्त्व इतके पटले होते की, अहमदाबादला शिकत असतांनाच म्हणजे १९२७ मध्येच गुजराथेत खूप पाउस पडला. इतका की ओला दुष्काळच, जणू आकाश फुटले, अन् पृथ्वीवर कोसळले. ह्या अतिवृष्टीने गुजराथेत हाहाःकार झाला. अनेक घरांची छपरे उडाली. खूप घरे कोसळली. अनेक गावे पूरात वाहून गेली. जनावरे, अन्न, कापड, औषधे सारे पावसाच्या थैमानात मातीमोल झाले. सर्वत्र, जिकडे बघावे तिकडे पाणीच पाणी झाले होते. आपले प्राण वाचविण्यासाठी लोक झाडांवर चढले. घरांच्या छतांवर चढून बसले. उंच

टेकड्यांवर आश्रय घेतला. जिथे तिथे शक्य होते तिथे तिथे लोकांनी पोहोचण्याचा प्रयत्न केला. दोन दोन दिवस थंडी, वारा, पाउस यांना तोंड देत लोक उपाशी-तापाशी, अन्नपाण्याविना बसून राहिले. प्राण वाचविण्याची त्यांची धडपड सुरू होती. निसर्गच कोपला होता. अनेक गावांना जोडणारे रेल्वेचे रूळ पाण्याखाली आले. वाहून गेले होते. कित्येक फर्लांगापर्यंत अशी भयंकर स्थिती होती. आगगाडया धावणे थांबले होते. बैलगाडीच्या रस्त्यांवर चिखलच चिखल आणि पाणीच पाणी झाले होते. गावांगावांतून गायी, म्हशी, गाढवे मेली होती. त्यांची प्रेते सडून सर्वत्र दुर्गंधी सुटली होती. लोकांचे अन्नसाठे वाहून गेले होते. न वाहिलेले सडून गेले होते. भुकेने सारेच बेजार झाले होते. अशा भयाण परिस्थितीत गुजराथ विद्यापीठातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी गावागावाची सफाई करून लोकांना सुखरूप बाहेर काढून अन्न पुरविण्याची जबाबदारी स्वीकारली. त्या विद्यार्थांत पुरूषोत्तमजीही एक कार्यकर्ते होते. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी रस्ते स्वच्छ केले. लोकांची अन्न, वस्त्र, निवासाची सोय केली. यावेळी सरदार वल्लभभाई पटेल गुजराथ प्रांत काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष होते. त्यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली दुष्काळ सहायता समिती निर्माण करून सेवाकार्य जोमाने सुरू होते. पुरूषोत्तमजी त्यातही सभासद होतेच. देहभान विसरून त्यांचे कार्य सुरूच होते.

पुढे इ.स. १९२७ मध्येच इंग्लंडवरून सात गोऱ्या साहेबांचे एक शिष्टमंडळ भारतात आले. सायमन त्यांचे प्रमुख होते. हिन्दुस्थानला सुधारणा बहाल करायचा बहाणा करीत आपली गुलामीची बंधने आणखी पक्की करण्याचा त्यांचा उद्देश होता. त्यांच्या विरोधात देशभर सत्याग्रह झाले. मोठमोठ्या मिरवणूका काढीत लोकांनी त्यांचा निषेध केला. अहमदाबाद शहर आणि गुजराथ विद्यापीठाच्या वतीने एक खूप मोठा निषेध मोर्चा काढण्यात आला. त्या मोर्च्याचे नेतृत्व हातात राष्ट्रीय झेंडा धरून ह्यांनी केले. मिरवणूकीत सर्वात समोर ते चालत होते.

काळ वेगाने चालला होता. स्वातंत्र्यलढाही वाढत होता. बारडोलीचा सत्याग्रह झाला. इंग्रज सरकारने बारडोली तालूक्यातील शेतकऱ्यांवर २२ टक्के महसूलकर वाढविला. या अन्यायाविरूध्द शेतकऱ्यांनी चिडून ठरविले की, कर भरणा करणार नाही. सरदार पटेलांनी हा सत्याग्रह करणाचे आवाहन केले. इ.स. १९२८ मार्च महिन्यात सत्याग्रहाचा निर्णय झाला. एप्रिल महिन्यात सत्याग्रहाचा शंख फुंकला. हा सत्याग्रह हाणून पाडण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांवर खूप अन्याय केले. त्यांची शेती, शेतीची अवजारे, त्यांच्या इस्टेटी, जनावरे, गुरेढोरे

जप्त करून त्यांची हर्राशी केली. एवढेच नाहीतर शेतकऱ्यांची हाडे मोडतील अशाप्रकारे त्यांच्यावर हल्ला केला. अत्यंत क्रूरपणे ही मारहाण झाली त्याविरूध्द बोलणाऱ्यांना, सरकार विरोधात प्रचार करणाऱ्यांना अटक करण्यात आली. जर तुम्ही माघार घेतली नाही तर तुम्हाला बंदुकीच्या गोळयांनी उडवून देऊ अशा धमक्याही दिल्या गेल्या. पण ना किसानांनी त्यांना भीक घातली ना सरकार विरोधात प्रचारकार्य करणाऱ्यांनी तिकडे लक्ष दिले. जवळ जवळ पांच-सहा महिने सत्याग्रह सुरू होता. शेवटी सरकारला या करवाढी विरोधाने माघार घ्यावी लागली. सरदार पटेल, ज्यांनी ह्या लढयाचे नेतृत्व केले, त्यांच्याशी तह करावा लागला. ह्या संपात शेतकऱ्यांची बाजू मांडण्याचे प्रचारकार्य निर्भिडपणे पुरूषोत्तमजींनीच केले. सर्वाधिक ठिकाणी तेच पोहोचत होते. सत्याग्रहाच्या खामगांवला बातम्या पोहोचत होत्या. त्या ऐकून त्यांची आई काळजीत पडली होती. मुलांची चिंता त्यांना वाटत होती. ह्या सत्याग्रह दरम्यान त्या बारडोलीला जावून आपल्या मुलाला व सरदार पटेलांना २-३ वेळा भेटल्या होत्या. पण पुरूषोत्तमजींनी आपले कार्य कशाचीही पर्वा न करता सुरूच ठेवले होते. आपली बी. ए. ची परीक्षा झाल्यानंतरच त्यांनी या सत्याग्रहांत भाग घेतला होता. इ. स. १९२८ च्या सप्टेंबर महिन्यात बारडोली सत्याग्रह थांबला. त्यानंतर ते खामगावी परतले.

त्या दिवसात खामगांवला पत्रीसरकार आणि हिन्दूमहासभावाल्यांचा पगडा होता. जनतेची त्यांना साथ मिळू लागली होती. काँग्रेसचे कार्य संथावले होते. कुणीही मोठा प्रचारक किंवा कार्यकर्ता उरलेला नव्हता. पुन्हा एकदा काँग्रेसचे कार्य सुरू करणे कठीण गोष्ट होती. या पार्श्वभूमीवर खामगांवला परत काँग्रेस उभी करण्याचे काम पुरूषोत्तमजींनी करण्याचे ठरविले. तेव्हा राष्ट्रीय शाळेतील काही शिक्षकांना हाताशी घेऊन कामाला सुरूवात केली. हिंदसेवादल, काँग्रेस प्रचार समिती, युवादल ह्यांची निर्मिती त्यांनी केली. कॉंग्रेसचे ध्येय धोरण, विचार ह्यांचे प्रचार प्रसारकार्य त्यांनी सुरू केले.

इ.स. १९३४ मध्ये बिहार मध्ये प्रलयकारक भूकंप झाला. त्यात हजारो लोक बेघर झाले. त्यांना मदत करण्याचे आवाहन देशातील मोठ्या लोकांनी केले. त्यासाठी फंड गोळा करण्याचे ठरले. पुरूषोत्तमजींच्या नेतृत्वाखाली एक चांगली रक्कम फंडात पाठविण्यासाठी जमा झाली. तसेच जुने नवे कपडयांचे गठ्ठेदेखिल तिकडे रवाना करण्यात आले. अत्यंत पध्दतशीर, जबाबदारीने हे काम त्यांनी पूर्णत्वाला नेले होते.

इ.स. १९३६मध्ये सीतादेवीशी विवाह झाला. एक देशभक्त घराण्यांतील मुलगी, एका प्रसिध्द उद्योगपती घराण्यातील मुलगी म्हणून हा विवाह झाला नव्हता तर एक सुशिक्षित, देशप्रेमी स्वातंत्र्यलढयात सहभागी झालेली मुलगी म्हणून हा विवाह झाला होता. एखाद्या उत्तम गृहिणींजवळ जे गुण आवश्यक असतात ते तर तिच्याजवळ होतेच पण त्याशिवाय तिचा स्वभावही महत्त्वाचा होता. साखरपुड्याला महात्माजी उपस्थित होते. त्यांनी पुरूषोत्तमजींना आशीर्वाद दिला होता, 'पुरूषोत्तम नावाप्रमाणेच आपण आयुष्य घडवाल अशी आशा मी करतो, तसे होईल असा आशीर्वादही देतो'. सगळे काही काल घडल्याप्रमाणे डोळयापुढे येते आहे.

खामगांवातील काही वास्तूंना त्यांचा स्वतःचा इतिहास आहे. राष्ट्रीय शाळा त्यातील एक. 'टिळक राष्ट्रीय विद्यालय' असे तिचे पूर्ण नांव. माझ्या दृष्टीने तर तिला खूपच महत्त्व आहे. कारण माझ्या पतिराजांच्या व्यक्तीमत्वाला तिथे आकार मिळाला. शाळेचा परिचय झाला, त्यांच्याशी संबंधही जुळले. जे आजवर मी जपले आहेत. त्याला कारणीभूत तेच आहेत. एकतर ते त्या शाळेतच शिकले आणि दुसरे म्हणजे शाळेची सुरूवात आमच्याच जागेत म्हणजे 'पुरणमल धर्मशाळेंत' झाली. 'पुरणमल धर्मशाळा' म्हणजे 'राष्ट्रधर्माची पाठशाळा' असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. खामगावातील अनेक चांगल्या सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांनी प्रारंभी हिचाच आधार घेतला होता. पुढे राष्ट्रीय शाळेला जागा मिळाली. तिथे एक कलापूर्ण वास्तू उभी झाली. पंधे गुरूजींसारखा देशभक्त, विद्वान, कलामहर्षी इथे राहायला आला. आयुष्याच्या अखेरपर्यंत व्रतस्थ आयुष्य जगत राहिले. आपल्याजवळचे सारे भरभरून समाजाला देतच राहिले.

गुरूजींच्या कल्पनेतून वास्तू साकारली. श्रमदानातून ती उभी राहिली. तिथली मोठी विहिर, तिथले प्रशस्त सभागृह, सुरेख कलापूर्ण बाह्यरूप सारेच देखणे, मनोहारी आहे. राष्ट्रीय विचारसरणीतून उभा राहिलेला हा प्रकल्पच होय. मोकळी मोठी जागा, बाग, शेती सारेच हवेहवेसे. मोकळया हवेत मनसोक्त अनुभवणे म्हणजे आनंदाची पर्वणीच म्हणाना! निवासी शाळेतील विद्यार्थी राष्ट्रीय विचारांनी भारलेले होते. प्रत्यक्ष महात्माजी जरी तेथे नव्हते तरी त्यांची विचारसरणी तिथे नांदत होती.



टिळक राष्ट्रीय विद्यालय, खामगांव

स्वातंत्र्य चळवळीचे केन्द्र ती शाळा बनली होती. मुख्याध्यापक होते पुरवार गुरूजी. विठ्ठल गोपाल कोरडे, पंधे गुरूजी, मनोहरपंत दिवाण, आर.एन. देशपांडे, पंढरीनाथ अंबुलकर, वामनराव पत्की, परांजपे, अग्निहोत्री आदी तेथे शिक्षक होते. महाविद्यालयात शिकणारे, असहकार चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते होते. सगळेजण, कॉलेजवर बहिष्कार टाकून नवी तरूण कार्यकर्त्यांची फळी निर्माण करण्यात गुंग झाले होते.

महात्माजींच्या नेतृत्वाखालील असहकार, सविनय कायदेभंग, वैयक्तिक सत्याग्रह, १९४२ ची 'चलेजाव' चळवळ ह्यांचे केंद्रस्थान राष्ट्रीय शाळा बनली होती. जगांतील निरनिराळया देशांतील स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास इथे शिकविला जाई. आश्रमशाळा पध्दतीची ही शाळा होती. मुलांसाठी वसतीगृह होते. मुले तिथे असतांना त्यांना खादी, सूतकताई , महात्माजींचे रचनात्मक कार्य ह्यांचे बाळकडू इथल्या शिक्षकांनी पाजले. माझे पती इथेच तयार झाले. पिंड होताच, पण त्याला आकार व गती इथे मिळाली. चळवळीत सहभाग असायचाच, हळूहळू ते नेतृत्वही करू लागले. आपल्यावर सोपवलेली जबाबदारी ते निष्ठेने व कुशलतेने पार पाडू लागले. राष्ट्रीय शाळेचे शिक्षक आणि विद्यार्थीही त्यांच्या या कार्याने इंग्रज

सरकारच्या रोषास कारणीभूत ठरली. तुरूंगवासही अनेकांना भोगावा लागला. अनेकवेळा ही शाळा बंद पाडण्याचा प्रयत्न झाला. पण शाळेतील शिक्षकवर्ग आणि नागरिकांनी तसे होऊ दिले नाही. राष्ट्रीय स्वरूपाची ही शाळा त्यांनी निष्ठेने जपली.

कायदेभंगाच्या चळवळीचा उल्लेख मी करायलाच हवा. १९२९ च्या लाहोर येथील अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनांत संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पारीत झाला होता. दोन वर्षांची मुदत इंग्रज सरकारला त्या संदर्भात लेखी स्वरूपात कळविली होती. परंतु त्याला त्यांनी कोणतीही किंमत दिली नाही. तरी देश मात्र ह्या विचाराने ढवळून निघाला होता. वैध, घटनात्मक मार्गाने, अर्ज, विनंत्या करूनही, निवेदने देऊनही सरकार बधत नाही हे पाहून आता संघर्ष अटळ आहे हे सत्याग्रहींच्या लक्षात आले. केवळ वसाहतीचा दर्जा किंवा वसाहतीचे स्वराज्यही ते द्यायला तयार नव्हते. तनमनधनाने झिजण्यास, प्राणार्पण करण्यास जागृत झालेली नवी पिढी तयार झाली होती. त्यामुळे १९३० मध्ये 'एका वर्षात स्वराज्य' ही घोषणा गांधींनी केली. बुलडाणा जिल्ह्यांतही तशी तयारी सुरू झाली. २६ जाने. १९३० ला पहिला स्वातंत्र्यदिन देशभर काँग्रेसच्या आदेशानुसार पाळला गेला. ठिकठिकाणी झेंडावंदन झाले. जाहीर सभाही झाल्या.

खामगांवातही हा उपक्रम राबविण्यांत आला. टिळक मैदानावर डॉ. पारसनीसांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. त्यात पुरूषोत्तमजी झुनझुनवाला ह्यांचेही भाषण झाले. त्यांनी संपूर्ण स्वातंत्र्याची प्रतिज्ञा सभेला दिली. त्यावर सरकारने दडपशाहीचे धोरण स्वीकारले. लोकांवर लाठीमार, गोळीबार करण्यांत आला. 'ह्या चळवळीत भाग घ्याल तर त्यांचे भयंकर परिणाम भोगावे लागतील' अशा धमक्याही सरकारने दिल्या. सर्व कार्यकर्त्यांना अन्याय, अत्याचारांची पूर्ण कल्पना होतीच. धमक्यांना भीक न घालता त्यांनी आपले कार्य चालूच ठेवले.

खामगांवात सरकारी हायस्कूलवर तिरंगा, राष्ट्रीय झेंडा फडकविण्यांचा कार्यक्रम दवंडी पिटून जाहीर करण्यात आला. त्या दिवशी खामगांवातील नागरिक मोठया प्रमाणांत शाळेभोवती गोळा झाले होते. विद्यार्थी तिरंगा हाती घेवून शाळेच्या इमारतीवर चढण्याचा प्रयत्न करू लागले. 'भारत माता की जय', 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणा दिल्या जात होत्या. विद्यार्थ्यांना अटक करण्यास पोलीस सरसावले. तेव्हा त्यांच्यावर विद्यार्थ्यांनी दगडफेक

केली. झाले! आगीत तेल पडले! प्रसंग मोठा कठीण आला. पण पन्नालालजी व्यास व डॉ. पारसनीस ह्यांनी सर्वांना शांत केले. त्या दिवशी तर इमारतीवर झेंडे फडकावता आले नाहीत. परंतु दुसऱ्या दिवशी मात्र विद्यार्थी झेंडा खिशात घेऊन आले अन् फडकावले झेंडे इमारतीवर.

'नही रखनी, नही रखनी जालीम सरकार नही रखनी' अशी घोषवाक्ये प्रचार सभातून दिली जाऊ लागली. प्रचारासाठी प्रभातफेऱ्या, सायंफेऱ्या काढल्या जाऊ लागल्या. मी देखील त्यात हिरीरीने सामील होत असे. 'विजयी विश्वतिरंगा प्यारा', 'भारत देश हमारा', 'वंदेमातरम्' अशी गीते सामुदायिक रीतीने गात रस्त्याने आम्ही जात असू. ह्या प्रचारात किशोरवयीन मुला मुलींचा भरणा अधिक असे. मी माहेरी असतांना त्यात खूप काम केले होतेच. ह्या मुलांना 'वानर सेना' असे म्हटले जाई, कायदेभंग लढ्याला मदत करणे, झेंडे फडकावणे, जनजागरण करणे, सरकारी नोकरशाही विरोधात प्रचार करून जनतेच्या मनांत त्यांच्या बद्दल असलेली भीती कमी करणे अशी कामे या माध्यमातून झाली. हा सगळा प्रचार अहिंसात्मक होता. ज्याला जसे सुचले तसे कार्य नेटाने पुढे नेण्याचा प्रयत्न होई. 'दवंडी व पोवाडे' ह्यांच्या माध्यमातूनही प्रचारकार्याला गती दिली गेली. जेवणाचे ताट आणि रस्त्यावरचा दगड यांच्या सहायाने दवंडी पिटली जायची. सरकारला निषेध करायचा, परंतु कुठल्याही प्रकारचा त्यांच्या कारवाईला विरोध करायचा नाही. आपण जे काही सरकार विरोधी कार्य केले ते पकडल्या गेल्यावर कबूल करायचे असा सगळा प्रकार असे. मला आठवतं, खामगावला एक नरसू दवंडीवाला होता. तो फार सुरेख दवंडी पिटायचा. तर अकोल्याचे राष्ट्रीय शाहीर गोपालकृष्ण सोळकर आणि डोंगरे म्हणून होते. त्यांनी पोवाडे रचले व गायलेही. लोकमत तयार करण्यांची त्यांची भूमिका खूप यशस्वी झाली होती. माझे पती ह्या सर्वांबरोबर कार्य करीत होतेच पण या शिवाय त्यांनी आणखीही स्वतंत्र काम केले. त्यांनी १९२९मध्ये 'हिंदसेवादल' या नावाची सेवाभावी तरूणांची राष्ट्रीय कार्य करणारी संघटना तयार केली. राष्ट्रीय शाळेतील अधिकाधिक विद्यार्थी त्यात होते. राष्ट्रीय शाळेतून मॅट्रीकची परीक्षा पास करणाऱ्या पहिल्या चमूतील ही मुले होती. पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते अहमदाबादला गेले. हे कार्य ही त्याची पार्श्वभूमी आहे.

प्रत्यक्ष सत्याग्रहाला सुरूवात दांडी येथे मिठाचा कायदा मोडून झाली. १२ मार्च १९३० ला सुरूवात केली. बेकायदेशीर मीठ तयार करणे, मीठ बाहेरून आणून विकणे, पिकेटिंग करणे, दारूची दुकाने, परदेशी मालाची दुकाने यासमोर उभे राहून नारे देणे, विक्री बंद पाडणे, दररोज सूतकताई करणे, सरकारी शिक्षण संस्थांवर बहिष्कार टाकणे, सरकारी नोकऱ्या, वकीली सोडणे, कोर्टावर बहिष्कार टाकणे. जातीजातींत ऐक्य निर्माण करणे असे कामाचे स्वरूप होते. ६ एप्रील १९३० ला मोर्चा दांडीला पोहोचला. गांधी आणि सहकारी मिळून अवैध मीठ तयार करून कायदा मोडला. देशांत चळवळीला सुरूवात झाली. चळवळ म्हणजे युध्दच होते. बुलडाणा जिल्ह्यांत त्यासाठी एक युध्द समिती स्थापन करण्यात आली. त्या समितीचे अध्यक्ष होते डॉ. पारसनीस, सचिव होते वि. गो. कोरडे. अंबुलकर आणि झुनझुनवाला सदस्य होते. त्यापैकी झुनझुनवाला यांना बार्डोली सत्याग्रहाचा अनुभव होता. सत्याग्रहींची नोंदणी सुरू झाली. प्रचार कार्यही जोमात सुरू झाले. त्याचवेळी वऱ्हाडांत लोकनायक बापूजी अणे यांनी जंगल सत्याग्रहाला सुरूवात केली.

दांडी सत्याग्रहानंतर महात्माजींनी धारसना येथील मिठागारावर हल्ला करून मीठ लुटण्याचा कार्यक्रम ठरविला. धारसना येथे खूप मोठी जोखिम होती. वऱ्हाडचे त्यावेळी असणारे सरकारी अधिकारी आणि मुंबईतील अधिकारी यांचे धोरणांत फरक होता, ते अधिक कडक होते. मिठागारावर सशस्त्र पोलीस पहारा होता. सत्याग्रही तिथपर्यंत पोहचू नयेत म्हणून प्रयत्न जारी होते. यातून मार्ग काढीत सत्याग्रही पोहोचलेच तर त्यांच्यावर लाठीहल्ला होई. इतक्या निर्दयपणे हल्ला होई की, सत्याग्रहींचे डोके फुटे, हातपाय मोडत. सशस्त्र पोलीस अन् निःशस्त्र सत्याग्रही असा लढा होता. त्यावेळी अमेरिकेचा मिलर नावाचा वार्ताहर तेथे हजर होता. त्याने प्रत्यक्ष पाहिलेली हकीकत लिहून ठेवली आहे. तिचा तर्जुमा काहीसा असा होता-

मिलर लिहितो, "सत्याग्रहींची तुकडी पुढे येताच लोखंडी टोके बसविलेल्या लाठ्या सरसावून पोलीस त्यांच्यावर तुटून पडत. एकाही सत्याग्रही वीराने त्याला प्रतिकार केला नाही. इतकेच नव्हे तर मार चुकविण्याचाही प्रयत्न केला नाही. सत्याग्रहींच्या डोक्यावर, अंगावर झालेले लाठयांचे प्रहार स्पष्टपणे ऐकू येत. मार खाऊन ते रक्तबंबाळ होऊन ते खाली पडत. मुडद्याप्रमाणे निपचित पडलेल्या सत्याग्रहीची जागा लगेच दुसरी तुकडी घेत असे. बैठ्या सत्याग्रहींच्या पोटावर, छातीवर, नाजूक जागी बुटांच्या लाथांनी बडवित असत. निपचित

पडलेल्या सत्याग्रहींना गुरांसारखे फरपटत नेवून बाहेर फेकून देण्यात येई"  हा वृत्तांत मिलरने अमेरिकन वृत्तपत्रांत प्रसिध्द केला होता. नंतर हिन्दुस्थानातील बऱ्याच वृत्तपत्रांतही तो प्रसिध्द झाला होता.

वरील वृत्तांत वाचून, ऐकून तर धारासना येथे जाण्यासाठी सत्याग्रही उतावीळ झाले नव्हे,त्यांची त्यासाठी अहमहमिकाच सुरू झाली. धारासना येथे जाण्यासाठी बुलडाणा जिल्हयांतूनही सत्याग्रहींची तुकडी तयार झाली. त्यात झुनझुनवालांचाही समावेश होता. खामगावातील चार जण त्यात होते. इतर तिघे अंबुलकर, पत्की, शेषराव देशमुख होते. सर्व सत्याग्रही रेल्वेने निघालेही. परंतु धारासनापर्यंत ते पोहचू शकले नाहीत. त्यांना भुसावळ स्टेशनवरच अटक करण्यात आली. त्यांना कोर्टात नेऊन तीन ते सहा महिन्यांची सजाही झाली. हा कठोर कारावास येरवडा, विसापूर तुरूंगात त्यांना भोगायचा होता. माझ्या पतींनाही सहा महिन्यांचा कारावास झाला.

याचवेळी बुलडाणा जिल्ह्यातील जंगल सत्याग्रहही सांगायलाच हवा. कारण त्यातून माझ्या पतीच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू दिसून येतो. बुलडाणा जिल्ह्यांतील जेष्ठ नेते डॉ. पारसनीसांनी यावेळी नेतृत्व केले होते. टिळक मैदानावर या संदर्भात एक सभा घेतली गेली. सभेत अनेकांनी आपले विचार प्रगट केले. परंतु माझे पती, अंबुलकर, कोरडे गुरूजी, परांजपे गुरूजी यांची व्याख्याने फार प्रभावी झाली. लोकांनी सत्याग्रहींचे पुष्पहार घालून सत्कार केले. त्यानंतर मिरवणूकीने सगळे जनुनाच्या जंगलात गेले. खरे तर तेथे प्रवेश करण्यांस पूर्वीच बंदी घालण्यात आली होती. पण सत्याग्रही बंदी मोडून वनात शिरले. सर्वास अटक करण्यात आली. खामगांवच्या एस.डी.ओ. कोर्टात उभे करून प्रत्येकी सहा महिन्यांचा कारावास ठोठावला गेला. झुनझुनवाला त्यात होते. जहाल, उत्तेजक वक्तव्यासाठी त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले.

मिठाचा सत्याग्रह व जंगल सत्याग्रहानंतर आणखी एक वेगळया प्रकारचा सत्याग्रह होऊ लागला. तो म्हणजे, 'जप्त वाङ्मयाचे जाहीर वाचन सत्याग्रह'. १० मे १९३० पासून हा सत्याग्रह जिल्ह्यात सुरू झाला. सर्वत्र एकसूत्रता यावी आणि जप्त वाङ्मय सर्वांना उपलब्ध व्हावे म्हणून त्या पुस्तकांतील कांही महत्त्वाचे उतारे सायक्लोस्टाईल करून पुरविण्यांत आले. झुनझुनवालांचा प्रिंटींग प्रेस होता. त्यात हे काम होई. पुढे पती तुरूंगात असतांना मी हे काम

केले आहे. इंग्रजी, मराठी, हिन्दी, उर्दू असे चारही भाषांतील वाङ्मय त्यात असे. डॉ. सँडरलॅन्ड यांचे ‘इंडिया इन बॉन्डेज’, काकोरी कटातील शहीद कल्पना दत्त यांच्या पुस्तकातील, विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या ‘आपल्या देशांतील सद्यस्थिती’ मधील हे उतारे असत. ‘भारत जननी तेरी जय हो’, हे गाणे ‘वंदेमातरम्’ इत्यादी गीतांचाही त्यात समावेश होता.

हा सगळया सत्याग्रह होत असतांना एक अत्यंत दुर्देवी आणि दुःखद घटना घडली, ज्याचे माझ्या पतींना अतिशय दुःख झाले. जिल्ह्याचे एक कार्यकर्ते अॅड. सिध्देश्वर गोरे यांचा वीट लागून मृत्यू झाला. नवयुवक दलाचे नेतृत्व करून हिरीरीने भाग घेणे त्यांचे सुरूच होते. अटकसत्र चालूच असे. हयावेळी त्यांना एक वर्षाची सजा झाली. विदर्भातील सर्व तुरूंग तुडूंब भरल्याने सत्याग्रहींना इतरत्र पाठविण्यांत येई. सन१९३०-३२ च्या दरम्यान विदर्भातले सगळेच तुरूंग गच्च भरले होते. बुलडाणा जिल्ह्यातील तुरूंग सुध्दा जिल्ह्यातील सत्याग्रहींसाठी अपुरे पडत होते. म्हणून त्यांना अकोला, अमरावती, जबलपूर येथे पाठविले जाई. तुरूंगवास अत्यंत भयानक होता. तुरूंगाधिकारी राजकीय कैद्यांना गुलामासारखी वागणूक देत असत. छळाची तर परिसीमाच झाली होती. ज्यांनी कधी घरातले साधे काम केले नाही त्यांच्याकडून शिक्षा म्हणून दिलेली कामे पूर्ण होणे कठीणच होते. प्रातःविधीपासून सुरू होणारे जीवन किळसवाणे वाटावे असे होते. प्रत्येक कैद्याला लोखंडाचे पसरट भांडे मिळे. सर्व अन्न त्यात काळे पडे. सगळयाच गोष्टीकरता त्याचाच वापर करायचा असे. जोडीने प्रातःविधीला जावून आल्यानंतर ज्वारीची पेज किंवा हरभऱ्याच्या घुगऱ्या न्याहारीसाठी मिळे. त्यानंतर गिट्टी फोडणे किंवा दळण असे काम मिळे. ते पूर्ण होणे अशक्यच असे. साहजिकच शिक्षा आणि उपाशी ठेवणे ओघानेच येई. सगळेच मुद्दाम अपमान करण्यांच्या हेतूने केले जाई. जनावरेही तोंड लावणार नाहीत असे खायला समोर येई. भाजीत कचरा, काड्या, अळया असत. न्यातही अळया, पोरकिडे, खडे असत. अर्धे कच्चे जाडे भरडे ते अन्न घशातून गिळणे तर दूरच, बघावेसे सुध्दा वाटत नसे. तुरूंगाची तपासणी करण्यांसाठी ‘सरकार ?’ असा हुकूम देवून सर्व कैद्यांना एका ओळीत उभे करीत. आरोग्य तपासणीच्या वेळी ‘मसोडा ?’ अशी आज्ञा दिली जाई. त्यावेळी ओठ खाली ओढून जीभ बाहेर काढून तासन् तास उभे करीत. ह्या अन्यायाविरूध्द सत्याग्रह अकोला, अमरावती, जबलपूर येथील सत्याग्रहींनी केला. त्यात बुलडाणा जिल्हयातील राजकैदी आघाडीवर होते. जबलपूरच्या तुरूंगात राहून सत्याग्रहींनी आपले कार्य सुरूच ठेवले

होते. प्रत्येक बराकीत जोडीने कैदी ठेवले जात. त्यालाच प्रथम विरोध करण्यांत आला. १९४२ च्या लढयात हा प्रकार घडला होता. त्यामुळे थोडा फार जरी झाला तरी सत्याग्रहींना तो मान्य नव्हता. नेते मंडळी ज्या तुरूंगात असत तेथे अभ्यास वर्ग घेवून राजकीय शिक्षण दिले जाई. जबलपूर तुरूंगातही असे वर्ग झुनझुनवालांना अनुभवायला मिळाले.

या सगळयांना न घाबरता आपला लढा त्यांनी कायम सुरू ठेवला. खरेतर ह्या सगळयांमुळे त्यांची प्रकृती बिघडत होती. दम्यासारखे दुखणे पाठीमागे लागले होते.

देश स्वतंत्र झाल्यानंतर स्वतंत्र विदर्भ आंदोलनाच्या वेळी आपल्या तत्वासाठी आम्ही कॉंग्रेसच्या सदस्यत्वाचाही राजीनामा दिला. परंतु विचारांशी तडजोड कधीच केली नाही.



# स्वातंत्र्य लढा आणि मी

देशाचे पारतंत्र्य, ते घालवण्यासाठी प्रयत्न करणे आपले कर्तव्य हे माहेरी असतांनाच शिकले होते. माझ्या बालपणी वर्धा धगधगते यज्ञकुंड झाले होते. गांधीच्या सहवासाने कामाला गती आणि संगती मिळत गेली. वयाच्या दहाव्या वर्षापासूनच स्वातंत्र्याच्या लढयात सहभागी होण्याची संधी मिळाली. माझा खारीचा वाटा असला तरी तो आहे याचा मला खूप अभिमान वाटतो. इ.स. १९३० मध्ये मिठाचा सत्याग्रह गांधींनी पुकारला. वर्ध्यात 'वानरसेना' कॉंग्रेसने स्थापन केली होती. त्यात मी सामील झाले. प्रभातफेरीला, सायंफेरीला जात असे. त्यावेळी वंदेमातरम्, भारत माता की जय, जयहिन्द वगैरे नारे देऊन वर्धा शहरात आम्ही फिरत असू. वाटेने जातांना लोक कौतुकाने आमच्याकडे बघत असत. खादी प्रसारासाठीही फेरी काढली जायची. त्यात भाग घेत असे. विदेशी कापडांच्या दुकानांसमोर पिकेटिंगही करत असू. दारूच्या गुत्त्यासमोर नारेबाजी करण्यातही मी सामील असायची. 'मिठाचा सत्याग्रह'  विदर्भात वेगळया प्रकारे केला गेला. लोकनायक बापूजी अणेंच्या नेतृत्व, मार्गदर्शनाखाली जंगल सत्याग्रह झाला. त्यातही भाग घेतल्याचे आठवते. आम्ही वयाने लहान असल्याने ब्रिटीश सैनिक आम्हाला अटक करून गांवापासून लांब सोडून देत असत. तेथून पायी परतावे लागे. पण त्याचा त्रास कधी वाटलाच नाही. उलट आपण काहीतरी विशेष केले असा विचार मनात पक्का होवून छाती अभिमानाने फुलून यायची. स्वातंत्र्यलढा मनात अशा प्रकारे कायम घर करून बसला होता.

गांधी सेवाग्रामला आल्यानंतर या सगळयांच कार्याला गती आली. वर्धा लढयाचे केन्द्र बनले. थोरामोठ्यांची येजा वाढली. आमच्याही घरी त्यांची उठबस व्हायला लागली. या वातावरणाने मने भारली जात होतीच. त्यात भर पडली आमच्या शाळेतील वातावरणाची. महिलाश्रमही शाळा राष्ट्रीय बाणा जपण्याचा संदेश देणारी, नवी पिढी, नवा विचार रूजविण्याचा प्रयत्न करणारी होती. त्यामुळे तिथे शालेय शिक्षण घेताघेताच चरखा चालविणे, सूत कातणे, कापड विणणे यांचे शिक्षण तर मिळालेच, हया शिवाय ग्रामोद्योगांचे शिक्षणही मिळाले. त्या त्या भागांतील पिके, वातावरण लक्षात घेवून, त्याला केन्द्रस्थानी ठेवून एकाच वेळी शिक्षण आणि पोटापाण्याची व्यवस्था करणारे बुनियादी शिक्षण मिळाले. त्याचे दोन फायदे झाले. एक म्हणजे श्रमप्रतिष्ठा कळली आणि दुसरे म्हणजे ही व्यवस्था जर टिकली तर

बेकारीची समस्या दूर होवू शकेल ही जाणीव झाली. पण दुर्देवाची गोष्ट अशी की ही शिक्षणव्यवस्था कोलमडली. त्याच्या कारणांची मला चर्चा करावयाची एवढेच. आचार्य विनोबा भावेंच्या सहवासात भाषेचे महत्त्व चांगलेच मनावर बिंबले. स्वातंत्र्यलढयात सक्रीय म्हणून अटक, कारावास झाल्यांवर विनोबांनी कारागृहात चौदा भारतीय भाषा आत्मसात केल्या. त्याही तेथील कैद्यांच्या माध्यमातून. हे सगळे संस्कार घेत मी शिकत गेले. अमरावतीच्या वसतीगृहाबद्दल मी मागेच सांगितले आहे. आत्मविश्वास, मनन, चिंतन, स्वतंत्र विचारसरणी, त्याची अंमलबजावणी, सहकार्य, तडजोड सारेच जीवन जगतांना गरजेचे होते ते मला तेथे मिळाल्याने विवाहोत्तर जीवनांत अटीतटीचे क्षण, प्रसंग सहसा येणार नाहीत असे ध्येयधोरण मला आखता आले. विवाहाच्या वेळी मी मॅट्रीक पास झाले होते. पुढे हिन्दी राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धाच्या कोविद, विशारद हया परीक्षा मी दिल्या. त्याचा अभ्यास मुलांच्याबरोबर केला.

सासरी आल्यावर जाणवले की हया घरांचे दोन स्वतंत्र भाग पडतात. तसे प्रत्येकच घरी ते असतातच पण इथे ते प्रकर्षाने जाणवले. म्हणजे त्याचे असे झाले की, झुनझुनवाला परिवाराला राष्ट्रीय विचारसरणीची पार्श्वभूमी होती. सुधारणावादी पुरूषवर्ग त्या घरात असला तरी सनातन विचारसरणी प्रमाणेही ते वागत असतच. स्त्रीच्या संदर्भातली सुधारणा अद्याप घरापर्यंत पोहोचलेली नव्हती. माजघराच्या दाराशी घूंघट, जुन्या रूढी, परंपरा, अंधश्रध्दा अजूनही राहात होत्या. माजघर आणि बाहेरचा दिवाणखाना यांतील अंतर तोडण्याचे कार्य मला करायचे होते. ही अदृश्य भिंत म्हणजे मला आव्हानच होते. म्हणजे दोन स्वातंत्र्यलढे मला एकाच वेळी लढावयाचे होते. त्यात मी यशस्वी झालेही. गृहिणी म्हणून जी भूमिका मला साकारायची होती तिचे रूप असे होते.

पती खामगाव नगर काँग्रेस आणि बुलडाणा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष असल्याने काँग्रेसचे कार्यकर्ते, स्वयंसेवक, आणि नेतेमंडळी यांची सतत घरी ये जा असे. शिवाय या लोकांना भेटायला येणाऱ्यांचीही चांगली गर्दी असायची. रात्रीबेरात्री केव्हाही, कितीही लोक यायचे. त्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था, आगतस्वागत करण्याची जबाबदारी मी कंटाळा न करता पूर्ण केली आहे. पुरणमलजी धर्मशाळेत पाहुण्यांची राहण्याची व्यवस्था होत असे. माहेरी ह्या सगळया वातावरणाची सवय असल्याने हे कार्य फारसे जड गेले नाही. आपल्या घासातला घास

द्यायची शिकवण होतीच. त्यामुळे आपण कांही खूप मोठे काम करतोय वगैरे विचार मनात आलेच नाहीत. उलट राष्ट्रकार्य करणाऱ्यासाठी आपल्याला काहीतरी करता येत आहे याचे समाधानच वाटत असे.

शाळकरी असतांना मॅडम कामांनी तयार केलेला राष्ट्रध्वज हातात घेऊन, गाणी गात काढलेल्या प्रभातफेऱ्यांची आठवण मनात असल्याने, सासरी आल्यावर अशा प्रभात फेरीत भाग घेण्याची संधी मी सोडायची नाही. अर्थात यासाठी घरातल्यांची बोलणीही खावी लागायची. घरांत तर घूंघटाला मी रजा दिलीच होती पण सुनबाई गांवभर रस्त्यारस्त्यातून नारे देत जाते हे पटणे कठीणच नव्हते का? त्यात मला त्या सासरच्या स्त्रियांचा दोष दिसत नसे. त्यांच्या दृष्टीने सर्व बरोबर होते. ह्या विचारांच्या मगरमिठीतून माझा स्वातंत्र्यलढा सुरू होता. खरं म्हणजे मवाळपक्षाच्या काँग्रेसजनांना सुधारणा अभिप्रेत होत्याच.परंतु त्याची अंमलबजावणी म्हणावी तशी झाली नाही त्यामुळे आज इतक्या वर्षांनीही त्यात फारसा बदल झाला असे वाटत नाही. समाजमनाला जाग अतिशय संथ गतीने का येते? हा मला पडलेला प्रश्न आहे.

खामगांवी आणखी एक महत्त्वाची भूमिका मी निभावत असे ती म्हणजे पत्रके वाटण्याची काही ठराविक ठिकाणी ती पोचती करतांना मला एक वेगळाच थरार अनुभवता आला. पोलीसांची नजर चुकवून भित्तीपत्रकेही खूप वेळा चिकटवली आहेत. हा अपूर्व अनुभव असे. विरोध! इंग्रज सरकारला! ही भावनाच खूप जबरदस्त असे. कामाला खूप गती होती असे तर मी म्हणत नाही, पण काम चालू होते.

पतीच्या अनुपस्थितीत घर चालविणे सोपे काम नव्हते. ते जरी कारागृहात होते तरी येणाऱ्या जाणाऱ्यांची रीघ तशीच होती. इंग्रजांच्या विरोधात काम करणारे घर म्हणून नातेवाईकांनी संबंध तोडून टाकले होते. या पार्श्वभूमीवर मलाच हातपाय हलविणे आवश्यक होते. घरांतील वृध्द मंडळी, लहान मुले अन् विचारसरणीत माघारलेल्या स्त्रीया ह्या सर्वांची काळजी मला घ्यावयाची होती. पतीच्या कर्तृत्वाला धक्का न लावता, घराण्याच्या लौकिकाला जपत मला मार्ग काढायचा होता. वर्ध्याला महिलाश्रमात असतांना सूत कातायला शिकले होते. काही पायाभूत मूलोद्योगांचेही ज्ञान माझ्याजवळ होते.

भूमिगत राहून कार्य करणाऱ्यांचे कार्य पुढे नेण्यासाठी भित्तीपत्रकांची गरज असे. विविध प्रकारचे संदेश देण्यासाठी हॅंडबीलही लागत. हे सगळे कागद छापून द्यावे लागत. हे काम मी

यशस्वीपणाने सांभाळले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जेव्हा आम्ही 'अशोक प्रिंटींग प्रेस' काढला तेंव्हा हे अनुभव कामी आले. तिथे दुपारच्यावेळी मी कामाला जायची. मुद्रणालयात देखरेख करणे हे मुख्य काम असे. तेथील आर्थिक व्यवहार, हिशोब मीच बघत असे. कधी कधी कामावरचा माणूस गैरहजर असे. तेंव्हा प्रिंटींग मशिन मी चालविली आहे. छपाईसाठी मजकूर तयार करण्यांसाठी खिळे आधी जुळवावे लागत. ते कामही मी शिकून घेतले. वेळप्रसंगी छापखान्यात ती जबाबदारीही सांभाळली.

छापखान्याप्रमाणेच आम्ही आणखी एक व्यवसाय सुरू केला. तो म्हणजे तेलबियांपासून तेल काढण्याचा कारखाना 'ऑईल मिल' काढली. तिथेही देखरेख माझीच असे. त्यासाठी लागणारा कच्चा माल खरेदी करणे, तेलविक्री करणे ही सगळी कामे मी सांभाळली. एक यशस्वी व्यावसायिक म्हणून मी तेव्हा नावही कमाविले होते. बरीच वर्षे हे उद्योग सुरू होते. अर्थात या व्यवसायामागे स्वदेशीचा हेतू होताच.

घरची बरीच शेती होती. त्यावर नजर ठेवणे मोठे कठीण काम होते. सारखे तिकडे वेळ काढून जावे लागे. मुले लहान, घराकडे त्यांच्याकडे लक्ष पुरवायचे. छापखाना, तेल कारखाना सांभाळणे, ह्यातून शेतीकडे लक्ष देणे म्हणजे माझी खूप ओढताण होई पण मी कुठेही दुर्लक्ष होऊ दिले नाही. शेतात मजूर काम करायचे. त्यांच्याकडे लक्ष पुरवायचे काम फार कर्मकठीण होते. पण अनेक वर्षे मी शेतीही व्यवस्थितपणे केली.

माझे गणित खूप चांगले होते. त्यामुळे सगळीकडचे हिशोब करणे अन् ठेवणे या दोन्ही गोष्टी जबाबदारीने माझ्या अंगावर घेऊन पूर्ण केल्या. त्यात कुठेही गोंधळ, चुका, खोडतोड मी होऊ दिली नाही. चांगल्या गणिताने आयुष्याचे गणितही सोडवायला मदत झाली असे मी कधीकधी विनोदाने म्हणतेही. इथेच आत्मस्तुतीचा दोष घेऊन एक गोष्ट मी सांगते. माझे हस्ताक्षर खूप चांगले आहे. त्या हस्ताक्षरानेच ही लिखापढीची कामे जोखीम अंगावर आली असावी. या चांगल्या हस्ताक्षराची एकदा मजाच झाली. कांही कागदपत्रे पोस्टमन घेऊन आला. कागद माझ्या नांवावर आले होते. घरात मी आणि माझा नातू आनंद दोघेच होतो. मी घरात कामात होते म्हणून आनंद ते कागद घेऊन माझ्याकडे आला. मी त्यावर इंग्रजीत स्वाक्षरी करून दिली. पोस्टमनला खरे वाटले नाही की आनंदची आजी इतक्या चांगल्या हस्ताक्षरांत इंग्रजीत स्वाक्षरी करेल. त्याने मला भेटायची इच्छा व्यक्त केली. मला भेटल्यावर त्याला खूप जवळ

वाटले होते. कारण माझ्या वयाची बाई इंग्रजीत झोकात सही करेल हे त्याला पटले नाही. चांगल्या गणितामुळे जसे हिशोब माझ्या मागे लागले तसेच चांगल्या हस्ताक्षराने माझ्यावर पत्रव्यवहारांची जबाबदारी टाकली. माझे इंग्रजी आणि मराठी दोन्ही हस्ताक्षरे सुंदर आहेत. हस्ताक्षराची देणगी माझ्या अभिमानाची गोष्ट आजही आहे. गांधींनी त्यांच्या आत्मचरित्रात हस्ताक्षरा संदर्भात लिहिले आहे. चांगले हस्ताक्षर माणसाच्या चांगल्या स्वभावाचे द्योतक आहे. माझ्या लक्षात ही गोष्ट आजही आहे. पण माझा स्वभाव खरच चांगला आहे कां हे मात्र अजूनही कळलेले नाही.

आधी सुधारणा मग स्वातंत्र्य म्हणणारा एक कॉँग्रेसचा घटक होता. दुसऱ्या गटाचे म्हणणे आधी स्वातंत्र्य मिळवू, सुधारणांचे नंतर पाहता येईल. पती गांधीवादी विचार सरणीचे त्यामुळे मवाळ. माहेरीही तीच विचारधारा. त्यामुळे राजकीय विचारांत मी मवाळ होते पण त्याचवेळी सुधारणांसंदर्भात जहाल भूमिका माझी होती. मवाळातील जहाल असे मी स्वतःला म्हणवून घेते. नवीन सुधारणावादी विचारसरणी माझी होती. घरांघरातून असणारी अंधश्रध्दा, पुराणमतवादी विचार, रूढीपरंपरांचा पगडा माझ्या मनाला टोचत असे. स्त्रीचे दुय्यम स्थान मला आवडत नसे.त्या सगळयांना सुरूंग लावण्याचे काम मी विवाह करून सासरी येताच सुरू केले. कार्याचा पाया होता गांधीची विचारत्रयी. अहिंसा, प्रेम, सत्य यांचा विचार मी केला. कुटुंबापासून सुरूवात केली. जुन्या विचाराच्या विळख्यात अडकलेल्या स्त्रीला



मुक्त करण्याचा तो लढा होता. नवी क्रांती अपेक्षित होती मला, स्त्रीला माणूस म्हणून जगता आले पाहिजे. अशी माझी धारणा होती. विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता यांच्यासाठी कांहीतरी

करायला हवे. तिला तसे शिक्षण मिळाले पाहिजे. जातीयता हा मोठा कलंक आहे. ह्या संदर्भातही कांही प्रमाणात सुरूवात मी त्याच काळात केली होती. सर्व कार्यक्रम राबविता यावेत म्हणून मी खूप प्रयत्नशील होते. पण मनांत परस्परविरोधी मतांची खूप गर्दी होई. त्यामुळे आपला हा प्रवास चुकत तर नाही ना? असेही कधी कधी वाटे. त्या स्वतःच्या विचारांशी, स्वतःशीही माझा लढा चालला होता. दुसऱ्या शब्दांत मला म्हणावेसे वाटते की माझा स्वातंत्र्य लढा तिरंगी होता. काळ कुणासाठीही थांबत नाही हेच खरे. काळाच्या ओघात देश स्वतंत्र झाला. खूप आनंदोत्सव आम्ही साजरा केला. खूप अपेक्षा होत्या आमच्या. राष्ट्रविकासाचे स्वप्न आम्ही बघत होतो. स्वतंत्र भारताचा झेंडा फडकवायचा मान माझ्या पतीला मिळाला होता. दिवसभर जल्लोष चालू होता. स्वप्नपूर्तीचा आनंद कांही औरच, यात शंकाच नको.

खामगाव नगर, तसेच बुलडाणा जिल्हा काँग्रेस महिला विभागाचे अध्यक्षपद बरेच वर्ष माझ्याकडे होते. विदर्भ प्रांत काँग्रेसच्या कार्यकारिणीची सक्रीय सदस्य म्हणून काम केले आहे. प्रांतिक परिषदेतही सदस्य म्हणून माझी निवड झाली होती. इ.स. १९६४ ते १९६७ हया कालखंडात खामगांव नगर परिषदेत निवडणूक लढवून, मी जिंकून येऊन काम करीत राहिले. बुलडाणा जिल्हयातील अनेक संस्थांत मी काम केले आहे. शारदासमाज, खामगांवच्या स्थापनेसाठी मी प्रयत्न केले होते. स्त्रियांची जागृती आणि प्रगती ह्यात मला रस असल्याने संधी मिळाली तर मी संस्थेची सभासद होत असे. देशाचा आधार असतो लहान मुले. हया भावी नागरिकांचा विकास केला पाहिजे. त्यांना संधी मिळावी यासाठी कांहीतरी करायची माझी खूप इच्छा होती. त्यासाठी इ.स. १९५४ मध्ये मुलांसाठी एक शिशुमंदिर मी सुरू केले. यात सर्वभाषीक, मराठी, हिन्दी, गुजराथी, मारवाडी, सिंधी सर्व भाषा बोलणारी छोटी मुले-मुली शिकवायला सुरूवात केली. ह्या शिशु मंदीराला शासकीय मान्यता मिळाली असून आता संस्था नावारूपाला आली आहे. या मुलांना शिकण्यासाठी सर्व प्रकारची शैक्षणिक साधने उपलब्ध होतील अशी काळजी मी घेतली. खेळण्याची साधने, खेळणीही त्यांच्यासाठी आहेत. तसेच ह्या मुलांना 'हँडमेड पेपर' तयार करायला शिकविले. कागद, मणी, कापड यांपासून वस्तू तयार करण्याचे शिक्षण इथे दिले जात असे. सुरूवातीला अनेक वर्ष मीच स्वतः शिकवित असे. त्याची सर्वच जबाबदारी माझी होती. जिल्ह्यातील एक चांगले शिशुमंदीर म्हणून ते ओळखले जाई.

विदर्भातील राजकारण स्वातंत्र्यानंतर विदर्भ केसरी ब्रिजलालजी बियाणी यांच्या नेतृत्वाखाली सुरू होते. आम्ही दोघेही पतीपत्नी त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे कार्य करीत असू. पण ज्याठिकाणी आमचे मतभेद असत, तिथे कडाडून विरोधही केला होता. त्यांनाही त्यात वाईट वगैरे वाटत नसे. खऱ्या अर्थाने लोकशाही राबवायची असेल तर विरोध हवा, असे आमचे मत होते. आम्ही उभयता त्यांच्याप्रमाणेच स्वतंत्र विदर्भ राज्य असावे ह्या मताचे होतो.

विदर्भ स्वसंरक्षणक्षम तर आहेच. शिवाय इथली भाषा प्राचीन, सुसंस्कृत आहे. वैदर्भीरीती हे इथल्या भाषेने मराठी भाषेला दिलेले वरदान आहे. महाकवी कालीदासही ह्या शैलीत लेखन करीत असे. इथली संस्कृती खूप प्राचीन आहे. रामायण, महाभारतापासूनचा त्याचा इतिहास उपलब्ध आहे. इथली भौगोलिक परिस्थिती वेगळया राज्याला अनुकूल आहे. त्याची स्वतंत्र आर्थिक विकास करण्याएवढी ताकद आहे, म्हणून स्वतंत्र विदर्भ राज्य व्हावे असे मलाही पटले होते. स्वतंत्र विदर्भ झाला तर अनेक क्षेत्रातले मागासलेपण लवकर कमी होईल. एकच भाषा बोलतात म्हणून सर्व लोकांचा एकच प्रदेश निर्माण करणे योग्य नाही. त्यांची छोटी छोटी राज्येही सुखाने राहू शकतील. विकास अधिक वेगाने करू शकतील. महाराष्ट्राच्या बरोबर राहिल्याने विदर्भाचा विकास कधीच होणार नाही असे आमचे मत होते. छोटया-छोटया राज्यांची भीती शासनाला वाटू नये. मोठी राज्ये केन्द्राला तापदायक ठरू शकतात असेही आम्हाला वाटे. छोटया राज्यांचा आणखी एक महत्त्वाचा फायदा असा आहे की जनतेच्या समस्या, आलेली संकटे समजून त्याचे निराकरण करणेही सहज शक्य व सुलभ होईल या दृष्टीने स्वतंत्र विदर्भाची मागणी आम्ही करीत होतो. आम्ही आंदोलनही केले. परंतु शासनाने तिकडे लक्ष दिले नाही. म्हणून आंदोलनाला गती यावी असा प्रयत्न करण्याची योजना बियाणींनी आखली. त्याचा एक भाग होता विदर्भ स्वतंत्र हवा असणाऱ्यांनी काँग्रेसचे राजीनामे द्यावेत. आम्हीही आमच्या पदांचे, सभासदत्वाचे राजीनामे दिले. पुढे जेव्हा नगरपरिषदेची निवडणूक मी लढविली तेव्हा अपक्ष म्हणून उभी राहिले होते. त्यानंतर आम्ही पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला नाही. तसेच दुसऱ्या कोणत्याही राजकीय पक्षात प्रवेश केला नाही. राजकारणापेक्षा समाजकारणच आम्हाला महत्त्वाचे वाटत होते.

घूंघट प्रथा, जशी मी टाकून दिली. तसाच आणखी एक प्रयोग सुरू केला. माझा विवाह रूपया नारळ देऊन ठरला. विवाहही साध्या पध्दतीनेच झाला. हुंडा, मानपान, फटाके, वाजंत्री,

नाचगाणे या सगळया गोष्टी अनावश्यक आहेत हे आम्हाला पटले होते. आमच्या मुलांच्या विवाहतही तोच पायंडा आम्ही पाळला. आमचा विरोध तर बोलून आम्ही दाखवत होतोच, पण प्रत्यक्ष कृतीही तशी करू लागलो. समाजविघातक रूढी परंपरांनाही विरोध करू लागलो. विवाह करतांना मुलगा-मुलगी हयांच्या पसंतीला प्राधान्य द्यायला हवे कारण पुढचे आयुष्य त्यांना सोबत जगायचे असते, असा प्रचार आम्ही करू लागलो. वेगवेगळया प्रांतात राहणारे एकाच पध्दतीचे खाणे पिणे राहणे, भाषा, संस्कार समान असणाऱ्यांचे विवाह व्हावेत असे आम्ही सांगू लागलो. उदा. दिल्लीवाले अग्रवाल, पंजाबी अग्रवाल, माहेश्वरी, ओसवाल, खंडेलवाल यांनी आपसात विवाह करायला हरकत नाही असे मत मांडू लागलो. असे केल्याने वधूवर निवडीला व्यापक क्षेत्र मिळेल, अधिक योग्य निवडीची संधी मिळेल. यातून समाजाच्या समस्या, प्रश्न यांचा परिचय होईल. मैत्री वाढेल संकुचितता कमी होईल. थोडक्यात सामाजिक सुधारणांवर माझा अधिक जोर होता. आज आनंदाची गोष्ट आहे की मोठया प्रमाणात सुधारणा होत आहेत. लोक विचार करू लागलेत. मुली मुलांच्या बरोबरीने शिकताहेत, अर्थार्जन करताहेत. एक नवा मनू दिसतो आहे. माझ्या स्वातंत्र्यलढयाचा हा आणखी एक पैलू आहे.

महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटना सांगायलाच हव्यात. कारण माझ्या कामाची पावती त्या देतात. माझी धारणा आहे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुभद्राताई जोशींबरोबर महाराष्ट्राच्या वतीने दिल्ली अधिवेशनाला गेले होते. महाराष्ट्राची प्रतिनिधी म्हणून तेव्हा ओळख करून दिली गेली तेव्हा मला खूप आनंद तर झालाच पण महाराष्ट्राचा अभिमानही वाटला होता. नागपूरला पट्टाभी सीतारामय्यांचा कार्यक्रम घ्यायचा. अखिल भारतीय काँग्रेसच्या सेक्रेटरी त्यावेळी मुकुल मुखर्जी होत्या. त्यासाठी इंदिरा गांधीची भेट घेऊन तो कार्यक्रम आयोजित केला होता. इंदिरा गांधी खामगांवला आल्या, तेव्हा त्यांनी आमच्या शिशु मंदिराला भेट दिली होती. जयपूरला काँग्रेस अधिवेशनालाही मी गेले होते. त्यावेळी आमचे कुलदैवत राणीसतीच्या दर्शनाला झुनझुनुला गेले होते. आमचे मूळ गांवही तेच आहे. मोठया मुलाच्या जावळीचा प्रसंग आठवला त्यावेळी. दिवस बदलतात हेच खरे. स्वतंत्र विदर्भ हवा यासाठी आंदोलनाचा अवलंब केला पण अपयश आल्याने सक्रीय राजकारणांतून निवृत्त जरी झाले तरी देशाबद्दलचे प्रेम कमी झाले नाही. कारण राजकारण समाजकारणापेक्षा देश मोठा असतो. त्याच्यामुळेच आपली ओळख असते असे मला कायम वाटत आले. काँग्रेसच्या त्या

काळच्या नेत्यांनीच आम्हाला घडवलं. ते मला तेव्हाही आदर्श आदरणीय वाटायचे, आजही तसेच वाटतात. असो



# स्वातंत्र्य दिन

## १५ ऑगस्ट १९४७- खामगांव- स्वातंत्र्य दिन

ज्यासाठी प्राण पणाला लावले ते स्वातंत्र्य अखेरीस मिळाले. पण त्या आधी एक क्लेषदायक घटना घडलीच. खरे तर हिंदू मुसलमानांनी एक दिलाने खांद्यालाखांदा लावून स्वातंत्र्याचा लढा साकारला होता. पण --- तरीही स्वातंत्र्य हे स्वातंत्र्यच असते. त्याची तुलना कशाशीही करू नये, करता येत नाही. गांधींच्या नेतृत्वाखाली परवशतेच्या बेड्या तोडून आम्ही यशस्वी झालो होतो. जवळजवळ दीडशे वर्षांनी परत एकदा मोकळा श्वास घेण्याची वेळ आली होती. अदम्य उत्साह आनंद संचारला होता कार्यकर्त्यात. आजवर खुलेआम आपल्याला काय हवे हे जनता सांगू शकली नाही ती उत्साहीत झाली होती. संपूर्ण देशांत ह्या सुवर्णाक्षरांत लिहिल्या गेलेल्या दिवसाचा जल्लोष सुरु होता. आनंद ओसंडून वाहत होता. खामगांवही त्याला अपवाद नव्हते. मोहल्ल्या मोहाल्ल्यातून गल्ली गल्लीतून लोक राष्ट्रगीत म्हणत होते. 'चरखा चला चलाके लेंगे स्वराज लेंगे' गात लोक चालले होते. 'झंडा उंचा रहे हमारा'चे स्वर गुंजत होते. प्रभातफेरी पासूनच सुरुवात झाली होती. भल्या पहाटे सडारांगोळ्यांनी रस्ते नटले होते. राष्ट्रीय तिरंगी झेंडे घरांघरांवर डौलत फडकत होते. फुलांची, आंब्याची तोरणे दारां-दारांवर लावलेली होती. एक नवा राष्ट्रीय सण सुरु झाला होता. रात्रीपासूनच रंगबेरंगी दिव्यांच्या  माळा लखलखत होत्या. फटाक्यांची आतिषबाजी सुरु होती. काय करू अन् काय नको अशी स्थिती आम्हा सर्वांचीच झाली होती. मिठाई मुक्त हस्ताने वाटली जात होती. गुलाल उधळला जात होता. तरुण वृद्ध, स्त्रिया मुलें, राव, रंक, खेडूत नागरी सारेच खूष होते. सकाळी प्रभातफेऱ्या तर झाल्याच पण त्यानंतर तिरंगे हाती घेवून सर्व ठिकाणाहून मिरवणुकीने लोक टिळक मैदानात एकत्रित झाले होते. कारण माझे पती पुरुषोत्तमजींच्या हस्ते ठीक आठ वाजता सकाळी ध्यजारोहण होणार होते.  खामगांव नगर कमेटी अध्यक्ष, बुलढाणा जिल्हा काँग्रेस अध्यक्षही तेच होते. एक बहुमान त्यांना लोकांनी दिला होता. त्यांच्या कार्याचे चीज झाले होते. टिळक मैदानावर जमलेल्या लोकांनी मोठ्या आनंदाने 'भारत माताकी जय, महात्मा गांधीकी जय, वंदेमातरम्' असे नारे दिले होते. त्यात त्यांच्याही नावाचा जय जयकार  केला गेला. माझ्या अंगावर आनंदाचे रोमांच उभे राहिले. मन भरून आले होते. सगळ्या श्रमांचे सार्थक झाले होते.

त्या दिवशी म्हटल्या गेल्या राष्ट्रगीताच्या स्वरात अनुपम आनंद, जोम, उत्साह सामावलेला होता. त्या आधीही तिरंगा आणि राष्ट्रगीताने आनंद धैर्य दिले होतेच. पण तो दिवस काही निराळाच होता. तशी उर्मी, तसा उत्साह पुन्हा कानावर पडला नाही.

टिळक मैदानावर त्यानंतर सभा झाली. त्या सभेला उद्देशून माझ्या पतींनी भाषण दिले होते. आनंदाने त्यांचे मन भरून आले होते. गळा रुध्द झाला होता. दास्याच्या शृंखलेतून भारतमाता मुक्त झाली. हा भाग्याचा क्षण अनुभवाचा आनंद मिळतो आहे म्हणून रयतेचे त्यांनी अभिनंदन केले. हे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लोकांनी अनेक संकटांना तोंड दिले. खूप कष्ट सहन केले. अनेकांनी बंदुकीच्या गोळया हसत हसत छातीवर झेलल्या. कारावास, फाशी, फटके किती किती यातना सहन केल्या या स्वातंत्र्य सेनेने. कित्येकांना मरणही स्वीकारावे लागले. ह्या सगळया हुतात्म्यांची नांवे सुध्दा माहित नाहीत. त्या सर्वांचे पुण्यस्मरण करणे आपले कर्तव्य आहे. त्यांना श्रध्दांजली अर्पण करून, त्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही असे आपण ठरवू या. तशी शपथ घेवू या. तसेच हे स्वतंत्रता अभियान ज्यांच्या नेतृत्वाखाली चालले, त्या महात्माजींना आपण अभिवादन करू या. असे विचार त्यांनी ध्वजारोहणानंतर व्यक्त केले होते.

त्या दिवशी दिवसभर ठिकठिकाणी गरीबांसाठी अन्नदान करण्यात आले. विद्यार्थांसाठी क्रीडास्पर्धाचे आयोजन केले होते. मिरवणुका, सभा तर खूपच ठिकाणी झाल्या. रात्री दिव्यांची आतिषबाजी आणि फटाके उडविणेही झाले. जणू काही दिवाळीच साजरी केली लोकांनी.

स्वातंत्र्य मिळाले. स्वतंत्र भारत कसा असेल ह्याची स्वप्ने पाहिली होती आम्ही. फक्त आम्हीच नाही तर स्वातंत्र्य लढ्याकडे नजर ठेवून असणाऱ्यांनीही स्वप्नं पहिली होती. आपल्या प्राणांची आहुती देऊन हौतात्म्य स्वीकारतांना, बंदुकीची गोळी झेलतांना किंवा फाशीचे दोर गळयात आवळले जातांनाही हेच स्वप्न बघत होते. साऱ्यांना शांती, विकास, प्रगती, सुबत्ता हवी होती. 'सगळयांना मिळावे शिक्षण, सगळयांना मिळावे पोटभर जेवण, आता नको यायला रावण'. असे वाटत होते की आता आमचे राज्य आले आहे. ते सुखाचा, समाधानाचा मार्ग साऱ्यांना देईल.

भेदभाव न करावा, नको उगा खोटा देखावा, बंधुभाव मनी रहावा, यापरते काहीच नको होते. आरोग्यसंपन्न, आत्मनिर्भर राष्ट्र उभे करण्याचे आव्हान आता प्रत्यक्षात उतरवायचे होते. .............. किती मनी येत होते ..........पण.............



# आईची भूमिका

स्त्रीच्या आयुष्यांतील महत्वाचा क्षण कोणता असा प्रश्न जर कोणी विचारला तर? तर मी उत्तर देईन ‘आई होणे’. आई होणे ही भाग्याची गोष्ट आहे. ते भाग्य मला लाभलं. एक मुलगी आणि तीन मुले आहेत मला. पहिली मुलगी झाली. ‘पहिली बेटी धनाची पेटी’ म्हणत, आपल्या मनाचे समाधान मी कधी केले नाही. तसेच मुलगी झाली म्हणून मला वाईटही कधी वाटले नाही. मुली इतके आईचे मन कुणीच जाणत नाही. समज आल्यापासून ती मैत्रीण होते. आजही माझी मुलगी हितगुज करतांना मला वाटते की, ज्यांना मुलगी नाही ते केवढ्या मोठ्या आनंदाला मुकत असतात.



माझी मुलगी डॉक्टर आहे. एम.बी.बी.एस. आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील लोकांच्या विचारसरणीकडे पाहिले तर मुलीला वैद्यकीय शिक्षण देणे दूर, साधे शिक्षण देण्याची कल्पना फारशी कुणाला रुचणे शक्यच नव्हते. सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण कुटुंबातही अभावानेच हा विचार असे. या पार्श्वभूमीवर एका मारवाडी कुटुंबातील मुलीला वैद्यकीय शिक्षणाला परवानगी मिळणे अशक्यच होते. माझ्या मुलीला- सुधाला उत्तम गुण मिळाले होते

मॅट्रिकला. तिला पुढे शिकण्याची, वैद्यकीय शिक्षण घेण्याची खूप इच्छा होती. आईलाही मुलीने शिकावेसे वाटत होते. पण मुलीच्या पित्याला मात्र मुलीने शिकण्याची कल्पना मान्य नव्हती. मुलीला शिकवायचेच होते यात तीळमात्र शंका नव्हती. पण मार्ग कसा काढायचा? मोठा गहन प्रश्न होता माझ्यापुढे. मी विचार  करीत होते. काय करावे समजत नव्हते. वेळ काढून चालणार नव्हते.

मला अकस्मात एक प्रसंग आठवला. महात्मांजीच्या आयुष्याशी त्याचा संदर्भ होता. कसाबाच्या हातून गायीला वाचवायचे असेल तर गायीला पाहूनही, पाहिली नाही म्हणणारे बापुजी आठवले मला. गायीला वाचविण्यासाठी सत्याची कास धरणारे गांधी खोटे बोलले होते. त्याचे स्पष्टीकरण त्यांनीच केले पुढे. सत्य कल्पना तौलनिक आहे. जर गाय पाहिली असे सांगितले असते तर गाय मारली गेली असती. तिला वाचविण्यासाठी 'खोटे बोलणे' योग्य होते. मी देखील असाच प्रयोग करायचा असे ठरविले.

मी लेकीला सांगितले, 'तू काळजी करू नकोस. मी तुझ्या पाठीशी आहे. मी सांगते तसे तू वाग. मी सांगते तसे 'नाटक' तूं व्यवस्थित वठव. तूं व्यवस्थित खा, पी. पण मी तुझ्या वडिलांना सांगेन की तुम्ही सुधाच्या पुढील शिक्षणाला परवानगी देत नाही म्हणून ती खूप नाराज झाली आहे. ती ४-५ दिवस झाले कांही खातपीत नाही. जोपर्यंत ते परवानगी देणार नाहीत तोपर्यंत नाटक सुरु ठेवायचे'. आमचा बेत नक्की झाला.

दररोज म्हणजे ४-५ दिवस मी घरात सांगत असे की, वैद्यकीय शिक्षण घेण्यास जोपर्यंत परवानगी आपण देत नाही तोवर सुधा अन्न ग्रहण करणार नाही असे म्हणते आहे. अखेरीस त्यांनी तिच्या शिक्षणाला होकार दिला. प्रसंगी चांगल्या कामासाठी खोटे बोलावे लागले तरी चालेल, पण चांगले कार्य व्हायलाच हवे असे माझे मत आहे. खरे आणि खोटे या संज्ञा तौलनिक आहेत असे मी महात्माजींच्या तोंडून ऐकले होते. ते प्रत्यक्षात मी आणले होते. महाभारत वाचून कृष्णाच्या जीवनाचे रहस्य मला कळले होते. मुलीच्या पुढील शिक्षणाला संमती तर मिळाली होती. पण प्रवेशाचा यक्ष प्रश्न अद्याप शिल्लकच होता. परिक्षेत चांगले गुण मिळाले होते. प्रवेश नक्की मिळेल असे वाटत होते. तरीही 'भूक नसो शिदोरी असो' या न्यायाने विचार केला. पतीला सांगितले की, अकोल्याचे ना. ब्रिजलाल बियाणीजी त्यावेळी शिक्षण मंत्री होते. त्यांच्याशी

मुलीच्या प्रवेशाबद्दल बोलून ठेवावे. त्यांना ही कल्पना कधीही मान्य होणार नाही, याची जाणिव मला होतीच. झालेही तसेच. त्यांनी माझ्या सूचनेकडे साफ दुर्लक्ष केले. मुलीला वैद्यकीय महाविद्यालयांत गुणांच्या आधारे सहज प्रवेश मिळाला. पण लेकीच्या शिक्षणाबाबत जी सजगता हवी ती आजही नाही याचे दुःख होते. आपल्या तत्वज्ञानावर मातांनी ठाम राहायला हवे. मुलीच्या आयुष्याचा विचार मातेनेच करायला हवा.

मातेबरोबरच पित्याने देखिल जागरूक राहायला हवे. आपल्या पाल्यांना हव्या त्या अभ्यासक्रमांत प्रवेश मिळावा म्हणून वाटेल ते प्रयत्न करणाऱ्या पालकांनी विचार करायला हवा असे मला वाटते. आज शिक्षण क्षेत्रात ‘राजकारणी’ लोकांची चाललेली उठाठेव मला पसंत नाही. शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. अनेक वाईट प्रवृत्ती शिक्षणक्षेत्रात पसरत चालल्या आहेत. ही माझी खंत आहे. गुणवत्तेबरोबरच निवडलेल्या क्षेत्रात रस असायला हवा. त्यासाठी परिश्रमाची जोड द्यायला हवी.

मुलगी म्हणजे दुय्यम. घरातली कामे तिला यायलाच हवीत. सतत घरांतल्या स्त्रियांना कामात तिने मदत केली पाहिजे. ‘स्त्रीच्या जातीला’ असे म्हणत सतत मुलींना अडविणे, टोकणे मला आवडत नाही. घरात मला खूप काम असे. त्यामुळे मुलगी घरकामांत मदतीला येई. मला वाटे हिने अभ्यास करावा. तिला मी रागवायची. मला मदतीची गरज नाही म्हणायची. मला वाटतं मुलीला घरकाम करते म्हणून रागावणारी आई महत्वाची आहे. मुलीने काम करायला माझा विरोध नव्हता. विरोध होता अभ्यासाकडे दुर्लक्ष करून काम करण्याला. माझा कटाक्ष असे तिच्या अभ्यासावर. तो तिने व्यवस्थितच केला पाहिजे असे वाटे.

मुलींना शिक्षण कां द्यायचे ह्याचाही विचार मी केला होता. दोन मुद्दे महत्वाचे आहेत. त्यातही, एक म्हणजे सुशिक्षित आई संपूर्ण कुटुंबाला सुशिक्षित करते. महात्माजी म्हणत की एका पुरुषाला शिकवून जेवढा परिणाम साधता येणार नाही. त्यापेक्षा जास्त परिणाम स्त्रीला शिक्षण देऊन साधता येईल. रिमझिमणारा पाऊस जे कार्य करतो ते स्त्री करीत असते. गांधीच्या विचारसरणीचा माझ्यावर खूप परिणाम झालाय. त्यामुळे त्याची प्रत्यक्षांत अंमलबजावणी करणे आपले कर्तव्य आहे असे मला वाटते. दुसरा विचार असा होता की, मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहता आले पाहिजे. त्या आत्मनिर्भर असाव्यात म्हणून त्यांना शिक्षण कोणते द्यायचे हे ठरविणे गरजेचे आहे. स्त्रीला अर्थार्जन करता येईल असे शिक्षण, शक्यतोवर

व्यावसायिक शिक्षण दिले जावे असे माझे मत आहे. शिकणाऱ्या मुलींनी प्रथम अभ्यास करावा. घरकामाकडे थोडे दुर्लक्ष झाले तरी चालेल अशी माझी भूमिका होती, आहे, राहील. मुलीला काम करते म्हणून रागावणारी आई म्हणून माझ्याकडे लोक आश्चर्याने बघत असत. आता मोठी झालेली मुलगी त्या जुन्या आठवणींना उजळा देत हसून म्हणत असते की प्रत्येक आईने तुझा आदर्श समोर ठेवायला हवा. मुलगी कळवळून सांगायची, ‘‘मी अभ्यासही करते, मी मागे पडणार नाही. काम करू दे मला‘‘. मी मात्र निक्षून म्हणत असेकी, कामाचा वेळ जर अभ्यासासाठी उपयोगांत आणला तर आणखी जास्त गुण मिळतील. माझी नातवंड म्हणतात की मुलीला अभ्यासाला प्रोत्साहन देणारी, घरकाम करते म्हणून रागावणारी आई आजही दुर्मिळ आहे. तेंव्हा मी मनाशी हसते आणि म्हणते की अजून समाजाला आईच्या कर्तृत्वाची पूर्ण जाणीव नाही.

आपले व्यक्तीमत्व आपणच घडवायचे असते. संधी सहजासहजी मिळत नाही. स्त्रीला तरी नक्कीच नाही. संधी मिळवावी लागते. ती मिळाल्यावर तिचे सोने करायला कष्ट करायचे असतात. थांबून चालत नसते. असे मला नेहमी वाटे.

स्त्रीला व्यावसायिक शिक्षणच कां? ह्या प्रश्नाने मी खूपदा विचारात पडले आहे. अनेकांनी त्या संदर्भात सवालही केले आहेत. माझ्या विचारांची दिशा सांगायला हवी. स्त्रीला जगतांना जेंव्हा सासरी किंवा माहेरी कुठेही आधार मिळत नाही तेंव्हा स्वाभिमानाने आपल्या पायावर उभे राहून कुटुंबाचे पालनपोषण तिला करता आले पाहिजे. आश्रित म्हणून जगणारी स्त्री अन् तिचे कुटुंब, हे मन मारून जगते. अपमानाला सारखे सामोरे जाऊन आत्मसन्मानाची गळचेपी होते. त्यांच्या आपल्या अवतीभवती आजही असे दिसते. ह्यावर तोडगा स्त्रीला शिक्षण, तेही व्यावसायिकच दिले पाहिजे. माझी मुलगी परभणीजवळ असलेल्या एका छोट्या गांवात ‘सेलू’ येथे वैद्यकीय व्यवसाय करीत असे. पती-पत्नी दोघेही व्यावसायिक आहेत. वैद्यकीय व्यवसाय खासगी रितीने करणे कोणत्याच काळत सहज सोपे नव्हते, नाही. तिच्या सासरची आर्थिक परिस्थिती जेमतेम होती. ह्या पार्श्वभूमीवर एवढे मोठे धाडस कठीणच होते. पण पैसा, आर्थिक सुबत्ता स्थैर्य हा विचार वैद्यकीय व्यवसायाला योग्य नाही असे मी तिला पटवून दिले होते. त्यानुसार ती व्यवसाय करीत राहिली. पैसा मिळाला पाहिजे म्हणून आजतागायत व्यवसायाशी तडजोड कधीच केली नाही. वैद्यकीय व्यवसायाचा एकमेव उद्देश समाजसेवाच असायला हवा

असे आजही मला वाटते, ‘स्त्री भ्रूणहत्या’ महापाप आहे. हा आईचा दृष्टीकोन समोर ठेवणाऱ्या, सेवारत असणाऱ्या कन्येचा मला खूप अभिमान आहे.

विवाह म्हणजे आयुष्यातील फार मोठी घटना आहे. जिचा परिणाम कुटुंबावर तर होतोच पण समाजाशीही त्याचा जवळचा संबंध असतो. ‘सोय जाणील तो सोयरा’ असे तोंडाने म्हणत. त्रास देणारे सोयरे कांही कमी नाहीत. पण विवाहात देणे-घेणे मान-पान यांनाच महत्व देऊन वागणारे लोक पाहिले की चीड येते. देणे-घेणे, मान-पान मला कधीही मान्य नव्हते. मुलीच्या लग्नात आंदण म्हणून तिच्या वैद्यकीय व्यवसायाला लागणारी आयुधे, उपकरणेच ठरवून दिली होती. विवाहाला उपस्थित राहणाऱ्या नातेवाईक, मित्रपरिवाराला ‘कोणतीही भेटवस्तू, किंवा अहेर स्वीकारणार नाही’ असे स्पष्ट शब्दांत सांगितले होते. त्यानुसार, अंमलबजावणी देखिल ५० वर्षांपूर्वी केली होती. लग्नांत कुणाकडूनही कशाची अपेक्षा ठेवली नव्हती. कुठल्याही भेटवस्तू स्वीकारल्या नव्हत्या. तरीही एक गोष्ट नोंदवायालाच हवी . ती म्हणजे माझ्या माहेरच्या अहेराला नकार देता आला नाही. तो स्वीकारावाच लागला. दुसरे म्हणजे माझ्या कांही मैत्रिणींनाही नाही म्हणता आले नाही. हे अपवाद वगळल्यास लग्नातील मोठ्या प्रमाणांत होणारी देवाणघेवाण जवळजवळ टाळलीच. ही पध्दत माणसामाणसांत भेदभाव निर्माण करते. खरे वास्तविक पाहतां भेटवस्तूंमागील भावना महत्वाची असते, त्याची किंमत नाही. ‘अहेर’ करण्यामागेही उद्देश मदतीचा हात पुढे करणे असा असतो. पण त्याचे स्वरूप सुरुवातीपासूनच विकृत राहिल्याने ते सर्व नकोच असे वाटते. अंथरुण पाहून पाय पसरायचे असतात. अपेक्षा आणि भीड, संकोच नात्यांचे धागे जाणून त्यात अंतर निर्माण करतात. यांना म्हणजे अपेक्षा, भीड, संकोच यांना टाळता येणे अशक्य आहे. तरीही संयमाने त्यात तडजोड सहज शक्य आहे. हा माझा अनुभव आहे. माहेरचा अहेर अन् मैत्रिणींच्या भेटवस्तू यांतून लेकीच्या व्यवसायाला मदत असण्याऱ्या वस्तूच स्वीकारल्या होत्या. मला ह्या लग्नाबद्दल आणखी एक नोंद करावीशी वाटते. ती म्हणजे एकाच जातीचे असूनही त्यात वेगळे असल्याची भावना प्रत्येक समाजात आहे. मारवाडी समाजदेखील त्याला अपवाद नाही. तो भेदभाव वगळून आम्ही सहज विवाहसोहळा संपन्न करून नव्या पिढीसमोर आणखी नवा विचार समोर ठेवला असे मला वाटते.

वैद्यकीय व्यवसाय करण्याऱ्या मुलीकडून माझ्या कांही अपेक्षा होत्या. मुख्य म्हणजे तिने या व्यवसायातून मिळणाऱ्या विश्वासाचा उपयोग करून जनजागरण करावे असे मला वाटत होते. तिने जातीयतेपासून कायम दूर राहिले पाहिजे. जाती माणसा-माणसांत वितुष्ट निर्माण करतात. माणुसकीला काळिमा फासणारी कृत्ये करतात. माणूस ही एकच जात, असे समजून वागले तर जगातल्या निम्म्या समस्या तरी कमी होतील अशी मला खात्री आहे. फक्त वैद्यकीय व्यवसायातच नव्हे तर कोणत्याही व्यावसायिकाने जाती संदर्भात तटस्थ राहून वागल्यास अनेक गोष्टी साधता येणे शक्य आहे. असे फक्त मुलीलाच नाही तर मुलांनादेखील समजावून सांगितले आहे. आजच्या समाजाचे बिघडणारे चित्र सुधारायचे असेल तर जातीला दूरच ठेवायला हवे यात शंका नाही.

आणखी एक गोष्ट महत्वाची आहे. अंधश्रद्धा आणि अविवेक टाळायलाच हवेत. समाजातून त्याची हकालपट्टी करायला हवी. त्यानुसार प्रयत्नांची नितांत आवश्यकता आहे. आपली मुलगी आपल्या विचारांच्या आधारे वागते यांचा मला अभिमान वाटतो. मुलगी ज्या ठिकाणी व्यवसाय करते तो प्रदेश मुसलमान बहुल आहे. तिच्याकडे उपचारांसाठी येणाऱ्या त्या समाजातील स्त्रियांना कुटुंबनियोजनाचे महत्व तिने पटवून दिले असून त्या समाजातील ज्या तरुण स्त्रियांना संतती होत नव्हती त्यांच्यावर मोफत उपचार करून त्यांचे वंध्यत्व दूर केले आहे. तसेच या कारणाने होणारे दुसरे विवाह, पुनर्विवाह टाळले जातील असाही प्रयत्न ती सतत करीत असते. याप्रकारच्या सुधारणेचा मार्ग सोपा नाही. त्यासाठी धैर्य तर हवेच. शिवाय सामोरे जाण्याची जिद्द हवी. परिणामांची फिकीर करूनही चालणार नाही हे तिला अनुभवाने कळले आहे. आज स्त्रियांचे आरोग्य आणि सामाजिक स्थैर्य हवे असेल तर वैद्यकीय व्यावसायिकांनी पुढे होऊन सुरुवात करायला हवी. मनपरिवर्तन आणि मतपरिवर्तन करण्याची कला महत्वाची आहे असे मला वाटते.

झुनझुनवाला परिवारांतील स्त्रियांना तर कायमच आपण मदत केलीय कारण त्यांनी मला सासुरवास केला तरी त्यात त्यांची चूक आहे असे मला वाटत नसे. परंपरेने चालत आलेल्या गोष्टी अर्थपूर्ण असतील तर नक्कीच केल्या पाहिजेत. पण थोतांड, अंधश्रद्धा यांना मात्र थारा द्यायलाच नको अशी माझी धारणा आहे.

एक मजेशीर गोष्ट मला आठवते. माझी मुलगी मुंबईला एक्सरे मशीनचे प्रशिक्षण घ्यायला गेली होती. वैद्यकीय व्यवसायात त्याची खूप गरज असते. मुलीला ते हाताळणारा

माणूस ठेवता येण्यासारखी परिस्थिती नव्हती म्हणून बॉम्बे हॉस्पीटलमध्ये ती गेली. बिर्ला ग्रुपने त्या हॉस्पीटलला आर्थिक मदत केली आहे. बजाज आणि बिर्ला ह्यांचे संबंध चांगले होते. सीता बजाजांची मुलगी सगळेच ओळखत होते. त्यामुळे आमच्या मुलीला 'सीतेची मुलगी' म्हणूनच सगळे ओळखू लागले. तिला त्याचा खूप आनंद आणि अभिमान वाटला होता. अर्थात मलाही खूप चांगले वाटले होते, हे देखिल मला सांगायलाच हवे.

लहान वयात मुले जरा जास्तच भावनाप्रधान असतात. अगदी छोट्याछोट्या गोष्टी मिळाल्या नाहीत तरी ती दुखावतात. माझे बाळमन असे बरेचदा दुःखी झाले होते. ते लक्षात ठेवून माझ्या मुलांची मने जोपासली होती. मला सर्वच पालकांना सांगावेसे वाटते की बाळमनाची जपवणूक करायला हवी. त्याचा अर्थ असा नाही की त्यांचे उगीचच लाड करायचे. बाळमानसशास्त्रावर मात्र माझा फारसा विश्वास नाही. तरुणाचे मनही सांभाळावे लागते. सुधाचा विवाह मारवाडी कुटुंबातच झाला आहे. पण दुसऱ्या शाखेत. आम्ही अग्रवाल ते माहेश्वरी. पण ह्या विवाहाला मान्यता मी दिली. कारण स्वतःपासूनच सुधारणेला सुरुवात करायला हवी. आजही अशा विवाहाला समाज सहज मान्यता देत नाही. अतिशय संथ चालणारा समाजांचा रूढी परंपराचा गाडा कांही प्रमाणांत पोषक आहे. पण नको असलेला भाग काढून टाकायलाच हवा. काळाची गरज आहे ती. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात फार थोडा फरक असतो. विश्वास आणि निष्ठा श्रद्धेत असते तर अंधश्रद्धेत डोळयांना झापडे लावल्याची स्थिती असते.

मुलींसाठी माझा दृष्टीकोन जरी वेगळा असला तरी मुलांसाठी विचार निराळेच आहेत. मुला,मुलींत मी फरक करीत नाही. प्रपंचात दोघांचीही गरज आहे. प्रत्येकाची भूमिका एकच असायला हवी. स्त्री दुबळी नाही. तिला संधी नाकारता कामा नये असे जरी मला वाटत असले तरी मातृत्वाची जबाबदारी तिने उत्तम रितीने सांभाळायला हवी अशी माझी भूमिका आहे.

मुलांनी घरकाम शिकलेच पाहिजे. त्यांना ते चांगले आले पाहिजे असा माझा आग्रह आहे. त्याला कुणी हट्ट म्हटले तरी चालेल. मुलांनी आपल्या आईला, पत्नीला घरकामांत मदत करणे यात कांहीही गैर नाही असे मी म्हणते. त्या दृष्टीने मी माझ्या मुलांना योग्य ते वळण लावून तयार केले आहे. उत्तम शिकून, उत्तम अर्थार्जन करणारी माझी मुले स्त्रीच्या श्रमांचे मोल जाणतात. त्यांना श्रमप्रतिष्ठा कळते. एवढेच नाहीतर शिक्षणाच्या निमित्याने जबलपूरला, नंतर

आय.आय.टी.त मुंबईला असतांना मुलगा रमेश मित्रांनाही उत्तम शिजवून खाऊ घालायचा. मला ह्याचा खूप अभिमान आहे. मुलगा आणि मुलगी असा विचार कधीच मनात ठेवला नाही. कायम त्यांना समानतेने वागवत आले. इथेच एक गोष्ट सांगायला हवी. मुलीच्या मुलाचा म्हणजे माझ्या नातवाचा विवाह झाल्यावर माझ्या लक्षात आले की व्याह्यांना मुलगा नाही. लगेच नातवाला सांगितले की सासू-सासऱ्यांना आईवडील समजून त्यांची सेवा करणे तुझे कर्तव्य आहे. तुला ते करावेच लागेल. नातवाने आजीचे म्हणण्याला मान देवून एकाच इमारतीत शेजारी-शेजारी सगळे राहतील अशी व्यवस्था केली असून सर्व गुण्यागोविंदाने राहतात. प्रत्येकाने प्राप्त परिस्थितीत भान ठेवून आपले कर्तव्य पार पाडले तर कितीतरी समस्या उद्भवणारच नाहीत असा माझा अंदाज आहे. सुधारणा आणि सुधारक ह्यांचा समन्वय गरजेचा आहे.

आमचे दुसरे अपत्य जगदीश. तोही डॉक्टर झाला असून अमेरिकेत स्थायिक झाला आहे. ह्या माझ्या मुलांने आंतरजातीय विवाह केलाय. ब्राह्मण कुटुंबांतील मुलगी आहे. B.Sc. नर्सिंगचे तिचे शिक्षण झाले आहे. प्रेमविवाह समाजाला चटकन पचनी पडत नाही. पन्नास वर्षापूर्वी तर ते कठीणच होते. मला, घरी कसे सांगावे असा प्रश्न त्याला पडला. बहिणीला सांगावे, तिला विश्वासात घेऊन पुढे जावे असा त्याचा विचार होता. त्याप्रमाणे तो गेलाही. पण नेमक्या त्याच वेळी तेथे एका आंतरजातीय विवाहाची चर्चा सुरु होती. त्यावेळी त्या घरातील वातावरण व नातलगांच्या प्रतिक्रिया पाहून कांहीही सूतोवाच न करता तो परत फिरला होता. त्यानंतर घरात न कळविता तो विवाहबध्द झाला. कुणालाच या संदर्भात कांहीही कल्पना नव्हती. पुढे डॉक्टर बहीण कामानिमित्ताने मुंबईला गेली. तेंव्हा तेथील डॉ. आंबेकरांनी ही बातमी तिला दिली. आपली भावजय आल्याचे तिला कळले. तिनेही ही बातमी आम्हाला कळविली. बातमी कळतांच मुलाने न सांगताच परस्पर लग्न केले म्हणून दुःख तर झालेच. पण त्यापेक्षा जास्त दुःख झाले ते आपले सुधारणावादी विचार कमी पडले म्हणून तरी सासू म्हणून माझे कर्तव्य मी पूर्ण करायचे ठरविले. धाकटा मुलगा अशोक ह्याला मुंबईला पाठवून त्यांना खामगांवी आणवले. सुनेचे म्हणून जे स्वागत करावयाचे असते ते पूर्ण केले. मी जात मानतच नाही. माणूस हीच जात आणि मानवता हाच धर्म यावर माझी नितांत श्रद्धा आहे. आजवर त्यावर निष्ठा ठेवून जगत आलेय. तडजोड या संदर्भात मला मान्य नाही. गृहलक्ष्मी, घरातील पहिली सून म्हणून तिला वस्त्रालंकार दिले. पुढे दोघेही अमेरिकेला गेले. त्या आधी जगदीश एकटाच पुढे गेला. म्हणून कांही दिवस खामगांवी ती आमच्याजवळ होती. त्यावेळी घरी

बसण्यापेक्षा कांहीतरी शिक, अभ्यास कर असे मी सुचविले. त्याप्रमाणे तिने बी.ए. चा अभ्यास केला. सुनांनी शिकले पाहिजे. नवेनवे त्यांना आले पाहिजे. जगाच्या बरोबरीने त्यांनी जगले पाहिजे. मागे पडता कामा नये असे मला वाटते. सुना शिकतातही. मी त्यांना प्रोत्साहन देते. कौतुक करते. आता नातसूनही लग्नानंतर शिकते आहे. मला खूप कौतुक वाटते तिचे. घरात मदत करून ती अभ्यास करते. दुसरी नातसून आपल्या डॉक्टर पतीला त्याच्या व्यवसायात मदत करते आहे. सगळ्या सुना, नातसुना हौशी आहेत. माझ्याशी आदराने वागतात. माझी खूप काळजी घेतात. यापेक्षा अधिक मोठे भाग्य कोणते असणार आहे?

मी भाग्यवती आहे असे मोठ्या अभिमानाने म्हणत असले तरी मनांत एक ठसठसणारी गोष्ट आहेच. तिचाही उल्लेख केलाच पाहिजे. माझा मोठा मुलगा दत्तक गेलाय. त्याच्या सख्ख्या काकांना मुलगा नव्हता. दत्तक जाण्याचा निर्णय पती आणि मुलांने परस्पर घेतला. मला न विचारता हा निर्णय त्यांनी घेतला. मला त्यापासून खूपच दुःख झाले. अजूनही ते दुःख मला विसरता येत नाही. काकांना मूलबाळ नाही. त्यांची, त्यांच्या इस्टेटीची देखभाल करण्यांसाठी तो दत्तक गेला. पण ज्या कारणासाठी तो दत्तक गेला ते तसेच मागे ठेऊन, कायम तो तिकडे राहतो आहे. तिथेच स्थायिक होऊन तिथले नागरिकत्व त्याने घेतले आहे. तरीही माझा धाकटा अशोक, जो खामगांवी स्थायिक झाला आहे. सारे कांही पाहतो. सगळी व्यवस्था नीट करतोय. काय उपयोग झाला दत्तक जाण्याचा? मुळांत मला दत्तक ही कल्पनाच आवडत नाही. त्याची कारण मीमांसा करायची नाही. तरी ही दुसरी मोठी जखम माझ्या मनाला अजूनही त्रास देतेच. खरंच मला विश्वासांत कां घेतले नाही त्यांनी!

जगदीश परदेशांत राहतो. त्याचे घर, त्याचा प्रपंच डोळे भरून बघण्याची इच्छा पूर्ण झाली नाही. सुरुवातीला पतीचे आरोग्य, एवढा लांबचा, मोठा, प्रवास करण्यासारखा नव्हता. त्यामुळे जाता आले नाही. आता माझी शारीरिक स्थिती प्रवास करण्यासारखी नाही. .

कांहीही असले तरी मनाला एक समाधान तरीही मिळते. अमेरिकावारी करून येणारा सांगत असतो. कुणीही भारतीय अडचणीत आहे असे कळले की वाट न पाहता तो मदतीचा हात पुढे करतो. त्यातून अडचणीत असलेली व्यक्ती महाराष्ट्रीयन आहे, खामगावची आहे असे कानावर आले तर मदतीचा हात कुणाचा हे समजणार नाही अशी काळजी घेऊन मदत करतो.

अनेकांनी ही गोष्ट सांगितली आहे. तो ज्या जी. एस. कॉलेजात शिकला तेथील एखादा विद्यार्थी अडचणीत आहे असे कळले तर मदतीला तो धावणारच. मी माझ्या मुलांना लहानपणापासून एक गोष्ट पुन्हा पुन्हा सांगितली आहे की शक्य असेल दुसऱ्याला अवश्य मदत करा. 'अपेक्षा न ठेवता केलेली मदत ईश्वराचे रूप असते'. माझ्या या संस्काराचा प्रभाव अजूनही त्याच्यावर आहे. खरं तर मी त्याला कधीचीच क्षमा केली आहे. त्याचा प्रपंच पाहण्याची इच्छा पूर्ण कधीच होणार नाही आता.

तिसरे आमचे अपत्य आहे रमेश. इथे एक सत्य, कदाचित् कुणाला अहंकार वाटेल तरी, मला नोंदवायचे आहे. माझी सगळीच मुलं बुद्धिमान आणि विचारी आहेत. रमेशने लहान वयातच हे दाखवून दिले आहे. आपली दोन्ही मोठी भावंडे डॉक्टर होत आहेत तेंव्हा आपण कांही तरी वेगळे करून दाखवायचे त्याने ठरविले. याशिवाय आणखी एक विचार तो करीत होता. तीन मुलांचा वैद्यकीय शिक्षणाचा खर्च आपल्या घराला झेपायचा नाही. तेंव्हा आपल्या पुढील शिक्षणाची दिशा त्यानेच ठरवून टाकली. खामगांवच्या स्थानिक गो.से.महाविद्यालयात विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. नंतर जबलपूरला अभियांत्रिकी महाविद्यालयातून पदवी घेऊन पुढील शिक्षणासाठी आय.आय.टी. मुंबई इथे प्रवेश घेतला. पदव्यूत्तर शिक्षणानंतर त्याने मागे वळून बघितलेच नाही. यशाची अनेक शिखरे त्याने पादाक्रांत केली.

मुले थोडी मोठी झाल्यावर माझ्या शिक्षण घेण्याच्या स्वभावाने परत उचल खाल्ली. रमेश अभ्यास करायचा. मीही त्याच्याबरोबर अभ्यासाला बसायची. राष्ट्रभाषा प्रचार समितीची विशारद ही परीक्षा मी उत्तम गुणांनी पास केली. मला तर आनंद झालाच. माझ्या मुलांनाही खूप आनंद झाला होता. हा अभ्यास मा. सेवकजींच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. ते घरी येऊन शिकवत असत. स्वातंत्र्य संग्राम सैनिक असलेले सेवकजी इथल्याच राष्ट्रीय शाळेत शिकत होते. वर्ध्याच्या राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या माध्यमातून हिंदीचा प्रसार आणि प्रचार ते करायला आले होते. गांधीवादी विचारसरणीचे सेवकजी सर्वांशीच आपुलकीने वागत. माझ्या पतीप्रमाणेच त्यांना कारावासाची शिक्षा झाली होती. त्या काळात फारशा स्त्रिया राजकारणात नव्हत्या. मी देखील तशी सक्रीय राजकारणांत नव्हतेच. पण पतीच्याबरोबर छोटी मोठी कामे करीत असे. मुलांनी हिंदी शिकायला हवे असे मला वाटे. जीवनात शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्व आहे असे पटवून देण्याचा प्रयत्न माझा असे. मुलांत ही जाणीव निर्माण झाल्याचे मला दिसत होते. रमेशच्या वागण्यातून ते दिसत असे. माझ्या चारही मुलांत सर्वात हुशार तोच आहे.

माझ्यावर त्याचे जरा जास्तच प्रेम आहे. माझ्या विषयी त्याला अभिमान वाटतो. कुठे या संदर्भात विषय निघाला तर बोलण्यातून तो व्यक्त होतो.

रमेश हुशार आहे असे लक्षात आल्यावर त्याला 'डबल प्रमोशन' देवून शिकविले. त्याचा नियमित अभ्यास मी घेत असे. खरं म्हणजे मी सगळयांनाच सारखे मानत असे पण रमेशची आत्मीयता अधिक असे. आपले आयुष्य घडविण्यात आईचा सिंहाचा वाटा आहे असे तो जेंव्हा म्हणतो तेंव्हा भारावल्यासारखे होते. इतकी छान मुले देवाने मला दिली म्हणून मी स्वतःला धन्य समजते. त्याने चित्रकलेचा अभ्यास करावा असा आग्रह मी केला. ह्या चित्रकलेचा अभियान्त्रिकी शिक्षणात खूप फायदा झाला असे तो म्हणतो. मला घरकामांत खूप मदत करायचा. तो स्वयंपाक करायला शिकला, ताक करायला शिकला. एम. टेकला मुंबईला शिकत असतांना माझ्या मित्रांना पुलाव वगैरे करून खाऊ घालतो असे जेंव्हा तो सांगू लागला तेंव्हा मला थोडे हंसूच आले होते. अतिशय साधा असलेला रमेश अतिशय मातृभक्त आणि घरवेडा होता.

माणसाला श्रमांचे महत्व कळलेच पाहिजे तसेच श्रमप्रतिष्ठाही त्याने ठेवली पाहिजे असे मी मुलांना सांगत असे. मुलांनी ते आचरणांत आणलेले मी पाहिले. शाळेतील प्रत्येक उपक्रमांत मुलांनी सहभागी व्हावे. त्याने आत्मविश्वास बरोबरच स्वतःचे मूल्यमापन करता येते. तसेच खिलाडूवृत्तीही निर्माण होते असा दृष्टीकोन असल्याने मुलांना त्यासाठी प्रोत्साहन तर मी दिलेच पण त्यांना हेही सांगितले की भाग घेतला म्हणजे नंबर आलाच पाहिजे असे नाही. भाग घेतल्याने तेवढा विषय तयार होतो, सभाधीटपणा अंगी येतो. मुख्य म्हणजे ऐनवेळी आल्या प्रसंगाचे समायोजन सहज करता येते. आणखी एक गोष्ट मुलांना पटवून देण्याचा सतत प्रयत्न केला. जातीभेद हा मानवतेला कलंक आहे. तो पाळता कामा नये असे त्यांना बजावून सांगत होते. अंधश्रद्धा किती भयंकर आहे ह्याची देखिल सोदाहरण चर्चा मी त्यांच्याशी करीत असे. जे कर्म विज्ञानाच्या कसोटीवर पारखता येते ते करावे असे मला पटले होते. ते मुलांना सांगणे ओघानेच आले. धर्मभेदामुळे होणारी भांडणे, निर्माण होणारी कटूता मी पाहिली, अनुभवली आहे. त्यामुळे माणूस ही एकच जात आणि माणुसकी हा धर्म एवढेच लक्षांत ठेवा असे देखिल मी वारंवार मुलांना बजावले होते. माझ्या ह्या विचारसरणीचा सर्वात जास्त परिणाम रमेशवरच झाला.

रमेश बी.इ. टेलीकम्युनिकेशन जबलपूरहून झाला. त्यानंतर आय.आय.टी. पवई येथून एम.ई. केले. तेथेच लेक्चरर म्हणून काम केले. तेथे असतांना रशियन तज्ञांचे मार्गदर्शन त्याला मिळाले. त्यानंतर कॉम्प्युटर संदर्भात अधिक ज्ञान मिळावे म्हणून तो इंग्लंडला गेला. खरे तर त्याआधी हेच शिक्षण घेण्यांसाठी रशियाला तो जाऊ शकला असतां पण त्या खंडातील रशियन वातावरण त्याला फारसे आवडणारे नव्हते म्हणून त्याने इंग्लँडची संधी स्वीकारली. इंग्लँडला सुरुवातीला फार काटकसरीने राहावे लागले. तीन-चार महिन्यानंतर  अमेरिकेच्या सुप्रसिध्द आय.बी.एम. ह्या कॉम्प्युटर बनविण्याच्या कंपनीत नोकरी मिळाली. तेथे त्याचे चांगले बस्तान बनले. त्याने स्वतः कांही संगणक संशोधन करून बनविले. त्याच्या कामावर कंपनी खूप खुश होती. भराभर बढती मिळत गेली. चार-पांच वर्षे झाली होती त्याच्या भेटीला. मी पत्र पाठवून तसे त्याला म्हणत असे. पण एक दिवस अचानक तो परतला. इ.स १९७२ ची घटना होती ती. मग मात्र त्याचा विवाह करूनच त्याला परत पाठवायचा निर्णय आम्ही घेतला. तो त्याने मानलाही. आमच्या तत्वाप्रमाणे रुपया नारळ  आणि  विवाह  साध्या पध्दतीने केला. नंतर तो अमेरिकेलाही गेला. तिथेही आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याचे काम सर्वांना पसंत पडले. आता तो परत आला असून तेल्हाऱ्याला राहतो. शेतीकडे, घराकडे लक्ष देतो. सध्या भारतीय रेल्वेची जी कम्पूटराईज्ड आरक्षण व्यवस्था आहे ती त्याने बनवून दिली आहे. मला त्याचा खूप अभिमान वाटतो. तो थोडा आता आध्यात्मिक क्षेत्रातही स्थिर  झाला आहे. तेल्हाऱ्यातील विपश्यना केंद्रात तो सहकुटुंब सक्रीय आहे. त्याचे सगळे व्यवस्थित सुरु आहे.

आमचे चौथे अपत्य आहे अशोक. इतर मुलांप्रमाणेच मॅट्रिक खामगांवातूनच सरकारी हायस्कूलमधून झाला. स्थानिक गो.से.महाविद्यालयांत प्रवेश घेवून महाविद्यालयांच्या सर्व कार्यक्रमांत भाग घेत, बी.कॉम. झाला. नंतर मुंबईला चार्टर्ड अकौंटन्सीत सहा महिने अभ्यास केला. त्यानंतर अकोल्याला  सीताबाई   आर्टस् कॉलेजमध्ये लॉ चा अभ्यास सुरु केला. एक वर्ष तेथे पूर्ण केलेही पण तो अभ्यास न आवडल्याने नागपूर विद्यापीठाची एम.कॉम.ची पदवी खासगीरित्या उत्तीर्ण केली. घराण्याचा सगळा कारभार सांभाळण्याची जबाबदारी त्याच्यावरच असल्याने खामगांवलाच स्थायिक व्हायचे त्याने ठरविले. रमेश त्याच्यापेक्षा मोठा पण विवाह करण्यास तो तयार नव्हता. त्यामुळे तो आणि अशोक ह्या दोघांच्याही विचाराने अशोकचा विवाह करण्याचे ठरले. अॅड.के.के. अग्रवाल यांची मुलगी आशा सोबत तो ठरविला. पारही, साध्या पध्दतीने पाडला. मुलगी सुशील, सुसंस्कारीत गृहिणीपदाला योग्य अशी आहे. विज्ञान विषयात ती पदवीधर झाली आहे. त्याची दोन्ही मुले सुशिक्षित असून सामाजिक

कार्यात त्यांना रुची असून सक्रीय सहभागही ते घेतात. त्याचा मोठा मुलगा आनंद नेत्रतज्ञ झाला आहे. सतत त्या कामात तो व्यस्त असतो. त्याच्या आजोबांनी खामगांवांत डोळयांच्या संदर्भात पहिला कॅंम्प घेतला होता. जवळजवळ तीनशे लोकांना त्या माध्यमातून त्यांनी सहाय्य केले होते. त्याच्याकडे पाहतांना मला नेहमीच ही आठवण येत असते. माझ्या दोन्ही नातसुना शिकलेल्या आहेत. घरकामांत त्यांना रस असून सुगृहिणी आहेत. स्त्रीला भरतकाम, विणकाम, शिवणकामांची मूलभूत आवड असते. त्यांनाही ती आहे.

अशोकबद्दल सांगायचे तर मोठा भाऊ दत्तक गेला होता. त्याला काका-काकूची सेवा करावयाची होती पण परदेशी नागरिक झालाय. ते कर्तव्य अशोकने उत्तम पार पाडले आहे. शेती, छापखाना, पेट्रोलपंप सगळी कामे तोच पाहतो. व्यवस्थित पार पाडतो. मुख्य म्हणजे कोणत्याही प्रकारची कुरकुर तक्रार न करता त्याचे काम चालू असते. ही कुटुंबाची जबाबदारी पूर्ण करीत असतांना तो ही सामाजिक कार्यात रस घेतो. रोटरी क्लब सारख्या संस्थांचे उपक्रम राबविण्यांत तो अग्रेसर असतो. गो.से.महाविद्यालयांच्या कार्यकारी मंडळात उपाध्यक्षपद त्याच्याकडे आहे. तेथील कामात लक्ष देऊन तो काम करीत असतो. मुलांचे व्यवसायही व्यवस्थित आहेत.

आमच्या चार पिढ्या अशा रितीने कार्यरत पाहून मला खूप आनंद वाटतो. चार पिढ्या एकत्र असूनही वादविवाद वगैरे नाहीत. सगळे समंजसपणाने एकमेकांशी सहकार्याने वागतात, हे महत्वाचे आहे.



एक आई म्हणून माझी कारकीर्द अशी आहे. मुलांचा अभ्यास घेतला. त्यांना देता येतील तेवढे विचार आणि संस्कार दिले. जगात वावरतांना माणूस म्हणून त्यांनी वागावे अशी अपेक्षा ठेवली होती. ती पूर्णपणे पूर्ण झाली असे म्हणायला हरकत नाही. मुलांच्या भाषेकडे काळजीपूर्वक लक्ष दिले होते. सर्वजण आज हिन्दी, मारवाडीबरोबरच मराठी उत्तम वापरतात. मराठी लोकांशी त्यांचे व्यवहार चांगल्या प्रकारचे आहेत.

थोडक्यात, एका आईने करायला हवे ते मी इमानेइतबारे केले. त्यात मला समाधान वाटले. इथे एक सांगावेसे वाटते. मुलं लहान होती. पती राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होते. त्यामुळे थोडी ओढाताण होई. अशा परिस्थितीत सुध्दा माहेर कडून मदत न मागण्याचे मी ठरविले आणि यात मी तडजोड केली नाही ह्याचा आनंद मला समाधान देतो.

-----------



# शिक्षण विचार आणि मी

शिक्षणा संदर्भात स्वतःचे मत मांडण्याएवढी, त्या संदर्भात प्रगल्भ विचारसरणी माझी नाही. ना त्या क्षेत्रातला अभ्यास, ना त्याचा घेतला अनुभव. पण वयाची नव्वदी गाठल्यावर वाटते की आपण जे कांही भलंबुरं जग बघितलं, जे काही चांगल वाईट जगलो त्या आधारे काही मांडण्याला हरकत नसावी. शिक्षण अनेक प्रकारांनी विद्वानांनी अधोरेखित केले असून त्या चिंतनातून वेगवेगळया शिक्षण विषयक उपपत्ती त्यांनी मांडल्या आहेत. त्या संदर्भात मी काही वाचले आहे. सेवाग्राम वर्धा, अमरावती, खामगांव वगैरे ठिकाणी वावरतांना जे दिसलं, ते बघून मी काही विचार केला आहे. तोच इथे मांडण्याचा प्रयत्न करते आहे.

शिक्षण क्षेत्रांत एक शिशुमंदीर काढून ते उत्तम रितीने चालविले तो अनुभव प्रथम सांगायला हवा. शिशुमंदिर काढतांना माझ्या डोळयासमोर देशाची भावी पिढी तयार करण्याचे ध्येय तर होतेच, यात शंका नाही. पण स्त्री संदर्भात उदारमत विचार मांडणारी पिढी तयार करण्याचा प्रयत्नही त्यांत अनुस्यूत होता. स्त्रियांना मन आहे, मत आहे, तिची समाजाला नितांत आवश्यकता आहे, तिला मानाने वागविले पाहिजे, तिला आश्रीतासारखे केविलवाणे जीवन जगू नये, ह्यासाठीच सारा अट्टाहास होता. स्त्रीलाही शिक्षण मिळाले पाहिजे वगैरेही मला त्या वेळी वाटत होते.

वर सांगितल्या प्रमाणे जेव्हा विचार मी करू लागले तेव्हा जाणवले की कस्तुरीमृगासारखी आपली स्थिती झालीय. आपण विसरून गेलो त्या देणगीला. माझे माहेर म्हणजे माझी शाळा होती. सासर झाले होते प्रयोगशाळा. प्रायोगिक तत्वावर मी विचारांचा वापर केला अन् त्याला यश आले होते. ते एका रात्रीत नाही मिळाले. त्याला एक सोपान परंपरा होती. माहेरी असतांना कानावर पडणारे विचार खूपवेगळया प्रकारचे होते. अति परिचयात् अवज्ञा म्हणतात तसेच झाले माझे. पुरणपोळी खाणाऱ्याला भाजीभाकरीचे महत्व कळणार कसे? आता जाणवते माहेरचे वातावरण, जगणे, मरणे, जीवनशैली सगळेच सर्वसामान्यापेक्षा वेगळे होते. सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून शिक्षणाचे नियोजन करायला हवे असे सेवाग्रामला बापू सांगत होते, पवनारला विनोबाही हाच विचार समोर ठेवत होते. माणसाचे पोट भरलेले असेल तरच तो लक्षपूर्वक मन लावून प्रयत्न करू शकतो. श्रमाची प्रतिष्ठा

असे नुसते बोलणे उपयोगी नाही तर श्रमाची किंमत माणसाला हिंमत कशी देते याची उदाहरणे समोर आली पाहिजेत. श्रम करणारा उपाशी राहिला तर त्याच्या रिकाम्या पोटाने तो चिडतो, रागावतो, बदल्याची सूडाची भावना त्याच्या मनात निर्माण होते. गुन्हेगारीचा उगम उपाशी पोटातून होतो. त्याच्या हाताला काम आणि कामाचे उचित दाम जोपर्यंत मिळणार नाही तोपर्यंत विकासाचे कागदी घोडेच फक्त नाचतील. म्हणून बेकार निर्माण करण्याऱ्या शिक्षणाऐवजी व्यावसायिक शिक्षण द्यायला हवे. फक्त शिक्षणच नव्हे तर त्या अनुसार नोकरी किंवा व्यवसाय त्याला उपलब्ध झाला पाहिजे. आजची बेसुमार बेकारी त्यावेळच्या त्या विचारांकडे लक्ष देऊन त्याची अंमलबजावणी केली असती तर नक्कीच टाळता आली असती. 'नोकरशाही'चा उदय इंग्रजांच्या शिक्षण धोरणातून झालाय. नव्हे हेतुपूर्वक कारकून निर्माण करणाचे कारखानेच त्यातून निर्माण झालेत. स्वतःचा व्यवसाय, समाजाचा व्यवसाय, सामुदायिक व्यवसायातून निर्माण होणारी जिद्द, वाढणारा आत्मविश्वास, सगळेच व्यक्तिमत्व विकासाला पूरक असायला हवे. आत्मनिर्भरता तर हवीच ना! परावलंबित 'येस सर' वृत्ती आपला बाणा निर्माण करूच शकत नाही. शहराकडे वाढता कल निर्माण करण्यास हे शिक्षण कारणीभूत ठरले. शिवाय घडाळयाच्या काट्याप्रमाणे काम सुरु, काम बंद, ओवर टाइमचे पैसे, ह्या नको त्या सवयींनी आळस, खोटी प्रतिष्ठा जन्माला आले. हे कटू सत्य आहे. आजही लॉर्ड मेकॉलेचे राज्य मनामनावर आहेच. इंग्रज इंग्रजी मागे ठेवून गेलेत. जीवनशिक्षण किंवा बुनियादी शिक्षण नांवाने मांडलेली शिक्षण प्रणाली जर उत्तम रीतीने कार्यान्वित झाली असती तर आमची व्यसनाधीन पिढी निर्माण झाली नसती असे मला वाटते. शिक्षण आणि नोकरी हा जोड मोडला पाहिजे.

'चला खेड्याकडे' ह्या नाऱ्याला अर्थ नाही. खेड्यातला एक शहरांत आला तर परत जायचे नांव काढत नाही. कारण इथला भपका त्याला मोहात पाडतो. खेड्याबाहेर खेडूत जाणार नाही. खेड्यातच त्यांना हवे ते मिळेल अशी व्यवस्था कार्यान्वित करणारे प्रामाणिक अधिकारी हवेत. उद्योग खेड्यांत सुरु व्हावेत. पण खेड्याचे शहरीकरण होता कामा नये. गावची शेती, शेती मळे ह्यासाठीच वापरली जाईल हे महत्वाचे समजून पावले टाकायला हवीत. नुसत्या पोपटपंचीने काय साधले? स्वातंत्र्य मिळवूनही साठ वर्षे होऊन गेलीत. पण प्रगल्भ विचार कुठे दिसत नाही. मतांसाठी योजना जाहीर करायच्या, नंतर त्या बाजूला सारायच्या,

हा व्यवहार थांबविणारे शिक्षण हवे. आमच्या लहानपणी एका लाकुडतोड्याची गोष्ट सांगितली जायची. कुऱ्हाड विहिरीत पडते बिचाऱ्याची. पोटापाण्याचे साधन गमावले म्हणून तो देवाला शरण जातो. देव प्रसन्न होतो पण त्याची परीक्षा घेतो. प्रथम सोन्याची, चांदीची कुऱ्हाड त्याला देतो. पण ही कुऱ्हाड माझी नाही. मला माझीच परत हवी ही त्याची मागणी एक संस्कार करून जाते. नवी पिढी माझे मला हवे, दुसऱ्याचे नको म्हणायला शिकायला हवी. मूल्य शिक्षण आज काळाची गरज आहे. स्वतःच्या पायावर उभे राहून स्वाभिमानाने जगण्याला महत्व आहे असे शिकविणारे शिक्षक हवे आहेत. आज शाळा महाविद्यालये राजकीय पुढाऱ्यांची 'कुरणे' झाली आहेत. सकस निकोप मनांची निर्मिती करणारे शिक्षण यातून मिळणार तरी कसे? महागाई शिक्षणाला स्पर्शून गेली आहे. गुणवत्तेपेक्षा अधिक जातीला, आरक्षणाला महत्व आहे. जातीयता नको असे तोंडाने म्हणत आरक्षणाच्या कुबड्यांसाठी सगळे सज्ज झाले आहेत. माणूस ही जातनावापुढे लिहायची इच्छा मरणाला लागली आहे. थोडक्यात 'बोलाचाच भात बोलाचीच कढी' असे सर्वत्र चित्र आहे.

शिक्षणाच्या संदर्भात खूप महत्वाचा विचार गेल्या १०-१५ वर्षात मांडला जातो आहे. सुप्रसिध्द खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर, त्यांच्या गणितज्ञ पत्नी त्या दोघांनीही तो विचार पुन्हा पुन्हा आवर्जून जोर देऊन सांगितला आहे. मुलांना मातृभाषेतून शिक्षण मिळायला हवे. पुढे त्याला जेंव्हा गरज वाटेल तेंव्हा त्याने इंग्रजी माध्यम घ्यायला हरकत नाही. इंग्रजी माध्यमातून शिकलेल्या किती टक्के लोकांना खऱ्या अर्थाने इंग्रजीत व्यवहार करता येतो याची आकडेवारी एकदा तपासून पाहायला हवी. इंग्रजी आणि गणित या दोन विषयात नापासांची संख्या फार मोठी आहे. पुरवणी परीक्षा देऊनही त्यांना पुन्हा पुन्हा परीक्षा द्यावी लागते. अशांना जर इंग्रजी, गणिताशिवाय परीक्षा देण्याची परवानगी मिळाली तर खऱ्या अर्थाने शिक्षण सार्वत्रिक होईल अशी माझी धारणा होती व आजही आहे. हा इंग्रजीला विरोध नाही. ज्यांना गरज वाटेल त्यांच्यासाठी ती असेलच ना! शिक्षण हवे असते समाजात व्यवहार करतांना सुलभ व्हावे म्हणून. आजच्या शिक्षणाचा उपयोग नोकरीत तरी होतो का? हा यक्ष प्रश्न आहे.

म्हणून शिक्षण औपचारिक व अनौपचारिक दोन्ही दृष्टीने एकदा स्वरूप, त्याची अंमलबजावणी याचा आढावा घेवून कार्यान्वित करण्यापूर्वी हवे ते नवे बदल करून घ्यावेत.

मुख्य म्हणजे शिक्षण व्यक्तिमत्व विकासाचा पाया म्हणून बघितले जावे ही माझी अपेक्षा आहे. भारंभार पुस्तके, वह्यांचे ओझे पाठीवर लादलेली मुले पहिली की मला त्या मुलांपेक्षा त्यांच्या पालकांची कीव येते. मला मजा वाटते की मुले आणि त्यांचे शिक्षक 'गुरुकिल्ली'नेच चालतात. अभ्यास करून शिकविणे तर कोसो मैल दूर आहे. शिक्षक पूर्वी गुरु होते. इंग्रजीतले 'मास्टर' मास्तर झाल्याने दुसरे काय होणार? इतर क्षेत्राप्रमाणेच शिक्षण क्षेत्रातही 'पार्ट टाईम' ही संकल्पना राबवली जातांना मी जेंव्हा ऐकते तेंव्हा आश्चर्याने थक्क होते. 'डोनेशन' देणारे विद्यार्थी अन् 'डोनेशन' देणारे शिक्षक ह्यांच्या फुगडीतून हाती काय हो येणार? गरगर फिरायचे अन् चक्कर येऊन पडायचे एवढेच. तर गरजेनुसार विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जावे. देशासाठी गरजेचे असणारे शिक्षणही गुणवत्तेवर द्यावे. ह्यातच सर्वांचे भले आहे. 'मास एजुकेशन' च्या नांवावर जे 'क्लास एजुकेशन'चे नाटक सुरु आहे ते थांबविणे गरजेचे आहे.

स्त्री शिक्षणाचा विचार मी मांडला आहेच. तो परत थोडक्यात मांडते. सहशिक्षण असायला हरकत नाही. तिला मानाने जगता येईल असे शिक्षणाचे स्वरूप असावे. स्त्री, अपंग ह्यांच्यासाठी योजना आखल्या जातात. पण त्याची कार्यवाही कितपत झाली ह्याचा आढावा घेतला जात नाही. असे छोटे छोटे माझे शिक्षण विषयक विचार आहेत. फारतर असे म्हणा आमच्या शिक्षण प्रणाली विषयी ही माझी तक्रार आहे. माझी, मुलांची, नातवंडांची आणि पतवंडाची ही पिढी शिकतांना मी पाहिली आहे. त्यात खूपसा बदल झाला नाही. कारण शिक्षणाबद्दल आस्था, प्रेम, आपुलकी कुणाजवळही नाही.

शिक्षणाचे अनौपचारिक माध्यम दूरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रे आदी प्रचार माध्यमे त्यांचे ध्येय समाजाला जागृत करणे, समाजाला वास्तव, सत्य दाखवून देणे. समाजाचे प्रबोधन करतां करतां एक आदर्श समाज निर्मितीला मदत करणे. दोष दिग्दर्शनही करणे. पण आज व्यक्तिचा, राजकीय पक्षांचा वरचष्मा आहे. निर्भिकतेचा विसर प्रसार माध्यमांना पडला आहे. एक जमाना होता, 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' असा सवाल मृत्युचीही फिकीर न करतां वृत्त- पत्रे विचारण्याचे धाडस करीत होते. आज असे म्हणावेसे वाटते की आपली मूल्ये, कर्तव्ये विसरणारी ही माध्यमे आपले डोके कधी जागेवर आणून आपली शैक्षणिक जबाबदारी

कर्तव्य समजून कार्यरत होतील? आपण काय दाखवितो ह्याचे भान ठेवायला नको? आम्ही सर्वात उत्तम आणि लवकर बातमी दाखवितो असे म्हणत नको त्या ठिकाणी ते पोहोचतात. अन् मजा म्हणजे राजकारणी मंत्री, अधिकारी त्यांना न अडवता, गोपनीयता खुंटीला टांगून मदत करतात. राजकारणात शत्रू मित्र कधी बदलतील हे सांगता येत नाही अशी आजची स्थिती म्हणून अनौपचारिक शिक्षण देणाऱ्या ह्या माध्यमांना स्वातंत्र्याच्या नावाखाली समाज विघातक होण्यास बंदी केली पाहिजे. ही माध्यमे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत ह्याचा विसर पडता कामा नये. ह्या दृष्टीने त्यांच्यावर बंधने नकोत तरी कुठेतरी त्याला चाळणी लागली पाहिजे. पण म्हणून विरोधी पक्षाचा विरोधच गाळून टाकणे खरे आहे का? लोकहितास्तव हे ध्येय असेल अशी योजना व्हावी.

करमणूकीच्या नावाखाली होणारा नंगानाच, गुन्हेगारीचे दर्शन, अनिष्ट रूढी परंपरांना खतपाणी, अंधश्रद्धांचा नकळत प्रचार थांबलाच पाहिजे. यांत कुणाचाही मुलाहिजा ठेवता कामा नये. आपले दूरदर्शन पाहून परदेशांतील लोकांना नक्कीच वाटत असेल की इथे अनीती आहे, भ्रष्टाचार काळाबाजारा बरोबर, येथील स्त्रिया कटकारस्थाने करतात, व्यभिचारी आहेत. परस्परांशी त्यांचे हेवेदावे आहेत. त्यांना नटणे मुरडणे फार आवडते वगैरे. म्हणून 'रिमोट कंट्रोल' योग्य व्यक्तींच्या हाती यावा हे श्रेयस्कर ठरेल.

चित्रपट, नाटके ह्यांची स्थितीतर भयंकर आहे. वाचनाची आवड दिवसेंदिवस कमी होते आहे. ग्रंथालयातून वर्गणीदार होवून पुस्तके नेणारे किती आहेत? वाचनाने मिळणारे शिक्षण म्हणजे स्वयं अध्ययन. ही सवय लागण्यासाठीही कांहीतरी हातपाय हलवायलाच हवे अशी माझी अपेक्षा आहे.

-----------



# स्त्रियांच्या संदर्भात

स्त्रियांच्या संदर्भात विचार करतांना कांही गोष्टी प्रथम मांडायला हव्यात. बजाज कुटुंबातील वातावरण सामान्यपणे सुधारणावादी होते. विचार आणि त्याप्रमाणे आचार असे. कर्ते सुधारक होते सर्वच. वर्ध्याला राहिल्याने तो मोकळेपणाचा संस्कार नकळत सहजच माझ्यावर झाला होता. इ.स. १९३० नंतर महात्माजींनी मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी स्वराज्य मिळाल्याशिवाय साबरमती आश्रमात परत येणार नाही असा निश्चय ठामपणे बोलून दाखविला. पुढे सत्याग्रह मागे घ्यावा लागल्याने दुसऱ्या आश्रमाची नितांत गरज वाटू लागली. विदर्भातील वर्ध्याजवळ सेवाग्रामला आश्रम उभा झाला. त्यामुळे गांधी दांपत्याच्या सहवासात राहण्याची संधी आम्हाला उपलब्ध झाली. त्या सहवासाचा परिणामही झाला. सत्य अहिंसा, प्रेम, स्वदेशी, वंदेमातरम् एक नव्हे अनेक विचार तिथे मांडले जायचे. त्यावर चर्चा होई. साधक-बाधक विचार करून निर्णय व त्याची अंमलबजावणी होई. त्यातून अनेक गोष्टी शिकायला मिळत. त्या वातावरणाशी निगडीत राहिल्याने मनाचा पिंड आपोआप तसाच घडत गेला. कस्तुरबा-बापू ह्यांचे दाम्पत्य जीवन, त्यांची परस्परांशी होणारी देवाण-घेवाण, बापूंचे लेखन, त्यांची मते, त्यांची प्रार्थना ह्याचाही परिणाम झालाच. त्यातून वर्ध्याच्या महिलाश्रमांत शिकण्याची संधी मिळाली. त्यानंतर अमरावतीला वसतिगृहात राहण्याची संधी मिळाली. ह्यातून स्त्रियांची परिस्थिती, त्यांचे जगणे ह्या संदर्भात माझ्या मनात स्त्री विषयक विचार येत. हळूहळू ते पक्केही झाले. त्याची जाणीव विवाहानंतर सासरी आल्यावरच झाली.

स्त्रियांना सर्व ठिकाणी असणारे कायम दुय्यम स्थान मनाला खुपत असे. तिला इतके कमी लेखले जाई की कोणत्याही घरांत तिचा जन्म झाला तरी स्त्री व शूद्र दोघांना सारखेच लेखले जाई. अर्थात शूद्र म्हणून माणसाला माणसापासून दूर ठेवणे, तुच्छ लेखणे वगैरे योग्य नाही हा विचार बापूंनी 'हरिजन' म्हणून मांडला होता, चर्चिला होता. तरी त्यातही स्त्रीविषयक स्वच्छ भूमिका नव्हतीच. बरे एकीकडे तिला असे तुच्छ म्हणून वागवायचे अन् दुसरीकडे तिला शक्ती म्हणायचे, देवी म्हणून पूजा करायची. ही द्विस्तरीय व्यवस्था कां, कशासाठी? त्याने काय साध्य झाले? घराघरातून वावरणाऱ्या स्त्रियांना अवहेलना, अपमान, कुचंबणा, मानहानी सहन करावी लागे. अत्यंत दर्जाहीन जीवन स्त्रिया जगत होत्या. त्यात बदल व्हावा, तिची परिस्थिती

बदलावी असे कुणालाही वाटत नव्हते. प्रत्यक्ष स्त्रीलाही त्याचे कांही वाटत नव्हते. ‘स्त्री म्हणून’ तिने कसे वागावे याचे धडे तीच आपल्या लेकी बाळींना देत होती. स्त्री म्हणजे गुलाम, दासीबटकी, हक्काची मोलकरीण, भोगवस्तू असाच दृष्टीकोन. तिला बोलण्याचा अधिकार किंवा संधी हवी हे कुणाच्याही ध्यानीमनी येत नव्हते. मला मात्र वाटे आपण काहीतरी केले पाहिजे. ही परिस्थिती बदलली पाहिजे.

बजाजांचे घर सुधारणावादी असूनही त्याला अपवाद होते असे मी म्हणू शकत नाही. आजी, आई ह्यांची स्थिती पाहून असे वाटे की स्वतःचा कोणताही दोष किंवा चूक नसतांना ह्या मौन का बरं स्वीकारतात? आपले वडील, काका, आजोबा इतरही पुरुष डोळयावर कातडे ओढून दुर्लक्ष कां करतात? प्रश्नांची भेंडोळी मस्तकांत फिरत राहत. पतीवर प्रेम करणाऱ्या, प्रामाणिकपणे कष्ट करून जगणाऱ्या ह्या स्त्रिया स्वतःला होण्याऱ्या सासुरवासला विरोध करू शकल्या नाहीत हे कबूल. पण मी सुनेला सासुरवास करणार नाही, तिला लेकीसारखे वागवीन असा विचार कां करू शकल्या नाहीत? फक्त विचार करायची मी. विचारांनी माझ्या लक्षात आले की, प्रवाहपतितता ह्या सर्वास कारणीभूत आहे. टाकून दिले, सवत आणली, विधवा झाली तिचे सर्व हक्क हिरावून घेतले, असे प्रसंग प्रत्यही घडत होते. त्यामुळे आपली अशी स्थिती होवू नये म्हणून ‘मौन’ बरे असे स्त्रीला वाटले. पिढ्यामागून पिढ्या स्त्री मौनातून बाहेर पडलीच नाही. सुधारक घरातही हे प्रकार घटत होते. लहान वयात होणारे विवाह, अज्ञान ह्यांनीतर स्त्रीचे जीवन बरबाद करून टाकले होते. लहान वयात येणारे मातृत्व त्यांचे बळी घेत होते. बाल-जरठ विवाह, सती किती आणि कशी दुर्दशा होती! कांही स्त्रियां जिवंत मरण जगत होत्या.

स्त्रियांची परिस्थिती बदलावी म्हणून इंग्रजांनी कायदे केले होते. पण कायदा हा मोडण्यासाठीच असतो असे लोकांना वाटते. आपण कायदा मोडून फार मोठा पराक्रम करतो आहोत असे समजणारेही खूप आहेत. स्वतंत्र भारतातही अनेक कायदे झाले आहेत. पण ते कायद्याच्या पुस्तकातच राहतात. ज्यांच्यासाठी हे कायदे आहेत त्या स्त्रिया ह्या संदर्भात अनभिज्ञ आहेत. कायदेतज्ञांची ह्या संदर्भातली भूमिका, ‘मला काय त्याचे’ अशी आहे. न्यायदेवता तर बोलून चालून डोळयावर पट्टी बांधलेली. मला तर नेहमी तिला पाहिल्यावर गांधारीच आठवते. डोळयावर पट्टी बांधण्याचे स्पष्टीकरण करतांना म्हणतात भेदभाव होऊ नये

म्हणून पट्टी आहे. पण डोळयावर पट्टी बांधून हातातल्या तराजूचा समतोल कसा साधता येईल? आजी आणि आई खरे तर दोन पिढ्या, पण जगण्यात तसूंभराचाही फरक नाही.अंधश्रद्धा, परंपरा, रूढी ह्यांच्याशी नाळ जुळलेली.

तिसरी पिढी माझी होती. त्यावेळी सार्वत्रिक शिक्षण सुरु झाले नव्हते. मुलींच्या शिक्षणाला होणारा विरोध कमी झाला होता.  किमान लिहिता वाचता येईल इतपत मुली शिकत होत्या. मुलींच्या बालविवाहाचे प्रमाण घटले होते. मुलींच्या लग्नाचे वय वाढले होते. बालिका वधू जरी नाही तरी किशोरी वधू सगळयाच होत्या. १५ वर्षे मुलीने पूर्ण केली तर हद्द झाली म्हणायचे. पुरुषांच्या विवाहाचे वय मात्र बंधनाविरहीत होते. बाल-जरठ विवाह सुरूच होते. दोन, तीन विवाह पुरुषांचे होत होते.

विधुरांचे विवाहही संमत होते. स्त्रियांची ससेहोलपट पाहून माझा जीव कासावीस होत असे. माझ्या सासरी निदान स्त्री संदर्भात सनातन प्रवृत्तीचे लोक तरी होतेच. मी मनाला मुरड घालण्याचा प्रयत्न करीत होते. शक्यतोवर वडिलधाऱ्यांचा आपल्या हातून अपमान होऊ नये असेच मी प्रयत्न करीत होते. त्या काळाचा विचार केला तर माझा विवाह तसा उशीराच झाला असे म्हणायला हवे. विवाह संदर्भात अंतिम निर्णय घरांतील वडिलधाऱ्यांचा असतो. माझे काका काँग्रेसच्या प्रचार कार्याने बुलडाणा जिल्हात दौऱ्यावर २-३ वेळा गेले होते. खामगांव त्याही काळात जिल्हातील सर्वात मोठे शहर होते. काँग्रेसची सगळी सूत्रे तिथूनच हालत असत. झुनझुनवाला परिवाराकडेच बहुतेक महत्वाच्या जबाबदाऱ्या होत्या. त्यामुळे घराण्याची सगळीच माहिती त्यांनी स्वतः मिळविली होती, पाहिली होती. अनुभवली होती. विवाह करण्यास योग्य पुरुषोत्तमजी त्यांना वाटले. हा निर्णय घेण्यांआधी मला विचारले होते. घर, माणसे, चांगली होती. घरदार, शेतीभाती, समाजात प्रतिष्ठा सारेच चांगले होते. नकार देण्यांसारखे कांहीच नव्हते. काळाच्या मानाने त्यांचे वय जरा जास्त होते. परंतु त्यावेळीच नव्हे तर आजही हा मुद्दा फारसा लक्षांत घेतला जात नाहीच. विवाह होण्यापूर्वी व नंतरही परस्परांवर विश्वास महत्वाचा असतो. ह्या विचारावर ठाम होते. माझ्या माहेरचे लोक, पतीसाठीच सारे कांही ही भूमिका मनाशी पक्की केल्यामुळे तडजोड करण्याची तयारी मी ठेवली होती.

एका दृष्टीने कुठेही वागण्यांत लबाडी, देखावा सासरी नव्हता. त्यांचे जे कांही विचार होते ते सामान्यपणे मारवाडी घरांत असतात तेच होते. त्यामुळे त्यांची बाजू आणि माझीही बाजू मला सहज कळत गेली.  अनुभवामुळे माझी निर्णय प्रक्रिया सोपी झाली. कारण त्यांच्यात बदल मला करायचा होता. त्यांना त्यांची अजिबात गरज नव्हतीच. मलाच माझा तोल सांभाळत त्यानाही तोल कुठे जातोय ह्याची जाणीव करून देऊन बदल करावयाचा होता. काम अशक्यप्राय वाटत होते.

घरातल्या स्त्रिया वाईट होत्या असे मुळीच नाही. परंपरेने चालत आलेल्या रूढी परंपरांचा त्यांच्यावर विलक्षण पगडा होता. जे विचार स्वप्नातही त्यांच्या मनांत कधीच आले नसते ते विचार मी घेऊन आले होते. आजची स्त्रीमुक्तीची  कल्पना तेंव्हा नव्हती हे इथे नमूद केलेच पाहिजे. जिथे पुरुषच असा स्त्रीसंदर्भात विचार करणारे तुरळक होते. त्यांनाच विरोधाला तोंड द्यावे लागत होते. त्याठिकाणी एका नुकत्याच विवाह झालेल्या तरुणीने त्या विचारांप्रमाणे जगण्याचा प्रयत्न करणे म्हणजे प्रवाहाच्या विरोधात पोहण्यासारखे होते. किती कठीण गोष्ट होती ती. मला त्या स्त्रियांचा अपमान करायचा नव्हता. पण माझी पातळीही सोडायची नव्हती. सेवेचे व्रत पाळायचे होते. गृहिणीधर्म जपायचा होता. उत्तर न देता, उलटून न बोलता कार्यरत राहून हित साधायचे होते. असे वागतांना आपल्या विचारांशी तडजोड स्वतःच्या संदर्भात तरी करावयाची नाही असे मात्र ठरवले होते. त्याप्रमाणे वागण्याचे धोरणही निश्चित केले होते. सुरुवातच मुळी ‘घूंघट’ ने झाली. विरोध, टीका, शाब्दीक हल्ले परतवत डोक्यावर पदर घेण्यात मी यशस्वी झाले होते.

माझ्या सासरच्या ह्या संघर्षात आयुष्यभर एक घटना माझ्या मनाला टोचते आहे. ती सल कांही केल्या जात नाही. मोठ्या जाऊबाई बाळंतीण होत्या. त्यांचे तान्हे मूल खूप आजारी होते. ते मी समोर असूनही वाचवू शकले नाही. ह्याचे कारण विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा अभाव हे होते. खरे तर भारतीय संस्कृती विज्ञाननिष्ठ आहे. विज्ञानाच्या भरभक्कम पायावर ती उभी असल्याने हजारो वर्ष टिकली आहे. पण अंधश्रद्धेने त्या पायाला सुरुंग लावला आहे. हेच कारण त्या बाळाच्या मृत्यूला कारणीभूत ठरले होते. निसर्गाने स्त्रीला ‘ऋतुचक्र’ बहाल केले आहे. मातृत्वाचे दान पदरांत घेण्यास ती शारीरिकदृष्ट्या तयार झाली असा अर्थ ‘ऋतुमती’ होण्यात आहे. त्या अवस्थेत स्त्रीला विश्रांतीची गरज असते. एवढेच नव्हे तर इतर कशाचा संसर्ग किंवा बाधा तिला होऊ नये म्हणून तीन दिवस ती अस्पर्श रहावी अशी काळजी घेतली गेली. तिला

आवश्यक, अपरिहार्य असणारी विश्रांती ह्या नियामामागे होती. जेंव्हा ते बाळ आजारी झाले तेंव्हा मी अस्पर्श होते. मला बाळाजवळ जाता आले नाही किंवा औषधोपचारासाठी डॉक्टरांकडे बाळाला नेताही आले नाही. परिणामी बाळाचा मृत्यू मला पाहावा लागला. स्त्रीला कधीकधी असा त्रासदायक, जाचक ठरणारा हा नियम. अस्पर्श असलेल्या द्रौपदीला दुःशासनाने ओढत दरबारात नेलं होतं. त्यावेळची तिची मनस्थिती मला कळली होती. तिची विवशता, हताशपणा जाणवला होता. स्वातंत्र्यलढ्याची नायिका, १८५७ च्या लढ्यात सक्रीय राणी लक्ष्मीबाई हिलाही ह्या निसर्गसिध्द वरदानाचा त्रास झाला होता. झांशी सोडून ती निघाली. काल्पीला पोहोचली  देखिल. परंतु वाटेत ऋतु प्राप्त झाल्याने पेशवे शिंद्यांची भेट घेण्यासाठी तिला तीन दिवस थांबावे लागले होते. ग्वाल्हेरच्या शिंद्यांची भेट वेळेवर झाली असती तर स्वातंत्र्याची पहाट उगवायला इतका उशीर झाला नसता असे राहून -राहून मला वाटते.

पती लढ्यात सक्रीय. त्यामुळे जबलपूरच्या कारागृहात त्यांची रवानगी झालेली. घरी वडीलधारी माणसे आणि माझी लहान मुले. काळ थांबत नसतो कुणासाठी. मुलाचे जावळ झुंझुनु इथे जाऊन काढायची प्रथा आमच्या घरी. पण नेणार कोण हाच मला प्रश्न होता. मुलाचे केस वाढत होते. डोळयावर येत होते. त्यात उवा होण्याची भीती वाटत होती. मुख्य म्हणजे वाढलेले केस अजिबात चांगले दिसत नव्हते. सासूबाईंना मी सांगून टाकले की लौकरात लौकर जावळ काढण्याची व्यवस्था करा. ते शक्यच नव्हते हे सरळ सरळ दिसत होते. एक दिवस कात्री घेवून माझ्या खोलीतच मी केस कापून टाकले. मला सर्वांच्या रोषाला सामोरे जावे लागले. आजूबाजूचे लोकही ‘काय बाई आहे’ अशा नजरेने माझ्याकडे पहात होते. आता अघटीत कांही तरी घडणार असे साऱ्यांनाच वाटले होते. देवीचा कोप होवून घरावर संकटे येणार असेही बोलून दाखविले गेले. मी माझ्या मताने वागले तर होते. पण त्यातून एक झाले की कांहीही वाईट न घडल्याने विरोधाची धार थोडी बोथट झाली होती.

प्रत्येकच गोष्टीत मी टोकाची भूमिका घेत होते असे मात्र नाही. माझा देवपूजेवर विश्वास नाही. मी पूजापाठ वगैरे करीत नाही. तरी घरातल्या वडिलधाऱ्यांसाठी ते सर्व करून घेत असे. मला आठवते आमच्या जवळच वेदशास्त्र सम्पन्न झालेले शास्त्री राहात असत. आमच्या घरी पूजा वगैरे तेच करत असत. त्यांच्याजवळून नैमित्तिक पूजापाठ रितीप्रमाणे मी करवून घेई. ही गोष्ट ही त्या घरांतल्या स्त्रियांना माझ्याजवळ आणण्यास कारणीभूत ठरली होतीच. पतीच्या गैरहजरीत श्राध्दपक्षांचेही कर्तव्य मी पूर्ण करून घेतल्याचे मला स्मरते. एखादी गोष्ट

मुळापासूनच काढून टाकायची असेल तर टप्याटप्यानेच जायला हवे हे मला चांगलेच कळत होते. त्यामुळे माझ्या मतांची पायमल्ली होणार नाही एवढी काळजी घेत. कांही धरायचे कांही सोडायचे असे धोरण मी स्वीकारले होते. वसतीगृहांत अमरावतीला राहिल्याने मला अनेक गोष्टी शिकता आल्या होत्या. मोकळेपणा, स्वातंत्र्याचे महत्व कळले होते. त्याचवेळी बंधनही किती महत्वाचे आहे ही जाणीव देखिल झाली होती. आपल्या सोबत राहणाऱ्यांशी विचारविनिमय केला पाहिजे. प्रत्येकच वेळी आपले विचार मान्य होतील असे नाही. त्यातून सुसंवाद साधण्याची संधी मिळू शकते. मुख्य म्हणजे विसंवादी विचारदेखील बरेच कांही शिकवून जातात. विरोधी विचार कानावर पडल्याने त्या संदर्भात नकळत विचार सुरु होतो. या सगळयांचा परिणाम मी घरी वावरतांना माझ्या लक्षात आला होता.

फक्त पतीनिधनानंतरच नाही तर ते असतांनाही स्त्रीची होणारी परवड माझी समस्या होती. जोपर्यंत तिची आर्थिक बाजू पक्की होणार नाही तोपर्यंत तिच्यात अपेक्षित बदल शक्य होणार नाही. ही जाणीव मला झाली होती. स्वयं निर्णय तेंव्हाच घेता येतो जेंव्हा आपण स्वतन्त्र आहोत, आपला निर्णय गरजेचा व योग्य आहे अशी खात्री वाटते तीच गोष्ट आता नव्हती. या दृष्टीने निराधार, आश्रित ही बिरूदावली लागलेल्या स्त्रीसाठी कार्य करण्याची माझी मानसिकता झाली होती.

तसेच मला वैयक्तिकपणे ‘सती’ कल्पना अजिबात मान्य नाही. खरं तर अतिशय पवित्र, मंगलमय अशी ही भावना आहे. आपल्या आयुष्याच्या जोडीदाराशिवाय जगणे कठीणच नव्हे तर अशक्य वाटून अखेरीचा प्रवासही त्याच्याबरोबर करण्याचा विचार येथे आहे. पण पती म्हणजे काय? विवाहाचे रूप न कळलेल्या, प्रपंचाची तोंड ओळखही न झालेल्या कोवळया, निरागस मुलींना जाळले जाई. स्त्रीची होणारी मुस्कटदाबी ‘सती’तील अनेक सुंदर भावनांची होळी करून गेली. एकमेकांच्या प्रेमांतील अद्वैत पायदळी तुडविले गेले. पहिली पत्नी जिवंत असतांनाच दोन-दोन, तीन-तीन विवाह पुरुष करीत होते. विधुरही पुनर्विवाह करीत होते. नाती शोभतील अशा मुलींशी विवाह करण्यांत कांही गैर आहे असे कुणालाच वाटत नव्हते. स्त्रियांची ही ससेहोलपट मला थांबवायची होती. त्यासाठी मी प्रयत्नशील होते. मला हवे तसे सासर मिळाले होते. पण वैचारिक तफावत खूपच होती. बजाजाचे घर एकदम नव्या विचारांचे तर झुनझुनवालांचे तेवढेच पुराणमतवादी होते. सून म्हणून सर्व अपेक्षा मी पूर्ण करणारच होते.

तसे वागतही होते. पण माझ्यापुढे यक्ष प्रश्न होता की साऱ्यांशी जुळवून घेवून वागायचे की, सरळ सरळ विरोध पत्करुन आपला वेगळा प्रवाह सुरु करायचा. की सगळया अपेक्षा , त्यांचे वागणे याकडे कानाडोळा करून, सहभागी न होता तटस्थपणे जगायचे. एका १५-१६ वर्षांच्या मुलीला हा निर्णय घेणे खूपच कठीण होते. खूप मोठे धाडस करण्यांची मानसिक तयारी असल्याशिवाय मार्ग काढता येणे शक्यच नव्हते. मी निर्णय घेतला की, कधीतरी रूढी परंपरातील फोलपणा लक्षात घेऊन त्यात बदल करावाच लागणार आहे. तशी मानसिकता तयार करण्याची सुरुवात आपण करायला हवी. ते आपले कर्तव्य आहे.

'मौनं सर्वार्थ साधनम्' असे ठरवून मी वागायला सुरुवातही केली. परंतु त्याला घरातून आणि परिसरांतूनही प्रचंड विरोध होऊ लागला. ह्या प्रतिक्रिया पाहून आपलेच कांही चुकत नाही ना? असे मला वाटायला लागले. बहिष्काराचे शस्त्र उगारले गेले माझ्यावर. उत्तराला उत्तर न दिल्याने, तटस्थ राहिल्याने भांडणाचे स्वरूप आले नाही. मनाला मात्र खूप त्रास झालाच. माझ्यावरील त्यांच्या बहिष्काराचाही मला फायदाच झाला. तो म्हणजे सगळयाच गोष्टींचे मी तटस्थपणाने निरीक्षण करू शकले. उपहास, कडू बोलणे टिकाटिप्पणी यांची धार प्रत्युत्तराशिवाय बोथट होते. माझ्या मौनामुळे त्यांना मिळणारे विरोधाचे समाधान मिळू शकले नाही. स्त्री समूहाची प्रतिक्रिया, एकट्या स्त्रीची प्रतिक्रिया, त्याची विचारसरणी, त्यामागील कारण परंपरा या संदर्भात माझे विचार पक्के होऊ लागले. सून म्हणून माझे प्रत्येक कर्तव्य मी पूर्ण करीतच होते. सेवेत कुठेही कमी पडू देत नव्हते. ह्या वर्तनाचाही नाही म्हटले तरी कांही परिणाम होतच गेला. उद्धट नाही, कामचुकार नाही, सेवा मनापासून करते, हे त्यांनाही कळून चुकले. मजेची गोष्ट म्हणजे बहिष्कार असूनही माझ्याकडून काम करून घेतले जाई. चार भिंतीत कोंडलेली, आत्मभान विसरलेली, स्त्री व्यक्तिमत्वांची थोडीही कल्पना नसलेली स्त्री मी बघत होते. मला खूप वाईट वाटत होते. माझ्या काकांच्या सानिध्यात राहिल्याने ह्या सर्वांपासून दूर मी राहू शकले. पती पुढे स्वातंत्र्यलढ्यात उतरल्यावर घरची सगळीच जबाबदारी माझ्यावर आली. ती पूर्णपणे, समर्थपणे मी पेलली असे मी म्हणणार नाही. माझ्यापरीने मी प्रयत्न केलेत. त्याला कांही प्रमाणांत यशही आले.

स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची संधी मला मिळाली. तिचा उपयोग मी करून घेतला. स्वतन्त्र विचारसरणी असलेली, देशाच्या स्वातंत्र्याचा विचार करणारी स्त्री आणि दुसरी मी ज्यांत वावरत होते ती स्त्री असा उघड-उघड दोन प्रकारचा जीवन प्रवाह मी अनुभवत होते. त्यांची तुलना करण्याचा छंद मला लागला. चिंतन, मनन अगदी एकाकी, एकटी पडल्याने मला सहज करता आले. या संदर्भात कांही ठोस पावले उचलायलाच हवीत, ती सुध्दा आपणच असा निर्णय माझाझाला. विधवा, परीत्त्यक्ता, दुसरपणावर दिलेल्या, दोनदोन तीनतीन सवती असल्याने कुढत, निराश्रीतासारख्या जगणाऱ्या या स्त्रियांसाठी काय करावे हे मला सुरुवातीला कळत नव्हते. त्यांच्या वागण्याचे, रागाचे, विरोधाचे कारण मला कळू लागले. त्यांच्या वागण्याचा त्रास मला झालाच नाही असे नाही. पण तो जरा कमी झालाच. मी त्याकडे दुर्लक्ष करीत असे. त्यांना मदतीचा हात देण्याचे मी ठरविले. परंपरावादी विचारसरणीतील विसंगती, त्रुटी मी दाखवून सुधारणा करण्यास सुरुवात केली. हळूहळू विरोधाची धार कमी झालीच. माझ्या आधीच्या पिढीवर परिणाम मी करू शकले नाही. माझ्या पिढीवर छाप पडली नाही तरी कुठेतरी त्या नोंद घेऊ लागल्या. जरी प्रत्यक्षात सहभागी झाल्या नाही तरी त्यांच्या बोलण्यात बदल झाला. कधी तरी मौन असे कार्य करील याची जाणीवही नव्हती. माझ्या नंतरच्या पिढी संदर्भात माझी विचारसरणी पूर्णपणे राबवली यात शंका नाही.

माझ्या मुलीच्या संदर्भातले उदाहरण साक्षात समोरच आहे. सुनेच्या संदर्भात सांगायचे तर मी त्यांना खूप मोकळीक दिली. आज नातसुना आल्या आहेत. आमचे एकत्र कुटुंब आहे. चार पिढ्या आम्ही एकत्र जगतो आहोत. नवे विचार घरात आहेत. माझ्या विचारांचा आदर राखला जातो. माझे विचार त्यांच्यावर मी लादत नाही. उदा. माझा पूजापाठावर विश्वास नाही. श्राद्धपक्षावर वेळ पैसा वाया घालवितो असे मला वाटते. पण सुनांना त्यांच्या विचाराप्रमाणे वागण्याची मुभा आहे. माझा विश्वास नाही, मला पटत नाही म्हणून त्यांच्यावर जाचक बंधने मी घातली नाहीत. त्यांना जे करावेसे वाटेल ते त्या मोकळेपणाने करतात.

आज मी सुखी आहे. माझ्या दृष्टीने माझ्या विचारांप्रमाणे वागण्याचा प्रयत्न केला.

-----

# आम्हा दोघांची खंत

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशीचा आनंद फारच थोडा काळ टिकला असे आज म्हणावेसे वाटते. स्वप्न विलयाला गेले होते. आमची  भारतभूमी सस्यशामला होईल, धनधान्याची विपुलता येईल, धान्याच्या राशी लागतील, दह्यादूधाच्या नद्या वाहतील, फळाफुलांनी झाडे वाकून जातील, खेडी, गावे स्वयंनिर्भर होतील; त्यांच्या गरजा पूर्ण करण्यात यशस्वी होतील असे वाटले होते. स्वावलंबी, समृद्ध भारत होईल. बलसागर भारत होवो, असे साने गुरुजी म्हणत होते. मोठमोठे कारखाने उभारले जातील, नवे नवे उद्योग निघतील. आमच्या गरजा पूर्ण झाल्यावर  आम्ही परदेशी निर्यात करू. पोटभर अन्न, अंगभर वस्त्र साऱ्यांनाच मिळणार असेही वाटत होते. सर्वांची सुरक्षा, सर्वांचे आरोग्य, सर्वांसाठी घरे काय काय ठरवले होते. भारतीय नागरिक नीतिमान, देशभक्त  असेल, दारिद्र्य नसेल, अज्ञान नसेल, नसेल बेकारी. स्वातंत्र्य टिकवण्यासाठी प्राणार्पणची प्रत्येकाची तयारी असेल. नसेल कोणी व्यसनी, नसेल कोणी जातीयवादी, नसतील इथे भेदभाव, नसतील भाषा-धर्मवाद अशी अपेक्षा करणे चुकीचे नक्कीच नव्हते. पण हाती काय लागलं? पारा जसा निसटून जातो, कळतच नाही, तशी स्थिती झाली आमच्या आदर्शवादाची.

देशाला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाली. स्वातंत्र्याचे रौप्य महोत्सवी वर्ष आले. गांधीजींची रामराज्याची कल्पना होती. त्यांच्या कल्पनेतले मंत्री, अधिकारी गरजेपुरताच पगार घेतील, अनावश्यक भत्यांची त्यांना आवश्यकता वाटणार नाही, साधे सरळ जीवन ते जगतील, मोटारी उडवण्यात त्यांना स्वारस्य राहणार नाही, राष्ट्रीय संपत्तीची उधळपट्टी होणार नाही, राष्ट्राचा खजिना वाढत जाईल, उगीचच सरकारी खर्चाने मोटारी उडवणारी मंडळी कुठेच नसतील अशी समजूत होती आमची. लोकांच्या तक्रारींचे निराकरण झटपट होईल. न्याय सर्वांनाच सारखा, ताबडतोब मिळेल. राष्ट्रपती, मंत्री, संत्री सगळेच नीतिमान, त्यागी, न्यायी, लोकहिततत्पर राहून कार्य करतील, कधी-कधी न्यायासाठी पदांचा त्याग करण्याची वेळ आली तर त्यांची तशी तयारी राहील, असे वाटत होते. फक्त देशहित आणि देशहितच सगळयांच्या

विचारांचा केंद्रबिंदू राहील अशी रास्त अपेक्षा होती. स्वार्थ कुणाजवळ फिरकणार नाही. शेतकरी, मजूर कुणीही या देशांतल्या  मोठ्यातल्या मोठ्या पदावर हक्क सांगू शकेल. अस्पृश्यता, हिंदु-मुसलमान झगडे कांहीही राहणार नाही. ग्रामोद्योगच्या माध्यमातून तयार होणाऱ्या वस्तू लोक घेतीलच. मोठे कारखाने, उद्योगही वाढतील. परस्परात प्रेमाचे संबंध राहतील. बुनियादी शिक्षण प्रणाली बरोबरच, इतरही  उपयुक्त शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध होईल. उद्योगी, नीतिमान, प्रामाणिक, स्वाभिमानी प्रजा होईल. भ्रष्टाचार राहणार नाही. कुणीही कुणाच्याही हक्कांची पायमल्ली करणार नाहीत. स्पर्धा असेल पण ईर्षा नसेल, असे साहजिकच वाटले होते. लूटमार, लांडी-लबाडी, चोरी-मारी उरणारच नाही कारण प्रत्येकाला हवे ते मिळणार होते.

याशिवाय आध्यात्मिक क्षेत्र तर भारताचे वैशिष्ट्य होते. या संदर्भात भारत जगाचा गुरु होईल. एक शांत, समाधानी वातावरण देशांत राहील. एक उत्तम लोकशाही इथे नांदावी असे गांधीजींचे स्वप्न होते. आपल्यालाही ते खूप आवडले होते. पण, आज देशाला इतकी वर्षे झाली स्वातंत्र्य मिळून त्यातील एकतरी बाब पूर्णत्वाला गेली आहे का?

राज्यातील उपमंत्री, मंत्र्यापासून, मुख्यमंत्र्यापर्यंत लोक पैशाचे प्रलोभन दिसताच पक्षांतर करतात. मोठ्या-मोठ्या पदांवर कार्यरत असणारे पदाधिकारी, अधिकारी हजारो रुपये पगार घेतात. याशिवाय नानाप्रकारचे भत्ते घेऊनही त्यांची भूक शमत नाही. बेहिशेबी मालमत्ता सगळयांच्याच जवळ आहे. सरकारी खजिन्यातील पैशांची उधळपट्टी तर बघवत नाही. या यादीत कुणाचे नाव नाही हेच बघावे लागेल अशी परिस्थिती आज आहे. पदांचा दुरुपयोग तर सर्रास होतो. आपली प्रतिमा तर खराब होतेच पण राष्ट्राची प्रतिमाही डागाळते आहे ह्याची ना खंत ना खेद.

लोखंड पोलादचे मोठे मोठे उद्योग कारखाने सरकार चालविते आहे. यातील कितीतरी उद्योगासाठी परदेशातून कर्जाऊ पैसा आणला आहे. एवढे मोठे भांडवल, परदेशातून मोठा पगार देऊन आणलेले तंत्रज्ञ, मोठमोठ्या इमारती, सारे कांही भव्यदिव्य पण त्यातील एकतरी व्यवसाय फायद्यात चालतो आहे असे दिसत नाही. तोट्यात चालतात सारे उद्योगधंदे, कारखानेही. नवलपूर्ण गोष्ट ही आहे की जे कारखाने उद्योगधंदे पूर्वी खाजगी मालकीचे होते,

नफ्यात चालत होते. तेच सरकारी मालकीचे झाल्यावर त्यातील कामाचे प्रमाण कमी होत जाऊन त्यांना टाळे लावायची वेळ आलेली आहे. स्वतन्त्र भारताचे  आर्थिक धोरण तोट्याकडेच जाते आहे ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे.

सरकारी कर्मचारी, सर्व स्तरावरचे फक्त आठ तास हजर राहणे, एवढेच आपले कर्तव्य समजतात. एखादे काम केंव्हा पूर्ण करवायचे ते फक्त कागदावरच असते. त्याची अंमलबजावणी होतच नाही. पाच माणसाचे काम पन्नास माणसे करतात तरीही पूर्ण होत नाही. कोणत्याही कार्यालयांत काम करणारे नव्हे, गप्पा मारणारेच कर्मचारी दिसतात. पत्ते खेळणे, चहाला जाणे यात वेळ घालवणे म्हणजे नोकरी असे त्यांना वाटते. त्यांना ना हटकणारे कोणी, ना त्यांना कुणाची भीती ना भय. ना मनाची लज्जा. पगारवाढ, महागाई वाढ ह्यांचे चक्र चालू आहे. हातांनी काम न करता गरजेपेक्षा अधिक पैसा मिळाल्याने आळशीपणा वाढतो आहे. ही आमची उभयतांची खंत होती. आजतर मी एकटीच हे सगळे पाहून हताश होते. कुठे थांबणार हे सगळे?

------------



# माझ्या आयुष्यातले आनंदाचे क्षण

आयुष्याचा विचार करतांना सुख दुःखाची चाळणी लावायचा प्रयत्न केला तर किंवा असे म्हणूया की सुख-दुःखाची यादी करू तर, असे वाटते, सगळेच आयुष्य आनंदमय होते आणि आहे. परीक्षा, कसोटी लावल्याशिवाय मूल्यमापन तर होणारच नाही. असे कसोटीचे प्रसंग खूप आले. त्यात मी उत्तीर्ण झाल्याचा आनंद सर्वाधिक आहे. मी तर असे म्हणते की, नंतर मिळणाऱ्या आनंदासाठी कितीही संकटे आली तरी चालतील. कुंतीने दुःख कां मागितले असावे त्याचे उत्तर मी अनुभवले आहे. एका स्त्रीला हवा असतो विस्तारलेला तिचा प्रपंच. माझी मुले, सुना, नातवंडे, नातसुना, पतवंडे आहेत. चार पिढ्यांचा अनुभव घेण्यासारखी आनंदाची, सुखद बाब कोणती असणार? अजूनही सगळी एकत्रित आहेत. एकमेकांना धरून आहेत. त्यात  कुठेही कृत्रिमता, नाटकीपणा नाही. सर्व छान शिकलेत. आपला आपला स्वतंत्र मार्ग पकडून यशस्वी झालेत. नवी पिढी अशी विकसित होऊन यशस्वी होतांना बघणे म्हणजे 'सोन्याहून पिवळे' अशी माझी सुख, आनंदविषयक कल्पना आहे. आवर्जून आईवडिलांची विचारपूस करणारी, त्यांचा सन्मान करणारी मुले आजही आहेत असतीलही पण अनुशासन तिचेच असे मानून चालणारी मुले म्हणजे जग जिंकल्याचा अनुभव! मला तो मिळालाय. त्यांना आईबद्दल खूप अभिमान वाटतो. त्यांच्या बोलक्या नजरा शब्दावाचून सारे सांगून जातात. आपल्या आईने कोणत्या परिस्थितीत आपल्याला वाढवले ह्याची जाणीव आजही त्यांना आहे.

'सेवा हाच धर्म' त्याचे पालन करून मिळणारा आनंद, एका वेगळ्या पातळीवरचा आनंद आहे. माझ्याकडून जेवढी होईल तेवढी सेवा मी केली. 'सेवा करा मिळवा मेवा' म्हणतात. तो मेवा म्हणजे आत्मिक समाधान ते भरपूर मिळाले मला. खादीचे व्रत लग्नाआधी घेतले होते. आजतागायत ते सुरु राहिले. त्यांत कृतकृत्य, सार्थक वाटते हा निर्भेळ आनंद. माणूस म्हणून जन्माला आल्याची धन्यता प्रत्येकालाच वाटते असे नाही. माणूस जे जगतो त्या जगण्याच्या अनमोल अनुभूतीतून येणारे आनंदाचे भरते मन भरून वाहत असते.

माझ्या मनांत अंधश्रद्धेला जागा नाही. रूढीपरंपराची कांही प्रमाणांत समाजहितासाठी गरज आहेच. पण अर्थशून्य रूढी, परंपराचा त्याग करायला हवा. असे मी शिकले. त्यानुसार

वागले. त्यातही आनंद मिळाला हे नक्की. पण माझे हे विचार मुलीसुनांवर लादले नाहीत. पूजापाठांवर माझा विश्वास नाही. तरी मुलीला, सुनांना त्यांच्या मनाप्रमाणे वागायला मनाई कधी केली नाही. प्रत्येकाला आपले विचार व्यक्त करायची मुभा असावी असे मला वाटते. तसे मोकळे वातावरण आज घरांत आहे. माझ्या सुना, नातसुना पूजा अर्चा करतात. त्याला आडकाठी मी करीत नाही. एवढे सगळे सुख आहे. बघायला पती नाहीत ही दुःखाची किनार आहे. पण आपल्या ह्या विचारांने इतरांचा आनंद कमी होईल म्हणून बोलून दाखवत नाही.

आनंद देणाऱ्या आणखी एका जागेचा उल्लेख मी करायला हवा. ती म्हणजे खऱ्या अर्थाने स्त्रीचे साम्राज्य असलेली जागा, स्वामिनी ती त्या जागेची. ते म्हणजे स्वयंपाकघर. स्वयंपाकघरांत काम करायला, ते स्वच्छ ठेवायला, नवे-नवे पदार्थ शिकून खाऊ घालायला आवडायचे. स्वतःला खाण्याची खूप हौस. त्यामुळे पदार्थ करायचे, खाऊ घालायचे मला वेडच होते म्हणाना. त्यातून आपण केलेला पदार्थ खाल्यावर रसिकतेने त्यांच्या सुगरणपणाची मिळालेली पावती आनंददायी असे. हा आनंद गृहिणीच्या आयुष्यातला सर्वोत्कृष्ट आनंद आहे. पारंपारिक पदार्थांबरोबर इतरही पदार्थ करीत असे. आजही नवीन केलेले पदार्थ खाऊन बघते. सुनांच्या चेहऱ्यावरचा तो आनंद मला खूप पहायला आवडतो. समोरच्याच्या तृप्त समाधानी चेहऱ्याने मनाला छान वाटते. खरे तर असा पाठींबा, प्रोत्साहन देण्यांतही एक मौज आहे. आपल्याजवळ असलेले ज्ञान अशा कामसू मुलींना वाटावेसे वाटते. ही एक आनंददायी अनुभूती आहे असे मला वाटते.

स्त्रीजन्माचे सार्थक करणारे मातृत्व, त्यातून होणारा आनंद फक्त स्त्रियांनाच कळू शकतो. पुनर्निर्मितीची ही प्रक्रिया आपल्या आईने आपल्या जन्मासाठी कोणते दिव्य केले ह्याची जाणीव करून देते. नवी पिढी जन्माला घालण्याचे हे नैसर्गिक कार्य आहे. तो कांही आजार नाही. त्यातून जातांना त्रास होतोच हे मान्य. जिवातून जीव बाहेर पाडतो. त्यावेळी होणाऱ्या जीवघेण्या वेदना क्षणभर पश्चातापही करवतात पण मुलाच्या जन्मानंतरची मनाची स्थिती आपण जग जिंकले अशी असते. स्त्रीजीवनांतील महत्वाचे कर्तव्य मी चार वेळा पार पाडले. मला तो मातृत्वाचा भार वाटला नाहीच. उलट एक वंश टिकविण्याचे महान कार्य व जबाबदारी पूर्ण केल्याचा आनंद अपूर्व होता. मातृत्व नाकारणे, स्त्रीगर्भाचा जगण्याचा हक्क हिरावून घेणे म्हणजे

स्त्रीने स्त्रीत्वाचा केलेला महान अपराध आहे. स्त्रीनेच मुलगी म्हणून मुलीचा दुःस्वास करणे मला पटत नाही. मातृत्वाचा हा अनुभव महान आनंदपर्वणी होय.

स्त्रियांनी शिकावे, स्वतःच्या पायावर उभे राहावे. हे माझे जीवनध्येय जरी होते तरी 'घर' ही स्त्रीची पहिली कर्तव्यभूमी आहे. आज करीअरच्या नावाखाली घरांकडे, मुलांकडे दुर्लक्ष होत आहे. सासू-सासरे कचराकुंड्या झाल्या असून माहेरचे अवडंबर वाढत चाललेले मी पाहते तेंव्हा मनाला खूप खंत वाटते. संस्कार करतांना मुलगी म्हणून दुय्यम स्थान नाकारायलाच हवेच. करियर करायला हवेच. पण त्यासाठी भांडणे, वादावादी संसाराची वाताहत करणे योग्य वाटत नाही. नोकरी ही करीअरची कल्पना चुकीची आहे. कांही अपवाद ह्याला सापडतीलही पण ते तुरळकच. तेंव्हा खऱ्या अर्थाने करीअर करणाऱ्या मुली मला जेंव्हा भेटतात. तेंव्हा मला त्या समंजस, कर्तव्यतत्पर, कर्तबगार मुली पाहून खूप आनंद होतो हे निर्विवाद आहे.

आमच्या लहानपणी हॉटेल्स असायची, त्यात पुरुषांनी जाणेच गैर समजले जाई. स्त्रियांचा तर प्रश्नच उद्भवत नसे. हळूहळू काळ बदलला, दृष्टीकोन बदलले. विचारसरणीही बदलल्या. आमच्या घरीही मुले-सुना नातवंड हॉटेलमध्ये जातात. त्यांच्याबरोबर कधीमधी मी जायचे. मला असे जेवायला आवडते. माझी नातवंडाबरोबर खूप गट्टी आहे. त्यांच्याबरोबर जाण्यातला आनंद कांही औरच असतो. त्यांच्याबरोबर हल्ली जात नाही कारण शरीरस्वास्थ तशी परवानगी देत नाही.

भटकायला खूप आवडते. निसर्गरम्य ठिकाणे, ऐतिहासीक स्थळे पहायची खूप आवड होती. आयुष्याच्या पूर्वार्धात ते शक्यच नव्हते. कारण तो काळच तसाच होता. परंतु देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर व मुलांसह बराच प्रवास केला. स्वातंत्र्य लढ्यात पतीचा सक्रीय सहभाग असल्याने, मुलांची संगोपने, शिक्षण, कुटुंबातल्या सर्वांची काळजी घेणे माझे कर्तव्य होते. तसेच आर्थिक दृष्ट्याही भटकणे परवडणे शक्य नव्हते. पण ह्यातून ही मार्ग आम्ही काढत असू.

कधीकधी शेतात, बागेत, आजूबाजूला जवळपास असणाऱ्या निसर्गरम्य ठिकाणी आम्ही जायचो. सायकल उत्तम चालविता यायची. मी, पतीराज, मुलगा किंवा मुलगी असे तीन-जण सायकली घेऊन निघत असू. 'डबलसीट' बसून आम्ही सहलीला निघायचो. जेवण्याचे, खाण्याचे डबे घरून तयार करून बाहेर पडायचो. त्या सहलीत मिळालेला आनंद कधीही विसरता यायचा

नाही. आजही असे कुटुंब सायकलवर सहलीला निघाल्याचे चित्र सायकलच्या जाहिरातीशिवाय इतरत्र दिसायचे नाही. मी आठवणीत रंगून जाते. आजही डोळयासमोर ती चित्रे पाहतांना मन आनंदात चिंब होवून जाते. एका मारवाडी कुटुंबातल्या स्त्रीने सायकल चालवायची, डबलसीट मुलाला घ्यायचे, पतीराज बरोबर. केवळ अतर्क्य असा हा अनुभव मी खूपदा घेतला. 'जग काय म्हणेल' या खोट्या विचारात अडकून आपण कितीतरी आनंदाचे क्षण हरवून बसत असतो. जे हाती लागेल त्याचा आनंद घ्यावा. हे महत्वाचे आहे. जे मिळाले त्यात समाधान मानण्याने ते क्षण सोनेरी होतात. तक्रार करण्यापेक्षा, नावे ठेवण्यापेक्षा नव्या पिढीने समन्वय साधायला शिकावे अन् आनंदाचे भांडार हस्तगत करावे अशी माझी अपेक्षा असते. आनंद निर्मिती करण्याची क्षमता फक्त मानवातच आहे. तो माणसाचा मूळ स्वभाव आहे. माणूस मात्र हे सारं विसरून आनंद हातचा घालवतो आहे. तो कधी जागा होणार? आनंद संकटावर मात करण्याची वृत्ती निर्माण करतो.

अशा अनेक बाबी माझ्या आयुष्यात आनंद निर्माण करून गेल्यात. माझ्या दृष्टीने आनंद ही संकल्पना असून तिचे विविध पैलू आहेत. आनंदाच्या विचाराचे जर पृथक्करण केले तर त्याचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल असेही मला वाटते.

१. मानवाने समोर एक ध्येय ठेवावे. एक विचार, एक तत्वज्ञान स्वीकारावे. प्रत्यक्षात ते उतरण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करावेत. त्यानंतर होणाऱ्या पूर्तीचा आनंद, ते क्षण केवळ अनुपम. हा आनंद अत्यंत उच्चदर्जाचा असून जीवनाचे सार्थक, धन्यता त्यात सामावलेली असते. उदाहरणार्थ आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य.

२. जीवनात आपल्याला अनेक व्यक्ती भेटतात. कांहीना आपण विसरूनही जातो. कांही आवडत्या असतात. त्यांची भेट झाल्यावर मिळणारा आनंद आपल्याला विसाव्याचे क्षण वाटतात. दिलासा देतात. कधीकधी आपल्या मनावरचा बोजा त्यांच्यामुळे उतरून ठेवता येतो. असे क्षण पुन्हा-पुन्हा यावेत असे वाटते.  हा आनंद मी मानसिक समाधान देणारा म्हणते. जसे आपले कांही मित्र, कांही वेळा नातलगही त्यात येतात. अनपेक्षित त्यांची भेट झाली तरी ती आनंदमयी असते.

३. आणखी एक महत्वाचा आनंद या संदर्भातलाच असला तरी त्याची जात जरा वेगळी आहे. 'सब्र का फल मिठा होता है' या उक्तीची प्रचीती त्यातून येते. पती तुरुंगात असतांना त्यांची झालेली भेट, मुले शिक्षणासाठी दूर ठेवल्यावर त्यांची झालेली भेट हे क्षण खूप दिवस आपल्याला दिलासा देत राहतात. चिंतनातून चिंतामुक्त करणारा हा आनंद असतो. अपत्य प्राप्तीचा आनंद यापेक्षा आणखी वेगळा असतो. स्पर्शमोहिनी म्हणजे काय ते ह्या स्पर्शातून अनुभवता येते. जीवनातला हा रोमहर्षक क्षण आहे असे मला वाटते.

४. प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील एक अदभूत आनंद देणारे मातृत्व महन्मंगल, पवित्र तर असतेच. शिवाय त्यात स्त्रीला मरण यातनाचाही अनुभव घेता येतो. खरे तर मृत्यूच्या दारातून आपले बाळ घेऊन परतत असतांना होणारा आनंद निरुपम तर असतोच, निर्व्याज, निरामय असणारा हा आनंद घरालाही आनंद देऊन जातो. निसर्गाने दिलेले मातृत्वाचे वरदान स्वीकारून त्यात यशस्वी झाल्याची पावती ते बाळ क्षणाक्षणाला देत राहतं. मुलापेक्षा मुलीला जन्म देणं अधिक महत्वाचे आहे कारण त्याद्वारे आपण नव्या पिढीच्या निर्मितीचा पायाच घालत असतो ना! मुलीला लक्ष्मी म्हणायचे अन् गर्भातच तिच्या गळयाला नख लावायचे ही रावणीवृत्ती आहे. एक आंतरराष्ट्रीय स्वरुपाची ही समस्या भविष्यात महाभारत न घडवो म्हणजे झालं. स्त्रीजन्मोत्सावातला मोद मला प्रमुदित करून गेलाय.

५. कर्तव्यपूर्तीतील आगळावेगळा आनंद म्हणजे कसोटीच्या क्षणांवर आपली मुद्रा कोरून ठेवणे आहे. कधी कधी कर्तव्यापोटी आपल्या विचारांना मुरड घालावी लागते. कांही वेळा चूक नसतांना माघार घ्यावी लागते. केंव्हातरी सुसंवाद निर्माण करण्यांसाठी तडजोड स्वीकारावी लागते. हा तह कैकदा जीवघेणा वाटत असतो. वरवर पाहिले तर या सगळयांत खंत, नैराश्य, वेदना, दुःख सामावलेले आहे असे वाटते. पण अंतिम परिणामानंतर विरोधकाकडून, दुसऱ्या पक्षाकडून, समोरच्या व्यक्तीकडून मिळालेली वागणूक जग जिंकल्याचा आनंद देऊन जाते. हा आगळावेगळा आनंद मला खूप मिळाला आहे. आपल्याला त्यावेळी विरोध करणारी, निषेध नोंदवणारी व्यक्ती जेंव्हा आपल्यावर विश्वास दाखविते, आपल्यावर अवलंबून राहते, हा अमूल्य आनंद खजिना सहजासहजी मिळतच नाही. त्याग आणि उपकार ह्या दोन्हीपेक्षा वेगळया भावविश्वात नेणारा हा आनंद आहे. समर्पणांतला आनंद फार तर म्हणता येईल. माझ्या सासूबाई, मोठे दीर परंपरावादी त्यांच्या माझ्या संस्कारात खूप तफावत होती. तरी केवळ

त्यांना समाधान मिळते म्हणून माझा विश्वास नसूनही वेदशास्त्र संपन्न झालटे शास्त्रींना बोलावून श्राध्द, पूजापाठ मी करवून घेत असे.

६. आपल्या कुटुंबात वावरतांना, त्यांच्यासमवेत जगतांना मिळणारा आनंद आणखी वेगळाच आहे. त्याच्यासाठी आपल्या मनांत एक स्वतंत्र कप्पाच करायला हवा. मुलांचे यश, त्यापासून होणारा आनंद कसा असतो? तो शब्दातीत असतो. ' न ये वदता, अनुभवी जाणतीते' हेच खरे. आपले वैवाहिक जीवन, आपले मुलांसह असलेले कौटुंबिक जीवन अत्यंत खासगी स्वरूपाचे असते. त्या आनंदाची चर्चा करणेही पाप आहे. कारण त्यात शारिरीक गुंतवणूक जशी असते तशीच मानसिकही बांधिलकी असते. या नात्यातल्या सुखाला मी चौकोनी आनंद असे म्हणते.

७. माणूस सामाजिक प्राणी आहे. समाजाशिवाय त्याला जगता, राहता येणे शक्य नाही. तसे ते अशक्यही नाही. प्रगत, विकसित जीवन जगण्यासाठी त्याला समाजाची नितांत आवश्यकता असते. समाजाचे सांस्कृतिक ऋणही आपल्यावर असते. त्या ऋणांची परतफेड आपले कर्तव्य असते. ते कसे फेडावयाचे हा विचार करणाऱ्याला अनेक वाटा दिसू लागतात. त्यासाठी इच्छा मात्र हवीच. गीतेतला कर्मवाद ह्या पेक्षा दुसरे काय सांगतो? फळाची आशा न करतां केलेले हे कार्य म्हणजे 'नेकी कर और दरियामे डाल' हाच प्रकार असतो. फक्त 'बोलाचीच कढी अन् बोलाचाच भात' इथे उपयोगाचा नाही. 'आधी केले मग सांगितले' असेही इथे नकोच. फक्त देत राहायचे इथे अभिप्रेत असते. एक प्रकारे हे गुप्तदान आहे. ह्यातील आनंदाचा संबंध सुसंस्कृतेशी असतो. हा आनंद फारच कमी लोकांच्या वाटेला येतो. मला तशी संधी मिळाली. स्त्रियांसाठी 'शारदाश्रम' मुलांसाठी 'बालवाडी' काढून कामाला गती आल्यावर मला वाटलेला आनंद ईश्वराशी जुळलेला आहे. आपण देव नाही, पण लोक देव समजतात. हे अनुभवाचे विश्व मिळाल्याचा आनंद अपरिमीत वाटतो मला.

८. सामान्य लोकांच्या सहवासातही आनंद असतोच पण त्यापेक्षा अधिक आनंद असामान्यांच्या सहवासांत मिळतो. स्वातंत्र्य लढ्यात महत्वाची भूमिका बजावणारे अनेक जण मला जवळून पाहता आले. कांहीच्या सहवासात रहायला मिळाले. त्यांचे मार्गदर्शन लाभले. ते

क्षण मला जीवनातले सोनेरी क्षण वाटतात. त्या क्षणाच्या सुखद स्मृती खूपच हर्षकारक आहेत. त्यात प्रेरणा आहे, स्फूर्ती आहे, मार्गदर्शनही आहे. कुणीतरी आपल्या जीवनाला वळण लावते, दिशा दाखवते. कुणावर तरी आपणही विश्वासतो. स्वप्नांना पंख फुटण्याचे हे मार्ग दाखवितात. विनोबाजी, गांधीजी, कस्तुरबा, सरदार पटेल कितीतरी बडीबडी मंडळी मला 'बजाजांची सीता' म्हणून ओळखत. त्यापासून मिळणारा आनंद विसरू म्हटले तरी विसरता येणारच नाही.

९. स्वातंत्र्य लढ्याचे अध्वर्यू महात्माजी. माझ्या माहेराशी त्यांचे मैत्रीचे संबंध होते. स्त्रीच्या आयुष्यातील विवाह म्हणजे नव्या आयुष्याची सुरुवात. गांधीच्या उपस्थितीत त्याची सुरुवात झाली. माझ्या पतींना 'पुरुषोत्तम' होण्याचा आशीर्वाद त्यांनी दिला. त्यांचे विचार प्रत्यक्ष ऐकण्याची संधी मला वर्ध्याला मिळाली. त्यांचा सहवास ज्या वयात मिळावा, ते किशोरवय होते. काय घडत होते ते फारसे कळतही नव्हते. तरी कांही तरी आगळेवेगळे अनुभव आहेत एवढे कळत होते. 'विभूती पूजा' हा त्या वयाचा गुणधर्म असतो. आपले स्वतंत्र अस्तित्व, वेगळेपण कुणीतरी मान्य करावे अशी इच्छा त्या वयात असते. त्या वयात मनावर उमटलेल्या प्रतिमा प्रबोधन करणाऱ्या असतात. त्यामुळे त्या वयाच्या सहज अपेक्षा गांधीच्या सहवासात पूर्ण झाल्याचा आनंद खूप होता आजही वाटतो. विनोबा भावेंची तर मी विद्यार्थिनी होते. त्यांची शैली, त्यांचे कार्य, त्यांचे अनेक भाषा प्रभुत्व वाखाणण्यासारखे होते. मुख्य म्हणजे भारतीय संस्कृतीबद्दल असणारी आत्मीयता आजही मार्गदर्शक वाटते. त्यांनी 'सीता' म्हणून मारलेली हाक आजही आठवते. त्यांची मातृभक्ती तर अद्वितीयच म्हणायला हवी. तो आदर्श सर्वांनी समोर ठेवायला हवा. खूप वर्षांनी त्यांची भेट झाल्यावर 'सीताना तूं' असा प्रश्न विचारत त्यांनी ओळख दाखविली. तो क्षण माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आहे. गुरु-शिष्य नात्यातील ही आत्मीयता फार कमी लोकांच्या वाटेला येते. असे गुरु मला लाभले यातला आनंद शब्दात सांगता यायचा नाही.

असाच आणखी एक आनंददायी क्षण मला सांगायलाच हवा. इ.स. १९३८ होते. स्वातंत्र्यवीर सावरकर खामगावला आले होते. टिळक राष्ट्रीय विद्यालयाला त्यांची भेट ठरली होती. ते पाचलेगांवकर महाराजांच्या आश्रमात उतरले होते. त्यावेळी मी नऊ दिवसांची बाळंतीण होते. फार मोठा माणूस, महान देशभक्त. त्यांना भेटण्याची खूप इच्छा होती. त्या

परिस्थितीत तर ते अशक्यच होते. सरळ सरळ विचारले असते तर परवानगी मिळणे अशक्यच होते. घरी न सांगताच त्यांच्या भेटीला गेले. त्यांचे बोलणे ऐकून, त्यांना नमस्कार करून मन अगदी भरून आले होते. एक महान राष्ट्रभक्त, तेजस्वी विचारांचा त्यागी माणूस जवळून बघण्याची,त्यांच्या जवळ जाण्याची मिळालेली ती संधी अनमोल आनंद पर्वणीच वाटली मला. घरी गेल्यावर बोलणी खावी लागली. सासूबाईंच्या रागाला तोंड द्यावे लागले. पण मिळालेल्या आनंदापुढे कशाचीही पर्वा वाटली नाही.

१०. माझा आत्मविश्वास जागा झाला तो स्वातंत्रलढ्यातील कार्यात मला प्रत्यक्ष सहभागी होण्याची संधी मिळाल्याने. आपल्या देशासाठी कांही तरी करण्याची संधी लाखमोलाची वाटली मला. मिठाचा सत्याग्रह झाला तेंव्हा मी खूप लहान होते. पण यवतमाळ जिल्हातल्या लोकनायक बापूजी अणे यांनी विदर्भात मिठाचा सत्याग्रह करता यायचा नाही हे लक्षात घेऊन जंगल सत्याग्रह करण्याचे ठरविले. त्यावेळी पिकेटिंग करायला, प्रभातफेऱ्या काढायला, पत्रके वाटायलाही आम्ही जायचो. जसे-जसे वय वाढत गेले तसे-तसे त्यातील गांभीर्यही कळत गेले. पण त्या कामांनी मला खूप हुरूप यायचा, अंगात उत्साह संचारायचा. आम्हाला पकडून दूर कुठेतरी सोडून यायचे इंग्रज शिपाई. तिथून परत पायीच यायला लागायचे. पण आपण थकलो, दमलो असे कधी वाटलेच नाही. छोटीछोटी कामे यशस्वी झाली तरी आभाळाएवढा आनंद व्हायचा. त्या आनंदाची तुलना कशाशीही करण्याचा प्रयत्न मी कधीही करणार नाही.

११. माझे विचार थोडे त्या काळातल्या परंपरारूढी यांना विरोध करणारेच होते म्हणाना! ते सहजासहजी कुणालाही पचणारे, अंगवळणी पडणारे नव्हते. त्यामुळे त्यांना विरोध असहकार अपेक्षित तर होताच. कुणालाही फारसे न दुखावता, कुणाचेही मन खूप न तोडता, त्याचवेळी आपल्या मतांना विचारांना तडजोड न करतां मला जगता आल्याचा आनंदही खूप मोठा होता. तो आनंद पुढे आयुष्यभर माझ्या उपयोगी पडला. ते सांगण्यासाठी खूप प्रसंगही उपयोगी पडतील जसे लहान मुलांसाठी शाळा काढली, शारदाश्रमाची उभारणी केली, माझे घूंघट न घेणे वगैरे. आता एवढेच सांगतेकी, स्त्री आत्मनिर्भर व्हावी. स्वयंनिर्णय तिला घेता यावेत, आर्थिकदृष्ट्या ती सबळ व्हावी अशी उर्मी मनांत होती. त्याला पाठबळ त्यातून मिळाले.

गांधीजींचे अहिंसा, सत्य प्रेम या संदर्भात माझ्या खूप उपयोगी पडले. गांधीवाद त्यावेळी कळत नव्हता. तो जीवन जगता-जगता कळत गेला. आज लोक जेंव्हा गांधीचे नाव घेऊन गांधीवाद सांगतात तेंव्हा खंत वाटते की गांधीचे विचारच त्या वादातून त्यांनी हद्दपार केले आहेत.

१२. माझ्या शारीरिक, मानसिक धकाधकीतून मिळणाऱ्या फावल्या वेळांत मी छंद जोपासले. मला सायकल चालवायला खूप आवडायचे. पण एकटीने ती कशी, कुठे आणि केंव्हा चालवायची हा प्रश्नच असे. पण छोट्या अशोकला पोहचवून वगैरे द्यायला, आणायला मी सायकलचा वापर करायची. पाठीशी बसलेला अशोक आणि मी सायकल स्वार. मोठा गमंतीशीर आनंद असायचा तो. मला उगीचच पाठीशी पोर बांधून घोड्यावर जाणारी राणी झांशीवाली आठवायची. खरच झांशीच्या राणीची समाजाला खूप गरज आजही आहे. अनेक संदर्भात स्त्री संघटन करण्यासाठी त्या मर्दानी लक्ष्मीबाईची वृत्तीच हवी आहे. स्त्रीवर होणाऱ्या अत्याचारावर तोडगा ती सक्षम असणे हाच आहे असे मला वाटते.

१३. स्वयंपाकघर म्हणजे स्त्रियांचे स्वराज्य. स्त्रीच्या कुशलतेचा प्रत्यय देते स्वयंपाकघर. मलाही स्वयंपाकघर खूप आवडायचे. त्या स्वयंपाकघरानेही मला खूप आनंदाचे क्षण बहाल केले आहेत. त्यांचा उल्लेख केल्याशिवाय माझे आनंदपुराण पूर्ण व्हायचे नाही. आपण अन्नपूर्णा आहोत ही जाणीव खूप सुखकारक असते. जेऊन तृप्त झालेले चेहरे पाहतांना होणारा आनंद अलौकिक आहे यात शंकाच नको. नवे पदार्थ शिकायचे. स्वयंपाकघर स्वच्छ ठेवायचे. त्यामुळे घरांतल्या वडिलधाऱ्या स्त्रियांनाही बरे वाटायचे. त्यांनी बोलून जरी दाखविले नाही तरी त्यांचे डोळे शाबासकी देऊन जायचे. त्याने मनाला उभारी यायची. त्यांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करण्याची ताकद त्यातून मिळायची. मुख्य म्हणजे मी माझ्या मुलांनाही स्वयंपाक शिकविला. ताक करणे वगैरे शिकविले. एका अर्थाने पुरुषांनी स्त्रियांना मदत करण्यांचा विचारच मी तिथून प्रत्यक्षात आणला. हा वैचारिक विजयानंद जपून ठेवला आहे मी अजूनही.

१४. माझ्या छंदानी मला सर्वतोपरी आनंद दिला. सर्वाधिक आनंद त्यातला वाचनाने दिला. आनंद छंद वाचन असे म्हटले तर चुकणार नाही. 'ग्रंथ हा गुरु' 'ग्रंथ हा मित्र' 'ग्रंथ हा आधार' अशा शीर्षकांचे निबंध लिहून ग्रंथांनी मिळणाऱ्या आनंदाचे मूल्यमापन करता येणार नाही. तो अनुभवाचा भाग आहे. मनात येणारे नको ते विचार थांबायचे असतील तर मनाला कुठेतरी गुंतवायला हवे. कारण हे चंचल मन माणसाला केंव्हा, कुठे अन् कसे नेईल सांगता

यायचे नाही. त्याला सांगून तर कांहीच उपयोग नसतो कारण आपण सांगू त्याच्या नेमके उलटे चालण्याचा त्याचा स्वभाव असतो. तरीही ह्या चंचल मनाचा एक मर्मबिंदू असल्याचे मला जाणवले होते. त्याला वाचनात रस होता. ते वाचन वेडे होते. त्याला वाचनात गुंतवले तर विचारांच्या गुंत्यातून आपली सुटका कांही काळ तरी होऊ शकते हे चांगलेच लक्षात आले माझ्या. मग मी त्याला वाचनांत गुंतवू लागले. अधिक जोमाने वाचन सुरु ठेवले. केंव्हा, कधी, कुठे या प्रश्नत्रयीच्या जाचातून सुटका करणारा छंद आजही मला खूप आनंद देतो यात तिळमात्र शंका नाही.

१५. माझ्या खादीने मला दिलेला आनंद म्हणजे माझा वेदमंत्र आहे. वेदमंत्रांनी एक वातावरण निर्मिती तयार होते. त्यात ज्ञान अनुस्यूत असते. वेद म्हणजे ऋषीमुनींच्या तपःसाधनेतून जन्माला आलेले विचारधन आहे. खादी त्याचे निदर्शक आहे असे मला वाटते. खादी हा एक जीवनव्रताचा भाग म्हणून मी स्वीकारला, जपलाही. त्यातून संयमाचा धडा मला मिळत गेला. स्वदेशीच्या महत्वाचे आकलन खादीने दिले. खादी केवळ वस्त्र नाही. खादी एक विचारसरणी आहे. गांधीच्या 'जीवनशिक्षण' या शैक्षणिक विचारांचा केंद्रबिंदू खादी आहे. पण कुणीही त्याकडे फारसे लक्ष दिले नाही. मला आजही खादीचा स्पर्श आनंदाचे मोरपीस अंगावर फिरल्याचा भास देते.

अशी माझी आनंद मीमांसा आहे. आपल्या आनंदा इतकाच दुसऱ्यांचा आनंद महत्वाचा आहे. तो जपतांना देखिल आनंदाचे कारंजे थुईथुई नाचू लागते. पाऊस पडणार या कल्पनेने आनंदविभोर होवून नाचणारा मोरच आपण आहोत असे वाटते. आनंदी भव! बस्स एवढेच.

---------------



# परिशिष्ट

## मुली व मुलांचे निवेदन

### १. सुधाचे निवेदन -

एक पत्र अपनी माँके नाम जिसका मेरी जिंदगीमे महत्वपूर्ण स्थान है।

पूजनीय माँ,

सादर प्रणाम।

माँ मै आपको हरवक्त याद करती हूँ, जब भी मै अपने बीते हुए कलको देखती हूँ तो माँ तुम्हे हृदयसे कितने धन्यवाद दूँ यह समझ नही पाती।

एक मारवाडी परिवारमे १९३८ मे मुझे जन्म दिया और जैसे जैसे मै बडी हो रही थी तब आपने अपने भूतकालके बारेमे सोचकर मुझे डॉक्टर बनानेकी ठानी ताकी मुझे अपने और अपने बच्चोके खर्चके लिये किसीके सामने हाथ न फैलाना पडे। उस कालमे मारवाडी लडकियाँ मॅट्रिक भी नही होती और यदि हुई भी तो नौकरी या व्यवसाय नही कर पाती। आपने मुझे पढाईके लिये प्रोत्साहित किया और बापूजीको मनवाकर मुझे मेडिकल कॉलेजमे प्रवेश दिलवाया, मुझे M.B.B.S.,D.G.O. करवाया।

गांधीजीके विचारोंसे प्रेरित वातावरणमे बडी होनेसे शादीके बादभी मैने सेलू जैसी छोटी जगहमे प्रॅक्टीस शुरू की। यहाँ १५०-२०० कि.मी. मे कोई मेडिकल एड नही थी। औरते ४-४, ६-६ दिन जचकीका दर्द सहती और दाइयोंसे जचकी करवाती। कुछको साथ साथ अपनी जानभी गंवानी पडती।

१९६५ से १९९८ तक डॉ. सोमाणीजीके साथ अपनी जिंदगी बिताई जिन्होने मुझे दो लडके दिये और मुझे अपने सब काममे मदतभी दी। उनके अचानक देहांत के बादभी, आपने मुझे

उस दुःखसे निकालने मेरे साथ रही। आपने दिया हुआ आत्मविश्वास और आत्मनिर्भरतासे, मैने



उनके बिना अपनी जिंदगीमे रही इच्छायें पुरी की। मैने पुरा भारत घूमकर देखा, २५-२६ दूर देशोंकी यात्राएं भी की। मैने तैरना सिखा और अब रोज तैरती भी हूँ।

मै अपने बच्चोंके साथ अपनी जिंदगी खुशी खुशी बिता रही हूँ। माँ, मै अपनी इस जिंदगीके लिये आपकी शतशः ऋणी हूँ। बडोको प्रणाम। बच्चोको स्नेह ।

आपकी बेटी
सुधा

## माझ्या आईच्या कांही आठवणीः

१. आमच्या घरी रामकृष्णा नावाचा एक कर्मचारी होता, तो आमच्या प्रिंटींग प्रेसमधे काम करीत असे. तो सारखा आजारी पडायला लागला. तो २०-२२ वर्षाचा होता. त्यावेळी मी आणि माझा भाऊ जगदीश मेडीकल कॉलेज नागपूरला शिकत होतो. आईने त्याला तपासणीसाठी नागपूरला पाठविले. त्याचे निदान टी.बी., (क्षयरोग) असे झाले. त्याला नागपूरहून एका महिन्याचे औषध देऊन खामगांवला पाठविले. आईने त्याला आमच्या एका रिकाम्या जागेत ठेवले व वर्षभर त्याचा इलाज केला. त्या काळात आई त्याला तीन वेळा जेवणाचा डब्बा पाठवी. त्यांत जेवणाबरोबर दूध व त्यांत भरपूर साय घालून ती ते पाठवी. तो पूर्णपणे बरा झाला. त्यानंतर त्याने पूर्ण आयुष्यभर आईचे नांव घेतले.

२. माझ्या चुलत मोठ्या काकांची नातसून आणि तिचे सासू सासरे व नवऱ्यामध्ये मतभेद झाले. ती त्या गांवाहून आमच्या घरी आली. आईने तिला घरी ठेऊन घेतले. मॅट्रिकचा अभ्यास करून परीक्षा द्यायला लावली. ती मॅट्रिक पास झाली. दीड वर्षानंतर नवऱ्याने तिला आपल्या घरी नेले. नंतर तिला मुलंबाळं झाली. ती आता स्वतःच्या घरी मजेत आहे व कांही काम पण करते.

३.	आईच्या मनात खूप दिवसापासून एक बालवाडी सुरु करायची होती. एक महिला मॉन्टेसरी ट्रेंड तिला कामाची खूप गरज होती. आईने लगेच बालवाडी सुरु करून तिला कामाला लावले. नंतर एका विधवा महिलेला ट्रेनिंग करीता पाठवून, तिला पण शाळेत लावले. नंतर शाळेची स्वतःची जागा व इमारत पण उभी केली. तिच्या मनांत जे काम करण्याची इच्छा असे ती ते धडपड करून सुरु करे.

४.	माझे मोठे काका, वडिलांचे चुलत भाऊ, वडिलांपेक्षा २५-३० वर्षांनी वयाने मोठे, खामगांवच्या आमच्या हवेलीच्या थोड्या अंतरावर राहत. त्यांना दोन मुली व एक मुलगा. मुलगा बँकेत नोकरी करी. त्याची बदली दुसऱ्या गांवी झाली. त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. माझे काका तथा काकी म्हातारे होत होते. त्यात ते आजारी पडले. आईने व बापूजींनी त्यांना डॉक्टरी इंजेक्शन व औषधे सुरु केली. तसेच त्यांना आई दोन वेळा डबा पाठवी, दूध पण पाठवी. असे आईने, ते व काकी जितके दिवस जिवंत होते, त्यांची काळजी घेतली.

५.	माझ्या वडिलांचे सख्खे मोठे भाऊ (सुखलालजी). त्यांची दोन लग्ने झाली. पण त्यांची पत्नी बाळंतपणात गेली. त्यांची मुलं पण जगली नाहीत. ते, आजी व माझ्या वडिलांचे कुटुंब सर्व बरोबर राहत. आईने त्यांना आयुष्यभर सांभाळले. म्हातारपणी अंथरुणात होते तरीही ती त्यांचे सर्व करी. अशा आईच्या कांही आठवणी मी लिहून काढल्या.

-----------



२.	जगदीशचे निवेदन-

## My Ma and Bapuji

**“Be the change that you wish to see in the world”. MAHATMA GANDHI**

The above quote from Mahatma Gandhi fits well to my parents’ life story. They were born to stand out. Throughout the life they did not try to fit in the existing social structure. They started their young life following the dream of Indian Independence and made huge sacrifices for the cause along with many followers of Mahatma Gandhi.

My earliest memory of my Bapuji is when we went to visit him in prison (where he was a political prisoner, probably in Akola). During my childhood Ma was totally responsible for our care as Bapuji spent lot of time and energy in India’s Independence movement. She fulfilled this responsibility extremely well with little support from the extended family. My father’s life story impressed on me the importance of ‘principles’ in life. Throughout his life, he made several sacrifices because he refused to compromise with his principles. Few examples of these are: - Giving up medical education, following Gandhian movement which involved financial, physical and emotional sacrifices. He did not believe in corruption and bribery which is the hallmark of success for many politicians after

independence. In my opinion, he should have achieved higher political position based on his education, leadership qualities and sacrifices for his country. I am proud that he stuck to his principles of not participating in corruption, bribery and backdoor deals. My parents strongly believed in education and encouraged us to pursue the field of our choice.

My mother has had strong affinity to read throughout her life. She read everything she could lay her hands on. This helped her to self-educate in many areas. She pursued her education by studying and passing several Hindi literature exams. She also encouraged me and my siblings to pursue organized Hindi education while continuing our education in Marathi medium. I am sure this book will give details of her leadership and social activities. Most impressive of her quality was her extreme devotion to her family. My father suffered from asthma most of his life. In later part of his life for many years he required constant help and attention due to poor health. I recall, my mother stayed by his side without complaining.

I suffered from asthma and various illnesses throughout my childhood. My parents took me to various specialists with the hope of helping me. My mother always knew when I was not feeling well. They continued to encourage me to pursue education. Fortunately I got over asthma after the age of 17 yr. Because of this and strong support from my parents, I was able to pursue highest level of medical education in India and abroad. When I got married without consulting my parents, they

welcomed my wife in the family. My parents had strong influence in us making independent decisions as long as we were on reasonable track. When I went to America for further studies my mother kept in touch with us by writing letters regularly. In those days it was impossible to communicate with telephone. My parents did not like my decision to live in America on permanent basis. This did not stop them from loving me. They always look forward to our visits to Khamgaon. They expressed their pride in my achievement.

In short, how did my parents influence my life? I pursued the highest level of education in my field in spite of chronic illnesses and ill health during childhood. I learned to think independently. I was able to adapt and live in a foreign country in terrible weather conditions and with little money in early part of my life. I taught and practiced in Medical college hospital and took care of poor patients, instead of going into lucrative private practice. I accepted and fulfilled various leadership responsibilities in my hospital. Until I came to America, I was using Khadi which influenced me to buy locally made products whenever possible. Over a period of several years many Indian families moved to Toledo. Indian community leaders realized a need for a place to conduct social and religious activities. I, along with my wife Leena, helped in the development of Hindu temple and Heritage Hall in Toledo as founding members. I participated in the political

process in America indirectly by giving donations and canvassing for



Democratic Party candidates.

Thus, I have always been proud of my parents and thankful for their strong influence on my life.

Faithful Son

Jagadish Jhunjhunwala



## ३. रमेशका निवेदन-

### मेरी मॉ

मेरी माँको मै एक आदर्श और सफल गृहिणीके रुपमे देखता हूँ। उसने एक माँका, पत्नीका और परिवारकी बहूका किरदार भलीभांती निभाते हुए समाज और देश सेवाके कार्योंमे महत्वपूर्ण और असरदार योगदान दिया है।

मेरी माँका व्यक्तिमत्व उसके गुणो और मूल्योंके कारण और  भी सुन्दर और सुहाना लगता है।

बचपनमे विनोबाजी और विनोबाजीके भाईयों द्वारा मिली स्कूलकी शिक्षाका, गांधीजीके मूल्योंपर वर्धाके आश्रममे मिले संस्कारोका, मॉके मूल्योंपर और जीवनकी दिशापर खासा प्रभाव दिखता है।

गांधीजीकी उपस्थितीमे और उनके आशीर्वादसे माँ का विवाह मेरे बापूजी, जोकी स्वतंत्रता संग्राममे कार्यरत थे,  के साथ पक्का हुआ। इस सगाईने माँ के वैवाहिक जीवन की दिशा देशसेवा और समाज कल्याणके कार्योंके लिये निश्चित कर दी।

उस वक्त, जबकी समाजमे महिलाओमे पडदा प्रथा, दहेज प्रथा, छुआछूत प्रथा, अशिक्षितता, रूढीवाद और पुरुष प्रधानता प्रचलीत थी, माँका वैवाहिक जीवन बापुजीके ५ भाईयोके बडे परिवारमे बडा चुनौतीपूर्ण और संघर्षमय रहा।

माँ-बापूजीका बिन दहेज और बिन पडदा विवाहसे समाज और परिवारकी परंपराओंमे परिवर्तन की शुरुवात हुई। हम सब बहन-भाईयोके और बादमे हमारे बच्चोके विवाहभी बिन पडदा और बिन दहेज हुए। हमारे बडे परिवारमे और समाजमे भी ऐसेही चलनसे विवाह होने लगे।

माँ-बापूजीने शिक्षाको व्यक्तिमत्व विकासके लिये विशेष महत्व दिया। माँ ने हम सब बच्चोंकी पढाईपर स्वयं ध्यान दिया। हमें सबेरे जल्दी उठाकर पढाईकेलिए बैठाती और हमें पढाईमे मदत करती। स्कूलकी पढाईके अतिरिक्त ड्रॉइंग/हिंदी परीक्षा, खेल, स्काऊट,

ACC,NCC, तैराकी, योगाभ्यास आदिमे भाग लेनेके लिये माॅ हमे प्रेरित करती और स्वयं मदत करती।

हर तरहके काम स्वयं करके, सब तरहके घरकाम; खाना बनाना; दूध, दही, छांछ के काम; घरके छापखाने, ऑइल मिल, खेतीके काम करने प्रेरित किया और हमने श्रमकी प्रतिष्ठा और स्वावलंबनका मूल्य समझा।

हमारे निर्णय हम ले, इसका स्वातंत्र्य हमें मिला और हमें इसकी आदत डाली।

उच्च शिक्षा लेनेके लिये हम सबको माँ-बापूजीने प्रेरित किया। अपनी रुचीके अनुसार हम बहन भाईयोको उच्च शिक्षाके लिये भेजा। हमारे बापूजी और खासकर माँ के योगदानसे ही हम सब बहन भाईयोने Post-graduate पढाई पूर्ण की। मेरी दीदी परिवारमे और समाजमे पहली MBBS/DGO महिला डॉक्टर बनी। इसका प्रभाव परिवारकी और समाजकी लडकीयोके शिक्षण के लिये सहायक हुआ। हम सब भाईभी परीवारमे अपने क्षेत्रमे पहले पहले Post-graduate हुए। बडा भाई MBBS/MS/FRCS डॉक्टर बना, मै BE/MTech इंजिनिअर और छोटा भाई B Com/M Com हुआ। हम सबकी शिक्षाने और माँ-बापूजीके विशेष प्रयत्नोंसे हमारे परिवारको, पडोसियोंको और घर कारखानेमे काम करनेवालोको शिक्षा लेनेके लिये प्रेरित किया और मदत भी की।

छोटे बच्चोको प्रायमरी स्कूलके पहलेकी शिक्षाका अभाव होनेके कारण माँने “शिशु मंदिर” शिक्षण संस्थाकी स्थापना की। वहाॅ Activity based learning शिक्षण प्रणालीके माध्यमसे छोटे बच्चोको सिखानेका आयोजन किया। शिशु मंदिरकी स्थापनाके लिये हमारे परिवारसे भी स्कूलकी जमीन आदिके लिये माँने योगदान अर्जित किया। शिशु मंदिरकी इमारत बनानेके काममे गर्मियोंकी छुट्टीयोंमे मै भी मेरे इंजिनियरिंग ज्ञानका कुछ उपयोग कर सका। इस संस्थाका वर्षोतक माँने कुशल संचालन किया।

माँने बाकी सब कार्य करते हुए स्वयंके विकासके लिये किताबे पढने और उच्च शिक्षाको अपनाया। राष्ट्रभाषा प्रचार समिती द्वारा संचालित ‘कोविद’ तककी तथा ‘साहित्य रत्न’ तककी

परीक्षाये स्वयं अभ्याससे उत्तीर्ण की। हम सब बच्चोको भी राष्ट्रभाषा सिखनेके लिये प्रेरित किया। मैने 'कोविद' तक की परीक्षाये माँकी मदतसे उत्तीर्ण की। राष्ट्रभाषा प्रचार समितीके कार्योंमे माँने काफी योगदान दिया। माँ हमेशासे २-२ लायब्ररीसे किताबें मंगवाती और उन किताबोंको पढनेके लिये अपने सब कामोंमेसे वक्त निकाल लेती रही है।

गांधीजी द्वारा संचालित भारतके स्वतंत्रता संग्राममे बापूजी अपनी नवयुवा उम्रसे ही समर्पित रहे। बापूजीने जिल्हा स्तरपर काँग्रेसके आंदोलानोंका आयोजन किया और उनका नेतृत्व किया। इस कार्यमे उन्हे कई बार कारावास जाना पडा। बापूजीके अनुपस्थितीमे माँने हमारे परिवारको और बापूजीके कामोंको भलीभांती संभाला। स्वतंत्रताके बादभी बापूजी कई वर्षोतक काँग्रेसमे और माँ महिला काँग्रेसमे कार्यरत रहे। हम बच्चेभी प्राईमरी स्कूलके वक्त काँग्रेस द्वारा संचालित 'सेवादल' मे शामिल हुए थे। भारतकी स्वतंत्रता और गांधीजीकी हत्याकी घटनाएँ हमारे परिवारपर होनेवाले असरके कारण (जबकी मै सिर्फ ६ वर्षका था) मुझे याद है।

स्वतंत्रता दिवस और गणतंत्र दिवस हमारे परिवारमे दीपावली जैसे मनाये जाते थे। गाँवके परिचित लोगोको पत्रिका देकर नाश्तेपर पर्व मनानेके लिये आमंत्रित किया जाता था।

गरीब बच्चोको मुफ्त दूध बांटनेकी सरकारी योजनाके तहत माँ सबेरे सबेरे जल्दी गरम पानी और दूध पावडरसे स्वयं दूध तैयार करती और हम बच्चे वितरणके लिये माँका साथ देते।

इन सब कार्यक्रमोंका आयोजन और व्यवस्थापन, शिशुमंदिरका संचालन, बापूजीके कार्योंमे सहयोग, परिवारके दिन-प्रतिदिनके कार्योंके अतिरिक्त कुशलतापूर्वक प्रेम और उत्साहसे करनेकी माँ मे बडी प्रतिभाशाली क्षमता रही है। हम बच्चोकी परवरिशमे माँका ध्यान कभी कम नही हुआ। हम सबको अपने हाथसे चूल्हेपर बना पौष्टिक भोजन वक्तपर गरम गरम मिलता रहा। माँके हाथका स्वादिष्ट भोजन मै आजतक भी नही भूला हूँ।

माँका मन बहुत बडा और उदार है। बिना किसी अपेक्षासे उसने बहुतोको प्रत्यक्ष और अप्रत्यक्ष रूपसे बहुत दिया और देतेही रहती है। हमारे छापखानेके एक कर्मचारीको टी. बी. की बिमारी हो गयी थी। माँने उसके इलाजका प्रबंध किया और जरुरी पौष्टिक आहार अपने हाथसे बना उसे महिनोतक खिलाया। जिससे वह उस समयकी असाध्यसी बीमारीसे पूरी तरह स्वस्थ हो गया।

हमारे घरमे सब तरहके वस्त्र हमेशासे शुध्द खादीकेही रहे है। तकली, चरखेसे सूत कातना हमने बचपनमेही सीख लिया था। स्कूल कॉलेजके जीवनमे तथा उसके बादके कार्यकालमे इस खादीकी साधी वेशभूषा मुझे हमेशा अन्य लोगोंसे कुछ अलग बना देती रही है। मै आजभी खादीका आदी हूँ। माँ-बापूजीका पहले १७ वर्षोका साथ और इस खादीने मेरे जीवनशैलीको और विचारधाराको हमेशा प्रभावित किया है।

खादी, हमेशा भारतीय संस्कृती, सादगी, स्वदेशी, ग्रामोद्योग, देशके प्रति कुछ करनेकी स्मृति दिलाती रही है। मेरे जीवनके बहुतसे निर्णय इन संस्कारोके कारण प्रभावित हुए है। विदेशसे वापसी, पब्लिक सेक्टरमे काम करना,आदि निर्णय इस विचारधारा द्वारा हुए। कम्प्यूटर तकनीकका उपयोग देशहितमे, देशके विकास और आम आदमीकी सुविधा हेतूके लिये मै इस सोचके कारण मेरा योगदान कर सका। इस कारण देशमे पहली बार कम्प्यूटर द्वारा रेल्वे आरक्षण, पोस्ट ऑफिस, बॅंकिंग, स्कूल, बीमा, आदि ऑनलाइन सेवायें आम आदमीके लिये शुरू हुई और देशके रेल्वे, बंदरगाह, बिजली, पोलीस, संरक्षण, पोलाद, खनन आदि बडे उद्यमोंमे कम्प्यूटरका उपयोग उनके अपने कार्य प्रणालीयों मे सुधारके लिये हुआ।

माँ और बापूजीने इगतपुरी जाकर गोयनका गुरुजी द्वारा भगवान बुध्दके बताये हुए धर्म और विपश्यना विद्याको १० दिवसीय शिबीरमे सीखा। माँने इस विद्याका लाभ जानकर दूसरोंको शिबीरमे जानेके लिये प्रेरित किया और स्वयंने भी कई अधिक शिबिरोंमे भाग लिया।



माँके मुझे प्रोत्साहित करनेके कुछ प्रयासोके पश्चातही मै विपश्यना शिबिरके लिये गया। विपश्यना शिबिर करनेके पश्चात मुझे ऐसा लगा कि मै भटक रहा था और मुझे  जीवनका ध्येय मिल गया।  क्या करना और क्या नही करना इसकी समझ आई। दुर्गुणोको निकालकर सदगुणोंको धारण करनेका तरीका मिल गया और निसर्गके नियमोंमे ढालकर दुःखोसे मुक्त होनेका सन्मार्ग मिल गया।

भगवान बुध्दके बताये मार्गपर चलने और धर्मको गहराईसे समझनेके लिये मैने कई विपश्यना शिबिर किये। मेरे जीवनकी इस मार्गकी उपलब्धीसे ऐसा लगता है कि मेरा जीवन सार्थक हुआ। इस अनमोल मार्गको दिखानेका श्रेयभी सिर्फ मेरी माँ को ही जाता है।

सारांशमे, माँ का जीवन धर्ममय रहा। उसने हमेशा दूसरोंके बारेमे पहले विचार किया।



माँने बिना किसी अपेक्षा के सेवा  धर्मको जीवनभर अपनाया। उसने बापूजीके परिवारके, समाजके और देशके सब कार्योंमे सहयोग दिया और उनकी बहुत सेवा की। ताऊजी और दादीकी जीवनभर सेवा की। हमारे बडे परिवार के लोगोंकी जरुरतके वक्त सेवा की। जरुरतमंदोंकी और बिमारोंकी सेवा की। अपने बच्चोंकी अच्छी परवरिश की, बहुत सेवा की और योग्य मार्गदर्शन किया। गांवके बच्चोके शिक्षणकी जरुरत पूरी करनेके लिये शिशुमंदिर स्थापित किया। उसने समाज सुधार और देशसेवाके लिये नेतृत्व किया और महिलाओके लिये एक आदर्श स्थापित किया । स्त्री स्वातंत्र्यके लिये माँने इस प्रकार धर्ममय संघर्ष किया जिससे समाजमे असरदार परिवर्तन वह ला सकी ।



उसने हमेशा निस्वार्थ भावसे दूसरोंका मंगल सोचा और भला किया। मंगल करने वालोंका हमेशा मंगलही होता है।

- रमेश



## ४. अशोकचे निवेदन-

# माझे प्रेरणास्थान - माझी आई

मनुष्य हा जन्मतःच बुध्दिवान प्राणी आहे. तो प्रत्येकाकडून प्रेरणा घेत असतो. एखाद्याकडून प्रेरणा मिळाली की, त्याची प्रगती व्हायला वेळ लागत नाही. मला प्रगतीच्या शिखरावर पोहचवणारी माझी आई, माझे प्रेरणास्थान आहे. तीच माझ्या जीवनाचा शिल्पकार आहे. ज्याप्रमाणे एखादा शिल्पकार ओबडधोबड दगडाला आकार देतो, व त्यामधून सुंदर शिल्प निर्माण करतो, अगदी तसेच माझ्या जीवनाला आकार देण्याचे महत्कार्य माझ्या आईने केले.

तसे आम्ही तीन भाऊ व एक सुधा नावाची बहीण. सुधाने आज एम.बी.बी.एस. डी.जी.ओ. अशा वैद्यकीय व्यवसायातील पदव्या प्राप्त केलेल्या आहेत. तिने अनेक देशांचे दौरे केले. लग्न झाल्यामुळे ती सासरी गेली तर मोठा भाऊ जगदीश व दुसरा रमेश सुध्दा उच्च शिक्षणासाठी बाहेरगावी होते. मी सर्वात लहान असल्यामुळे मला बाहेर कोठे शिकण्यासाठी जाता आले नाही. मला आई-वडीलांकडे राहण्याचे सद्भाग्य मिळाले. त्यामुळे मी त्यांचा सर्वात लाडका होतो. मी स्वभावाने हट्टी होतो. त्यामुळे जे मागीतले ते मला मिळाले. कधी बेशिस्तपणाने वागलो, तेव्हा आईच्या हातचा मारही खावा लागला. बापूंनी अर्थात माझ्या वडिलांनी कुणाच्या अंगावर हात उगारला नाही. त्यांचा नैतिक प्रभाव किंवा दरारा एवढा होता की, त्यांच्या समोर जाण्याची आमची हिम्मत होत नव्हती. त्यामुळे काही लागले तर ते आम्ही आईच्या माध्यमातून मिळवून घेत होतो.

बापूजींनी भारतीय स्वातंत्र्यलढयात सक्रीय सहभाग घेतला. अनेक वेळा त्यांना तुरूंगात जावे लागले. त्यामुळे आमच्या घरात देशभक्तीचे वातावरण होते. आम्ही कधी धार्मिक कार्यात किंवा कर्मकांडात सहभाग घेतला नाही. उलट सामाजीक व राष्ट्रीय कार्याकडेच आमचा कल होता व आजही आहे. आमच्या घरी स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन अगदी दिवाळीप्रमाणे आनंदात साजरा करीत होतो.

मी माझ्या आईला घरकामात मदत करीत होतो. मला लहानपणापासून तसे संस्कार आईने दिले होते. त्यामुळे घरातील बरीचशी कामे मला करावी लागत. माझे प्राथमिक शिक्षण नगर परिषद शाळा क्र. १ मध्ये तर माध्यमिक शिक्षण गव्हर्नमेंट हायस्कूल / जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये झाले. मी आईवडीलांच्या संस्कारामुळे वर्गात साधारण असतांनाही जी. एस. कॉलेज येथून बी.कॉम. व खाजगी एम.कॉम. केले.

माझे आईवडील माझे मार्गदर्शक आहेत. मला घडविण्यासाठी विशेषतः आईने जास्त परिश्रम घेतलेत. कोणतेही काम अगदी निःस्वार्थ भावनेने केले पाहीजे, हा संस्कार मला आईकडून मिळाला. आई नेहमी मला म्हणायची-असे काम करावे की, ज्यामुळे नाव मोठे झाले पाहीजे. त्या आईच्या प्रेरणेनेच आज मी विविध सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी संस्थेमध्ये पदाधिकारी आहे, हे नाकारून चालता येणार नाही. मी आईवडीलांची सेवा, काकांचे आजारपण असल्यामुळे मी घरीच राहण्याचा निर्णय घेतला. आईवडीलांची प्रामाणिकपणे सेवा केली.

आईवडिलांनी जास्तीत जास्त शिक्षण घेण्याचा सगळयांना आग्रह केला. शिक्षणाशिवाय प्रगती होऊ शकत नाही. शिक्षणाशिवाय मनुष्याच्या अंगात चांगले गुण येऊ शकत नाहीत, त्याच्यावर चांगले संस्कार घडू शकत नाही, असे आईने आम्हाला शिकविले व जे शिक्षणापासून वंचित होते, त्यांच्यासाठी बालवाडी सुरू केली. कुणी आपल्याला चांगले म्हणावे म्हणून काम करू नका तर आपण करीत असलेल्या कामाने अनेकांचे भले होणार असेल तर असे काम सोडू नका, हा आईचा जीवनसंस्कार जीवनाला प्रेरणा देणारा ठरला. आईच्या या शिकवणुकीचा माझ्या व्यक्तिमत्वावर खूप प्रभाव पडला. जर आपला हेतू शुध्द आणि प्रामाणिक असेल तर आपल्यावर टीका करणाऱ्यांच्या टीकेला काहीच महत्व नसते हे शिकलो, ते केवळ माझ्या आईवडीलांमुळेच.

आईने मला जीवनात नेहमी आनंदी राहण्याचा मंत्र दिला. जीवनात आलेल्या संकटांना न घाबरता, त्याला धैर्याने सामोरे जाण्याचे बळ आईच्या शिकवणुकीमुळे मिळाले. आनंदी राहणे हे जीवनाच्या यशस्वी वाटचालीत एक महत्वाचे पाउल आहे. जी माणसे यशाच्या प्रगती शिखरावर असतात, ती कितीही संकटे आली तरी त्याचा सामना आनंदाने करतात. म्हणून माझ्या आईवडीलांना अनेक व्यवसाय सांभाळण्यास मदत केली. घरी 'अशोक प्रिंटींग प्रेस' होती. पेट्रोल पंप होता, ते मी सगळे आनंदाने सांभाळले.

माझ्या आईने मला प्रत्येक गोष्ट शिकविली. काम करण्यातील टापटीप, काटकसर, काम वेळीच करणे, बिनचूक करणे या पासून तर, मोठमोठी कामे कशी करावीत याचे शिक्षण दिले.

आई एक उत्कृष्ट गृहिणी आहे. तिच्या हातच्या स्वयंपाकाला एक वेगळा स्वाद आहे. आजही तो स्वाद आठवला की, तोंडाला पाणी सुटल्याशिवाय राहत नाही. पूज्य साने गुरूजींनी म्हटले की,

"आई माझा गुरु/ आई कल्पतरु

सुखाचा सागरु/ आई माझी".

तशीच आई, माझी आई आहे. तीच माझी गुरु आहे. आईची सेवा करण्याचे पुण्य मला लाभत आहे, हे परमेश्वरी कार्य माझ्या हातून होत आहे, याचा मला आनंद आहे. या सेवेत मला माझी पत्नी आशा, मोठा मुलगा डॉ. आनंद व धाकटा मुलगा भरत अर्थात स्वप्नील मदत करतात. सुना देखील आईची सेवा करतात. आम्ही सगळे गुण्यागोविंदाने राहतो ते केवळ आईच्या संस्कारांमुळेच. आई सर्वांवर सारखेच प्रेम करते. कधीही चिडचिड करीत नाही, रागवत नाही. ती सतत आनंदी राहते व आम्हालाही आनंदी ठेवते. आज आम्हाला फिरायला गाडी व झोपायला माडी ही केवळ आईच्या आशिर्वादानेच मिळालेली आहे. तिच्या पुण्यकर्माचे फळ आज आम्ही चाखत आहोत. माझी आई म्हणजे आई आहे. ती माझे प्रेरणास्थान आहे. शेवटी फक्त ...........



फुलांचा सुगंध कुणी चोरू शकत नाही,

सूर्याची किरणे कुणी लपवू शकत नाही,

आईने आमच्यावर केलेले संस्कार,

आम्ही जीवनात कधीच विसरू शकत नाही.

-- अशोक

भवतु सब्ब मंगलम् ।



# स्त्रीचा स्वातंत्र्य लढा

एक धर्ममय संघर्षाची कथा

सदर ग्रंथ मागील शतकांतील ज्वलंत सामाजिक जीवनाचा, सांस्कृतीक मूल्यांचा पाठपुरावा करणारा महत्वाचा दस्तऐवज आहे. मागल्या शतकातील स्त्रीमुक्तीच्या वाटचालीचा चालताबोलता इतिहास आहे. संघर्ष अंतर्बाह्य करतांना काय मनस्थिती होती ह्याचा अंदाज यातून येतो. स्वातंत्र्यलढ्यात सक्रीय असणारे एक घर तेवढेच सनातनीही होते. दोन्ही दिशांनी एकाच वेळी कार्यरत राहणारी एक युवती कशी यशस्वी झाली ह्याचा मनोज्ञ लेखाजोखा हा आहे. सेवा, कर्तव्य करीत, कुणाचेही मन न दुखविता आपली मते कुणावरही न लादता, लढा लढतांना आलेल्या अडचणी बरेच शिकवून जातात. सामाजिक, राष्ट्रीय कार्य करतांना आपली अस्मिता जपत कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत, मुलांना घडविणारी आई, पतीनिष्ठ पत्नी, आदर्श गृहिणी यातून आपल्या भेटीला येते. आत्मकथनाचा हा एक वेगळाच प्रकार आहे.